**सतत चर्चेत असणाऱ्या एफएमसीजी क्षेत्रामध्ये साबण, नाश्ता आणि चहा यासारख्या वस्तूंना महागाईचा सर्वाधिक फटका बसला आहे. 'नुवामा इन्स्टिट्यूशनल इक्विटीज'च्या विश्लेषकांनी किमती वाढल्यामुळे ग्राहक लहान पॅक खरेदी करत असून व्हॉल्यूमवर नकारात्मक परिणाम होत असल्याचे म्हटले आहे. या आणि अशा इतर काही आव्हानांचा सामना करत हे क्षेत्र नवी लढाई लढत आहे. त्या निमित्ताने घेतलेला वेध.**

# एफएमसीजीमधील छोट्या खेळाडूंपुढील आव्हाने


परामर्श

**हेमंत देसाई**
ज्येष्ठ पत्रकार

एफएमसीजी, म्हणजेच फास्ट मूव्हिंग कंझ्युमर गुड्स हे भारतीय अर्थव्यवस्थेतील चौथे सर्वात मोठे क्षेत्र आहे. डिटर्जंट्स, साबण, टॉयलेटरीज, डेंटल क्लीनर, सौंदर्यप्रसाधने, शीतपेये, चॉकलेट्स, कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स आणि वेष्टनबद्ध खाद्यपदार्थ अशा अनेक क्षेत्रांचा त्यात समावेश होतो. सहा वर्षांपूर्वी एफएमसीजी बाजारपेठेची वार्षिक उलाढाल २३ अब्ज डॉलर्स इतकी होती. ती २०२५ मध्ये २२० अब्ज डॉलर्सपर्यंत विस्तारेल, अशी अपेक्षा आहे. म्हणजेच अवघ्या सहा वर्षांमध्ये त्याचा नऊ-दहापट विस्तार होत आहे. आणखी पाच वर्षांमध्ये एफएमसीजीच्या विक्रीमध्ये ई-कॉमर्स खरेदीचा वाटा ११ टक्के असेल, असा अंदाज आहे. बदलती जीवनशैली, दरडोई उत्पन्नातील वाढ, शहरांचा विस्तार आणि परदेशी ब्रँड्स तसेच गॅजेट्समधील वाढती रुची यामुळे या उत्पादनांची मागणी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. भारत हा तरुणांचा देश असून समाजमाध्यमे आणि डिजिटल व्यवहार यामुळेदेखील तरुण मनांवर नवनवीन वस्तूंचा प्रभाव पटकन पडतो आणि ऑनलाइन माध्यमातून झटपट खरेदी केली जाते. आयटीसी, वरुण बेव्हरेजेस, गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट्स, हिंदुस्तान युनिलिव्हर, ब्रिटानिया इंडस्ट्रीज, नेस्ले इंडिया या कंपन्या शेअर बाजारात सतत चमकत असतात. गेल्या दहा वर्षांमध्ये एफएमसीजी उद्योगातील महसूल सरासरी २१ टक्क्यांनी वाढत आहे. याव्यतिरिक्त ग्रामीण भागात महसुलात १४-१५ टक्क्यांनी वाढ होत आहे.

एफएमसीजीच्या एकूण बाजारपेठेचा ४५ टक्के महसुली हिस्सा हा खेड्यापाड्यांमधून येतो. ग्रामीण भागातील लोकांनाही वेष्टनबद्ध आणि चकचकीत उत्पादनांची भूल पडली आहे. शिवाय अर्थव्यवस्थेतील महिलांचा सहभाग वाढला आहे. तसेच महाराष्ट्रासारख्या काही राज्यांमध्ये लाडकी बहीण योजना राबवली जात असल्यामुळे महिलांच्या हातात खर्च करण्याजोगे उत्पन्न आलेले आहे. एफएमसीजीमध्ये कार्यरत असलेल्या बहुतेक कंपन्यांना उत्पादन प्रकल्प, यंत्रसामग्री, उपकरणे आणि इतर स्थिर मालमत्तांमध्ये गुंतवणुकीसाठी तुलनेने कमी भांडवलाची आवश्यकता असते. मात्र त्याच वेळी स्पर्धकांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे, बाजारपेठेतील हिस्सा वाढवणे विविध कंपन्यांच्या दृष्टीने आव्हानात्मक होत चालले आहे. उत्पादन विकास, बाजारपेठ संशोधन आणि प्रॉडक्ट लाँच करण्यापूर्वी कराव्या लागणाऱ्या जाहिरातींवरील खर्च मोठा असतो. या पार्श्वभूमीवर एफएमसीजी बाजारपेठविषयक ताज्या अहवालानुसार बाजारातील छोटे खेळाडू उत्तम कामगिरी करू लागले आहेत. डिसेंबर २०२४ मध्ये संपलेल्या तिमाहीमध्ये या छोट्या कंपन्यांच्या उलाढालीमध्ये १४ टक्क्यांची वाढ झाली आहे. गेल्या पाच तिमाहींमधील ही सर्वाधिक वाढ आहे. या उलट मागच्या तिमाहीमध्ये एफएमसीजी क्षेत्रातील बड्या कंपन्यांची उलाढाल सुमारे साडेचार टक्क्यांनीच वाढली. या काळात त्यांची एकूण उलाढाल पाच हजार कोटी रुपयांची झाली. याचा अर्थ बड्यांच्या तुलनेत छोट्यांनी बाजारात चांगलीच मुसंडी मारलेली दिसते.

खाद्यपदार्थ आणि खाद्यपदार्थेतर क्षेत्रात लहान कंपन्यांची कामगिरी सरस आहे. याचे कारण, छोट्या कंपन्यांच्या उत्पादनांच्या किमती तुलनेने कमी आहेत. त्यामुळे त्यांच्या मालाच्या विक्रीतही लक्षणीय वाढ झाली आहे. भारतातील एफएमसीजी बाजारपेठेतील ४६ टक्के हिस्सा हा बड्या कंपन्यांनी व्यापला आहे. तर त्यांना टक्कर देणाऱ्या छोट्या कंपन्यांचा वाटा हा १७ टक्के इतका आहे. आपला उत्पादनखर्च वाढलेला असूनही त्या प्रमाणात आपल्याला किमती वाढवणे शक्य होत नसल्याचे नेस्ले इंडिया, ब्रियानिया इंडस्ट्रीज यासारख्या कंपन्यांकडून सांगण्यात येत आहे. नूडल्स असोत अथवा बिस्किटे, त्यांच्या उत्पादनक्षेत्रात तुफान स्पर्धा आहे तर हिंदुस्तान युनिलिव्हर आणि गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट्ससारख्या कंपन्या आपली अनेक होम आणि पर्सनल केअर उत्पादने छोट्या पॅक्समध्ये आणत आहेत. उत्पादनांच्या किमतीमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने ग्राहक स्वस्त पर्याय शोधत आहेत. भारतातील अनेक लहान शहरांमध्ये त्या त्या ठिकाणची बिस्किटे, आइस्क्रीम्स वा नूडल्सची स्थानिक प्रॉडक्ट्स बाजारात असतात. त्या त्या शहरातील लहान कंपन्यांची ही उत्पादने लोकप्रियही असतात. एके काळी पुण्यात साठे बिस्किट्सचा बोलबाला होता. डोंगरे बालामृतसारखे अनेक ब्रँड्स लोकप्रिय होते. अनेकदा मोठ्या ब्रँड्सशी साधर्म्य साधत, काही छोट्या कंपन्या आपली उत्पादने बाजारात आणतात. मोठ्या, विशेषतः बहुराष्ट्रीय कंपन्यांचा जाहिरातींवरचा खर्च तुफान असतो. शाहरुख खान, अमिताभ बच्चनसारख्यांना काही कोटींमध्ये मानधन देऊन, जाहिराती केल्या जातात. समाजमाध्यमांवरून जाहिराती करण्यासाठी मोठे बजेट ठेवले जाते. मात्र हा खर्च ग्राहकांकडूनच वसूल केला जात असतो.




दहा वर्षांपुर्वीचे दहा रुपये किमतीचे बिस्किटांचे पाकीट आजही तितकेच आहे; परंतु पाकिटाचा आकार लहान झाला आहे. भाववाढ टाळण्यासाठी कंपन्यांनी उत्पादनांचा आकार कमी करत किंमत कायम ठेवली आहे. दुसरीकडे, अनेक कंपन्या आता कमी किमतीचे छोटे पॅक बाजारात आणत आहेत. उत्पादनाचे वजन कमी करून पाच, दहा आणि वीस रुपयांच्या 'व्हॅल्यू पॅक'वर कंपन्या भर देत आहेत. भारतीय ग्राहक अनेक गोष्टींचे छोटे पॅक खरेदी करण्यास पसंती देत आहेत. कारण किराणा आणि घरगुती वस्तूंच्या वाढत्या किमती त्यांना त्यांच्या बजेटमधून बाहेर काढत आहेत. साबण, नाश्ता आणि चहा यासारख्या वस्तूंना महागाईचा सर्वाधिक फटका बसला आहे. 'नुवामा इंस्टिट्यूशनल इक्विटीज'च्या विश्लेषकांनी एका नोटमध्ये म्हटले आहे की पाम तेलाच्या किमती सुमारे ३० टक्के वाढल्या आहेत. किमती वाढल्यामुळे, ग्राहक लहान पॅक खरेदी करत आहेत. त्यामुळे व्हॉल्यूमवर नकारात्मक परिणाम होत आहे.

महागाईचा तडाखा सहन करणाऱ्या एफएमसीजी कंपन्यांनी डिसेंबर तिमाहीमध्ये किमती वाढवल्या आहेत. हिंदुस्तान युनिलिव्हर (एचयूएल), गोदरेज कन्झ्युमर प्रॉडक्ट्स (जीपीसीएल) सारख्या कंपन्यांनी साबणाच्या किमतीत सुमारे दहा टक्के वाढ केली असून 'बिकाजी'ने आपल्या स्नॅक्सच्या किमती वाढवल्या आहेत. 'टाटा कंझ्युमर'ने आपल्या चहाच्या किमती वाढवल्या आहेत. चालू तिमाहीमध्ये किमती आणखी काही कंपन्या वाढवू शकतात, असे विश्लेषकांनी सांगितले. 'मॅरिको इंडस्ट्रीज'चे एमडी आणि सीईओ सौगता गुप्ता यांनी सांगितले होते की, ते उत्पादनांच्या किमती वाढवण्याच्या प्रक्रियेत आहेत. कमकुवत शहरी मागणीमुळे एफएमसीजी कंपन्यांची वाढ मंदावली आहे. त्याच वेळी चांगल्या पावसामुळे ग्रामीण भागातील बाजारपेठेमध्ये वर्दळ आहे. तथापि, पुनर्प्राप्ती हळू आहे. उच्च कमॉडिटी महागाई म्हणजे कंपन्यांना वापर वाढवण्यासाठी किमती कमी करण्यास वाव नाही. ग्राहकांनी एक किलो चहा आणि मल्टीपॅक साबण खरेदी करण्याऐवजी ५०० ग्रॅम चहाचे पॅक आणि एक किंवा दोन साबण खरेदी करण्यास सुरुवात केल्यास कंपन्यांच्या तिमाही वाढीवर नक्कीच परिणाम होईल.

एफएमसीजी कंपन्या आणि त्यांचे वितरक यांच्यातील संघर्षातून धडा घेत भारतातील सर्वात मोठी एफएमसीजी कंपनी हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड (एचयूएल) ने यासाठी डायरेक्ट-टू-किराणा स्टोअर वितरण प्रणाली सुरू केली आहे. या अंतर्गत कंपनी आपली उत्पादने थेट किराणा दुकानांना पुरवेल. यामुळे वितरण वेळ तीन दिवसांवरून २४ तासांपर्यंत कमी होईल आणि किराणा दुकानदारांसाठी क्रेडिट मर्यादा देखील सुलभ होईल, असा कंपनीचा दावा आहे.'एचयूएल'च्या विक्रीपैकी तीन चतुर्थांश किराणा दुकानातून येतात. डिसेंबर २०२२ मध्ये 'एचयूएल' आणि इतर अनेक एफएमसीजी कंपन्या आणि त्यांचे वितरक यांच्यात संघर्ष निर्माण झाला. बी टू बी किरकोळ विक्रेत्यांप्रमाणे समान सुविधांची मागणी करणाऱ्या 'ऑल इंडिया कंझ्युमर प्रॉडक्ट्स डिस्ट्रिब्युटर्स फेडरेशन'च्या मागणीनंतर हा संघर्ष निर्माण झाला. वितरकांच्या आरोपानुसार एफएमसीजी कंपन्या घाऊक विक्रेते आणि खरेदीदाता ते खरेदीदाता चॅनेलला उत्पादने कमी किमतीत विकतात. मध्यंतरी ऑनलाइन आणि ऑफलाइन किमतीतील तफावत संपुष्टात आणण्याची मागणी करत वितरकांनी काम बंद केले होते. यानंतर वितरकांच्या मालाची विक्री सुरू ठेवण्याच्या मागणीपुढे कंपन्यांना झुकावे लागले. 'एचयूएल'च्या नवीन वितरण नेटवर्कचा थेट फायदा जास्त भांडवल राखून नसलेल्या छोट्या दुकानदारांना अधिक होईल. खर्च आणि जादा भांडवल लागत असल्यामुळे दुकानदार मोठ्या भांडवलाची गुंतवणूक करू शकत नाहीत. नवीन मॉडेलमुळे २४ तासांच्या आत पुरवठा सुनिश्चित केल्याने दुकानदारांना इन्व्हेंटरीमध्ये पैसे गुंतवण्याची गरज भासणार नाही.

✦✦✦

**अमेरिकेच्या आयातशुल्क वाढीच्या आणि 'अमेरिका फर्स्ट' धोरणाचा भारतातील गुंतवणूकदारांना किती फटका बसला, हे पाहता ट्रम्प सत्तेत आल्यापासून भारताच्या दृष्टीने एकही चांगली गोष्ट घडताना दिसत नाही. मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यातूनही हाती फार काही पडलेले नाही. भारतापेक्षा अमेरिकेलाच व्यापारवाढ आणि कराराचा जास्त फायदा होण्याची शक्यता आहे. ताज्या करार-मदारांच्या दुसऱ्या बाजुवर टाकलेला झोत.**

# मेगा भागीदारी आणि वास्तव




प्रकाशझोत

**प्रा. डॉ. विजयकुमार पोटे**

भारत-अमेरिका 'मिशन ५००' च्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टाची पूर्तता करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २०२५ पर्यंत परस्पर फायदेशीर, बहुक्षेत्रीय द्विपक्षीय व्यापार करारा (बीटीए) च्या पहिल्या टप्प्यावर वाटाघाटी करण्याची योजना जाहीर केली. दोन्ही नेत्यांनी चर्चेसाठी वरिष्ठ प्रतिनिधींची नियुक्ती करण्यास संमती दिली. मोदी यांच्या भेटीदरम्यान घोषित करण्यात आले की 'कॉम्पॅक्ट' (कॅटॅलिटिक अपॉर्च्युनिटीज फॉर मिलिटरी पार्टनरशिप, एक्सेलरेटेड कॉमर्स अँड टेक्नॉलॉजी) हा दोन राष्ट्रांमधील सहकाराच्या प्रमुख स्तंभांमध्ये परिवर्तनात्मक बदल घडवून आणणारा एक नवीन उपक्रम आहे. ट्रम्प आणि मोदी यांनी द्विपक्षीय चर्चेनंतर 'व्हाईट हाऊस'मध्ये संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित केले. येथेच पंतप्रधानांनी या भागीदारीला मेगा असे नाव दिले, ते अमेरिकेचा मागा आणि भारताचा मिगा यांना जोडते. मोदी यांनी ट्रम्प यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन'चे वर्णन भारताच्या 'विकसित भारत संकल्प'च्या समानार्थी म्हणून केले. भारत आणि अमेरिकेचे सहकार्य एक चांगले जग घडवू शकते. ट्रम्प यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' (मागा) या ब्रीदवाक्याशी अमेरिकन लोक परिचित आहेत. अमेरिकन भाषेत विकसित भारत म्हणजे 'मेक इंडिया ग्रेट अगेन' म्हणजेच 'मिगा.' अमेरिका आणि भारत एकत्र काम करतात, म्हणजे 'मागा' अधिक 'मिगा' बनते, तेव्हा ती समृद्धीसाठी 'मेगा'भागीदारी होते. दोघांच्या उद्दिष्टांना नवीन व्यासपीठ आणि वाव देते. या संयुक्त पत्रकार परिषदेत दोन्ही नेत्यांनी भविष्यातील रणनीती सर्वांसमोर मांडली.

ट्रम्प यांनी भारत आणि चीनदरम्यान सुरू असलेल्या सीमेवरील संघर्षांचे वर्णन 'अत्यंत हिंसक' म्हणून केले आणि विवाद संपवण्यासाठी मध्यस्थीची ऑफर दिली. दोन्ही देश मिळून या समस्येवर तोडगा काढू शकतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. अर्थात भारताने अमेरिकेच्या मध्यस्थीला लगेच नकार दिला. त्याचे कारण द्विपक्षीय संबंधात भारताने तिसऱ्या राष्ट्राचा हस्तक्षेप कायम अमान्य केला आहे. आता भारत-चीन वादात ट्रम्प त्यांच्या मध्यस्थीची ऑफर किती गांभीर्याने पुढे नेतील हे पहायचे आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी नवीन योजना आखण्यात आल्या असून त्यामुळे दोन्ही देशांमधील मैत्री आणि भागीदारी आणखी घट्ट होईल. अमेरिका भारताला अब्जावधी डॉलर्सची संरक्षण उपकरणे विकणार आहे. भविष्यात भारताला एफ-३५ स्टेल्थ लढाऊ विमाने पुरवली जातील. २०१७ मध्ये अमेरिकेन प्रशासनाने 'क्वाड' सुरक्षा भागीदारी पुन्हा सक्रिय केली. त्यात भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि जपान यांचा समावेश आहे. 'इंडो-पॅसिफिक' क्षेत्रात शांतता राखण्यासाठी हे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

कट्टर इस्लामिक दहशतवादाचा सामना करण्यासाठी दोन्ही देश पूर्वीपेक्षा अधिक मजबूतपणे काम करतील, असे सांगून ट्रम्प यांनी दहशतवादाविरुद्ध भारत आणि अमेरिका यांच्या संयुक्त प्रयत्नांवर भर दिला. मोदी आणि ट्रम्प यांच्या भेटीत दोन्ही देशांमधील व्यापारी संबंध सुधारण्याचे आश्वासन देण्यात आले. अमेरिकेने दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापाराला चालना देण्यासाठी 'मिशन ५००' ची घोषणा केली आहे. 'मिशन ५००'अंतर्गत भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार २०३० पर्यंत ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत दुप्पट करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. दोन्ही नेत्यांनी आपले नागरिक अधिक समृद्ध व्हावेत, देश मजबूत व्हावेत, अर्थव्यवस्था अधिक नावीन्यपूर्ण बनावी आणि पुरवठा साखळी अधिक लवचिक बनवण्यासाठी व्यापार आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याचे वचन दिले आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी नवीन योजना आखण्यात आल्या असून त्यामुळे दोन्ही देशांमधील मैत्री आणि भागीदारी आणखी घट्ट होईल. अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या भारतीय नागरिकांना परत घेण्याच्या भारताच्याचनबद्धतेचा मोदी यांनी पुनरुच्चार केला. ट्रम्प यांनी २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणाला भारताकडे सोपवण्याची घोषणा केली. अर्थात दोन्ही देशांत प्रत्यार्पणाचा करार फार पूर्वीच झाला आहे. अमेरिकेच्या न्यायालयाने राणाच्या प्रत्यार्पणाचा आदेश दिला.

भारत अमेरिकन आण्विक तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या कायद्यात सुधारणा करणार आहे. ऊर्जेबाबतच्या महत्त्वपूर्ण करारामुळे अमेरिका भारताला तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा करणारा महत्त्वाचा देश बनणार आहे. रशिया-युक्रेन वाद सोडवण्यासाठी ट्रम्प यांनी केलेल्या प्रयत्नांचे मोदी यांनी स्वागत केले आणि हा वाद वाटाघाटीच्या टेबलवर सोडवला जावा, या भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. भारत तटस्थ आहे असा अनेकांचा गैरसमज आहे; भारत तटस्थ नाही. आम्ही शांततेच्या बाजूने आहोत, असे ते म्हणाले. भारत-अमेरिकेने १२३ नागरी आण्विक करार लागू करण्याचा संकल्प केला. भारतात अमेरिकन डिझाइन अणुभट्ट्या बांधण्यासाठी तांत्रिक सहकार्य केले जाईल आणि गुंतवणुकीला चालना दिली जाईल.

भारत-अमेरिकेसाठी अंतराळ सहकार्याचे ऐतिहासिक वर्ष म्हणून २०२५ ची घोषणा करण्यात आली. 'नासा-इस्त्रो' मिशन अंतर्गत भारतीय अंतराळवीराला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (आयएसएस) पाठवण्याची आणि 'निसार उपग्रह मोहीम' लवकरच प्रक्षेपित करण्याची योजना आहे. भारत पुढील 'क्वाड' शिखर परिषदेचा यजमान आहे. दोन्ही देश सागरी सुरक्षा आणि नैसर्गिक आपत्तींच्या काळात सहकार्य वाढवण्यासाठी नवीन उपक्रम सुरू करतील. मोदी आणि ट्रम्प यांची 'वेव्ह लेंग्थ' जुळत असली आणि दोघे परस्परांना मित्र मानत असले, तरी मोदी यांचा अमेरिकेचा दौरा संबंध दृढ करणारा ठरला; परंतु दोन्ही देशातील तिढा मोदी यांच्या भेटीनंतर ही कायम राहिला.

मोदी यांचे यापूर्वीचे अमेरिका दौरे गाजले, तसा हा दौरा फारसे हाती काही न पडता पार पडला. यापूर्वीच्या दौऱ्यांमध्ये मोदी यांचे अमेरिकेत जल्लोषात स्वागत व्हायचे. अमेरिकेबरोबरच्या करारात भारताची बाजू वरचढ असायची. या वेळी प्रथमच उलटे घडले. भारताला जशी अमेरिकेची गरज आहे, तशीच किंबहुना त्याहून अधिक दक्षिण आशियात अमेरिकेला भारताची आहे. चीन आणि रशियाला शह देण्यासाठी त्या देशाला भारताची मदत हवी आहे. एकीकडे दक्षिण आशियामध्ये भारताची गरज असताना मोदी यांच्या दौऱ्यापूर्वी अमेरिकेने इराणबाबत घेतलेल्या निर्णयाचा चाबहार बंदराच्या विकासावर परिणाम होण्याची शक्यता आहे. भारताला मध्यपूर्वेत संपर्कासाठी आणि चीन-पाकिस्तानला शह देण्यासाठी चाबहार बंदराची गरज आहे. असे असताना अमेरिकेचे इराणमधील पाऊल मात्र भारताची कोंडी करणारे आहे.

ट्रम्प यांनी मोदी यांच्याशी चर्चेनंतर घोषणा केली की भारत व्यापार तूट कमी करण्यासाठी एफ-३५ लढाऊ विमानांसह अमेरिकेकडून अधिक तेल, वायू आणि लष्करी उपकरणे खरेदी करेल; पण दोन्ही देशांनी जारी केलेल्या संयुक्त निवेदनात एफ-३५ विमानांच्या खरेदीचा कोणताही उल्लेख नाही. मोदी आणि ट्रम्प यांच्या पत्रकार परिषदेनंतर भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनीही सांगितले की सध्या एफ-३५ खरेदी करणे हा केवळ एक प्रस्ताव आहे. या खरेदीसाठी कोणतीही औपचारिक प्रक्रिया सुरू झालेली नाही. अमेरिकेच्या एफ-३५ विमानाबाबत जगभरात ओरड आहे. आता ती कुणी खरेदी करायला तयार नाही. अमेरिकेच्या शस्त्रास्त्र बाजारपेठेला आव्हान मिळाले असून थेट दक्षिण अमेरिकेतील काही देशांपर्यंत चीनची शस्त्रास्त्रे आणि आर्थिक मदतही जात आहे. या पार्श्वभूमीवर न खपणारी विमाने भारताच्या माथी मारून ट्रम्प तिथल्या शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्यांचे भले करू इच्छितात. त्याचबरोबर भारताशी असलेले व्यापारी असंतुलन कमी करण्यावर त्यांचा भर आहे.

✦✦✦

भाजपा आणि दस्तुरखुद्द नरेंद्र मोदी जाहीर सभांमधून रेवडी संस्कृतीवर टीका करत. मात्र आता तेच निवडणुकांमध्ये रेवडी संस्कृतीचा पुरस्कार करतात. दुसरीकडे, निवडणूक आयोगाची याबाबतची भूमिका दुसऱ्यांवर जबाबदारी ढकलण्याची आहे. परिणामी, ही सवंग लोकप्रियता मिळवण्याची क्लृप्ती देशभर चर्चेत रहात आहे. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत अनेकदा नाराजी व्यक्त करूनही गांभीर्याने दखल का घेतली जात नाही?




# रेवडी संस्कृतीवर प्रहार

नोंद

**शिवाजी कराळे**
विधिज्ञ

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने रेवडी संस्कृतीवर केलेले भाष्य राजकीय पक्षांच्या डोळ्यांमध्ये अंजन घालणारे आहे. लोकांना चांगल्या सवयी लावण्याची जबाबदारी असणाऱ्या राजकीय पक्षांनी तर याबाबतीत कंबरेचे सोडले आहे. भारताच्या महालेखा नियंत्रकांनी अनेकदा मोफतच्या संस्कृतीमुळे राज्यांच्या तिजोऱ्यांवर कसा दबाव येतो आणि कल्याणकारी योजना तसेच पायाभूत सुविधांना पैसे कसे उरत नाहीत, यावर कठोर टिप्पण्या केल्या आहेत. वित्तीय तूट वाढत चालली असताना राज्यांना अनेक योजना बंद कराव्या लागत आहेत. पायाभूत सुविधांची कामे निधीअभावी ठप्प झाली आहेत, दुसरीकडे मोफत धान्य, दरमहा रोख रक्कम अशा योजनांमुळे लोकांना फ ुकटची सवय लागत आहे. ती अतिशय वाईट आहे. लोकांचे कल्याण झाले पाहिजे, त्यांच्या राहणीमानाचा दर्जाही उंचावला पाहिजे, याबाबत दुमत नाही; परंतु मोफत मिळते असल्यास कष्ट कशाला करायचे, अशी वृत्ती दुर्दैवाने निर्माण होत आहे. लोक आळशी बनत आहेत. ग्रामीण भागात शेतीला जसे मजूर मिळत नाहीत तसेच शहरी भागातही छोट्या मोठ्या कामांना मजूर मिळत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने अलिकडील एका सुनावणीच्या वेळी नेमके त्यावर बोट ठेवले. मागे याच खंडपीठाने महाराष्ट्र सरकारच्या 'लाडकी बहीण योजने'वरही अप्रत्यक्ष टीका केली होती. मोफत सुविधा आणि थेट निधी उपलब्ध करून देणाऱ्या योजना लोकांना आळशी बनवत आहेत. एका याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणाचा राजकीय पक्षांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे.

या मुद्दयावर मतप्रदर्शन करताना सर्वोच्च न्यायालयाने 'असे करून आपण लोकांना परजीवी तर बनवत नाही ना' असा सवाल केला. आज निःसंशयपणे हेच केले जात असून अनेक राज्यांमध्ये उद्योगांना इतर राज्यांमधून कामगार आणावे लागत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. आज परिस्थिती अशी आहे की काही उद्योगांमध्ये कामगारांच्या कमतरतेच्या तक्रारी आहेत. काहीजण सर्वोच्च न्यायालयाच्या टिप्पणीवर काही 'किंतु-परंतु' व्यक्त करतील; परंतु काहीही न करता लोकांना पैसे किंवा फुकट सुविधा दिल्या गेल्यास काही लोक काम टाळतील, या वस्तुस्थितीपासून आपण दूर जाऊ शकत नाही. शेवटी धान्य, वीज, पाणी आणि रोख रकमेसह इतर सुविधा मोफत मिळतील, तेव्हा त्यांना काम करायला का आवडेल, असा सर्वोच्च न्यायायाचा निरुत्तर करणारा प्रश्न होता. सर्वोच्च न्यायालय लोककल्याणकारी योजनांच्या उपयुक्ततेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण करत असल्याचा कोणताही निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल, कारण लोकांना गटांमध्ये विभागण्यापेक्षा मुख्य प्रवाहाचा भाग बनवणे चांगले आहे, असे म्हटले आहे.

दुर्बल लोकांच्या आर्थिक उन्नतीसाठी योजना चालवल्या पाहिजेत. लोकांच्या उत्पन्नात वाढ करून स्वावलंबी बनण्यास मदत करणाऱ्या योजनांना प्रोत्साहन दिले पाहिजे. ते स्वतःच्या आणि देशाच्या आर्थिक उन्नतीसाठी उपयुक्त ठरू शकते. सध्या लोककल्याण आणि गरिबी निर्मूलनाच्या नावाखाली अशा अनेक योजना चालवल्या जात आहेत, ज्या लोकांना आर्थिकदृष्ट्या त्यांच्या पायावर उभे राहण्यास प्रवृत्त करत नाहीत. दुर्बल घटकांना त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी मदत करण्याऐवजी अशा योजना त्यांना परावलंबी बनवतात.

लोकांना कायमस्वरूपी सरकारी योजनांवर अवलंबून ठेवणे म्हणजे त्यांना पंगू करणे होय. गरीब मच्छीमाराला मासे देण्यापेक्षा मासे पकडण्यास सक्षम करणे अधिक चांगले आहे, हे आपल्या धोरणकर्त्यांनी समजून घेतले तर बरे होईल. सर्वोच्च न्यायालयाने कोणतेही आदेश वा निर्देश न देता केवळ रेवडी योजनांवर भाष्य केले आहे, हे खरे असले तरी त्यामुळे त्याचे गांभीर्य कमी होत नाही. मत मिळवण्यासाठी राजकीय पक्षांनी मोफत योजना जाहीर करणे योग्य नसल्याचेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. दुर्दैवाने त्याचा राजकीय पक्षांवर काहीही परिणाम झालेला नाही. उलट, अशा योजना जाहीर करण्याची स्पर्धा त्यांच्यात लागली होती. शहरी बेघरांना आश्रय देण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर अलिकडेच झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी राजकीय पक्षांच्या खोडसाळ योजनांवर निशाणा साधला. ते म्हणाले की लोकांना परजीवी बनवण्याऐवजी समाजाच्या मुख्य प्रवाहाशी जोडणे चांगले होईल; जेणेकरून ते देशाच्या कल्याणासाठीही योगदान देऊ शकतील.

सर्वोच्च न्यायालयाच्या या टिप्पणीनंतर 'रेवडी संस्कृती' आणि मोफत योजनांबाबत देशभर चर्चा सुरू आहे. ई. आर. कुमार विरुद्ध केंद्र सरकार या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. हा खटला शहरांमध्ये घरे नसलेल्या लोकांसाठी निवारा सुनिश्चित करण्याशी संबंधित आहे. ऑक्टोबर २०२२ मध्ये या प्रकरणावर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना शहरी बेघरांसाठी आश्रयस्थानांशी संबंधित स्थिती अहवाल दाखल करण्यास सांगितले होते. गेल्या वर्षी सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणा, पंजाब, दिल्ली, जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि बिहार या राज्यांकडून हिवाळ्यात शहरी बेघरांसाठी केलेल्या तात्पुरत्या व्यवस्थेची माहिती मागवली होती. तीन डिसेंबर रोजी प्रशांत भूषण यांनी या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सांगितले होते की दिल्लीतील निवारागृहांमध्ये केवळ १७ हजार लोकांना राहण्यासाठी जागा आहे. ही क्षमता दोन लाखांपेक्षा जास्त लोकांसाठी असावी.

निवारागृहांमध्ये बेघरांना कोणत्या सुविधा दिल्या जाणार आहेत, हे स्पष्ट करणारे प्रतिज्ञापत्र सरकारकडून दाखल करण्यात आले. या मुद्द्यावरून न्या. गवई संतप्त झाले. या मुद्द्याला सरकारच्या मोफत योजना देण्याच्या धोरणाशी जोडत त्यांनी एकापाठोपाठ एक प्रतिक्रिया दिल्या. या प्रकरणात स्वत: वकील प्रशांत भूषण यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडताना सांगितले, की देशात कोणीही काम करू इच्छित नाही. आपला वैयक्तिक अनुभव सांगताना न्यायमूर्ती म्हणाले, 'मी शेतकरी कुटुंबातून आलो आहे. निवडणुकीपूर्वी जाहीर झालेल्या मोफत योजनांमुळे आता महाराष्ट्रात शेतकऱ्यांना मजूर मिळत नाहीत. प्रत्येकाला घरी बसून मोफत गोष्टी मिळत आहेत.' सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेशच्या योजनेवर निशाणा साधला. 'लाडली बहन योजना' मध्य प्रदेशात लागू केली गेली. या योजनेअंतर्गत विवाहित, विधवा, घटस्फोटित आणि इतर महिलांना दरमहा १२५० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. तथापि, या योजनांचा लाभ घेण्यासाठी काही अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. दुसरीकडे, महाराष्ट्रातही गरीब कुटुंबांना मदत करण्यासाठी अनेक योजना सुरू आहेत. यापैकी महिलांशी संबंधित 'लाडकी बहीण योजना' आहे. यातून २१ ते ६५ वर्षे वयोगटातील महिलांना दरमहा १,५०० रुपयांची मदत मिळते. निवडणूक प्रचारादरम्यान महायुतीच्या नेत्यांनी या योजनेंतर्गत देण्यात येणारी मदत १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये करण्याचे आश्वासन दिले होते.

सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने मोफत रेशन योजनेचाही उल्लेख केला होता. केंद्र सरकार कोरोना व्हायरसच्या साथीच्या काळापासून देशभरातील गरजू आणि गरिबांना मोफत अन्नधान्य पुरवत आहे. ही योजना यापूर्वी किमान तीन वेळा वाढवण्यात आली आणि शेवटी डिसेंबर २०२३ पर्यंत सुरू ठेवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते; मात्र नंतर ती १ जानेवारी २०२४ पासून पाच वर्षांसाठी वाढवण्यात आली. या योजनेंतर्गत लोकांना मोफत धान्य दिले जाते. 'ऑब्झर्व्हर रिसर्च फाऊंडेशन' (ओआरएफ) च्या अभ्यासानुसार २०२२ पर्यंत सुरू झाल्यापासून २०१३ मध्ये पहिल्यांदा महिला बँक खातेधारकांसाठी सुरू केलेल्या थेट हस्तांतरण सुविधेद्वारे १६.८ लाख कोटी रुपये लाभार्थींच्या नावावर हस्तांतरित केले गेले आहेत. यातील ३३ टक्के रक्कम २०२०-२१ दरम्यान म्हणजेच कोरोनाच्या टाळेबंदीच्या काळात हस्तांतरित करण्यात आली. ३१६ सरकारी योजनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या 'डीबीटी'ने महिलांना घरातील निर्णय घेण्यास मदत केली आहे आणि त्यांचे शिक्षण आणि नोकरीच्या संधी वाढवण्यास मदत केली आहे. प्रधानमंत्री जन धन योजना, मूलभूत बचत बँक खाते उघडण्यासाठी केंद्राच्या प्रमुख आर्थिक समावेशन योजनेने केंद्राला 'डीबीटी'साठी महिला लाभार्थींची सहज ओळख पटवण्याची सोय केली आहे; परंतु आता त्याची उपयुक्तता राहिली का, हा खरा प्रश्न आहे.

✦✦✦

हरयाणा, जम्मू-काश्मीर, महाराष्ट्र आणि दिल्लीतील पराभवानंतर काँग्रेसने संघटनात्मक बदल केले. बिहार, पंजाब, लडाख, पश्चिम बंगाल आदी राज्यांमध्ये पुढील काही वर्षांमध्ये निवडणुका पार पडत आहेत. ताजे बदल किती उपयुक्त ठरतात, हे लवकरच स्पष्ट होणार आहे. राहुल गांधी काँग्रेसचे अध्यक्ष नसले, तरी त्यांनी नवी टीम निवडली आहे. ही नवी टीम पक्ष आणि कार्यकर्त्यांना पराभूत मानसिकतेतून बाहेर काढणार का?



# काँग्रेसमधील संघटनात्मक बदल

काँग्रेसच्या वाट्याला पराभवामागून पराभव येत असताना आता संघटनात्मक बदल करण्यात आले आहेत. वेगवेगळ्या जात, समूहांना संघटनात्मक फेरबदलात स्थान देण्यात आले आहे; परंतु तसे करताना दरबारी राजकारण्यांना स्थान देण्यात आले आहे. 'मासबेस' नेत्यांवर विश्वास टाकून बळ दिले असते, तर खांदेपालटाचा योग्य परिणाम दिसला असता. काँग्रेसमध्ये सध्या संघटनेत बदल होत आहेत. महाराष्ट्रातील प्रदेशाध्यक्ष आणि अन्य नेत्यांची नावे जाहीर केल्यानंतर नऊ राज्यांच्या दोन प्रभारी सरचिटणीसांची नियुक्ती करण्यात आली. या बदलांमध्ये राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्या आवडीनिवडी आणि छाप दिसत आहेत. दुसरीकडे, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या जवळच्या व्यक्तींवरही महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली; मात्र, काँग्रेसमधील काही बदलांबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. लवकरच संघटनेत आणखी काही बदल होण्याचीही शक्यता आहे. नवी जबाबदारी मिळण्याची चर्चा असलेल्यांमध्ये अशोक गेहलोत, छत्तीसगडचे माजी मंत्री आणि ज्येष्ठ नेते टी. एस. सिंहदेव, माजी युवक काँग्रेस अध्यक्ष बी. व्ही. श्रीनिवास, सचिन राव, उत्तराखंडचे माजी अध्यक्ष गणेश गोदियाल, 'एआयसीसी'चे माजी सचिव प्रकाश जोशी यांच्या नावाची चर्चा आहे. प्रियांका गांधी यांची जबाबदारीही निश्चित केली जाण्याची शक्यता आहे. सक्रिय राजकारणात आल्यापासून त्या पक्षाच्या सरचिटणीस आहेत. उत्तर प्रदेश प्रभारी म्हणून कार्यभार सोडल्यानंतर त्यांना अद्याप नवीन पदभार मिळालेला नाही. त्रिपुरा, नागालँड, ओडिशा या राज्यांचे प्रभारी असलेल्या अजयकुमार यांच्याकडे सध्या या राज्याचा कारभार सोपवण्यात आला असला, तरी त्यांच्याकडे वेगळी जबाबदारी सोपवण्यात येणार आहे. त्यांना खर्गे यांच्या कार्यालयात आणले जाऊ शकते.

काँग्रेसने खर्गे यांच्या कार्यालयाचे आणि टीमचे महत्त्वाचे सदस्य नसीर हुसेन यांना जम्मू काश्मीर आणि लडाखचे प्रभारी बनवले आहे. के. राजू यांनी राहुल गांधी यांचे कार्यालय सोडले, तेव्हा त्यांच्या जागी अजयकुमार यांना पाठवण्याची चर्चा होती; परंतु त्यांना ही जबाबदारी पेलता आली नाही. बिहारचे प्रभारी कृष्णा अलवारू या सर्व बदलांमध्ये एक मोठे आश्चर्य आहेत. सहसचिव म्हणून युवक काँग्रेसच्या प्रचाराची धुरा सांभाळणाऱ्या अलावारू यांना थेट बिहारसारख्या राजकीयदृष्ट्या अत्यंत सजग राज्याची जबाबदारी मिळाल्याने पक्षांतर्गत बरीच चर्चा आणि प्रश्न उपस्थित होत आहेत. बिहारमध्ये येत्या सहा महिन्यांमध्ये निवडणुका होणार असलेल्या अहिंदी भाषिक व्यक्तीला पदभार देण्याची पक्षाची खेळी लोकांना मान्य नाही. एकीकडे अखिलेश प्रसाद सिंग, शकील अहमद, शकील अहमद खान, कौकब कादरी यांच्यासारखे ज्येष्ठ नेते आहेत तर दुसरीकडे लालू यादव, तेजस्वी यादव यांच्यासारख्या घटक पक्षांशी समन्वय साधण्यासारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आहेत. अलवारू या दोन मोठ्या आव्हानांना कसे सामोरे जातील, हा प्रश्नच आहे. बिहारमध्ये बजावलेल्या राजकीय भूमिकेचे बक्षीस म्हणून अलवारू यांना ही जबाबदारी मिळाल्याची पक्षांतर्गत चर्चा आहे.

बिहार लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या विरोधात युवक काँग्रेसचे अध्यक्ष उदय भानू चिब यांच्यासह अलवारू यांनी बिहारमध्ये मशाल मिरवणुकीचे नेतृत्व केले. बिहारच्या आंदोलक विद्यार्थ्यांबद्दल सर्व राजकीय पक्ष सहानुभूती दाखवत असले, तरी युवक काँग्रेसने जोरदार आवाज उठवला, जो बऱ्यापैकी यशस्वी झाला. त्याचबरोबर २०१७ च्या पंजाब आणि गुजरात निवडणुकीमध्ये पडद्यामागे राहून अलवारू यांनी संघटनेशी संबंधित रणनीती आखली. त्यामुळे ते पक्षश्रेष्ठींच्या 'गुडबुक'मध्ये आले. चर्चेत किंवा प्रसिद्धीच्या झोतात न येता आपले काम करणे हा अलवारूंचा एक गुण आहे. ते राहुल यांच्या जवळचे मानले जातात. या नव्या नियुक्त्यांमध्ये अलवारू, राजू, मीनाक्षी नटराजन यासारख्या चेहऱ्यांचा राहुल गांधी यांच्या कोट्यातील म्हणून विचार केला जात आहे, तर भूपेश बघेल आणि अजयकुमार लल्लू यांचा प्रियांका गांधींच्या कोट्यातील व्यक्ती म्हणून विचार केला जात आहे. दुसरीकडे, नासिर हुसेन हे खर्गे यांचे निकटवर्तीय मानले जातात. राजस्थानचे माजी मंत्री हरीश चौधरी यांच्याकडे मध्य प्रदेशची कमान सोपवण्यात आली आहे. चौधरी यांच्या कार्यकाळात पंजाब काँग्रेसमध्ये इतका अंतर्गत कलह निर्माण झाला, की त्याची परिणती कॅप्टन अमरिंदर यांच्या पक्षत्यागात झाली आणि पुढे काँग्रेसचा लाजिरवाणा पराभव झाला. चौधरी आता दिग्विजय सिंग आणि कमलनाथ यांच्यासारख्या दिग्गजांना मध्य प्रदेशमध्ये कशी मदत करतील हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

दरम्यान, राजीव शुक्ला, मोहन प्रकाश, देवेंद्र यादव, अजयकुमार, दीपक बाबरिया आणि भरतसिंग सोलंकी यांना राज्य प्रभारी पदाच्या जबाबदारीतून मुक्त केले गेले आहे. शुक्ला हिमाचल प्रदेशचे, मोहन प्रकाश बिहारचे, देवेंद्र यादव पंजाबचे, अजयकुमार ओडिशाचे, बाबरिया हरियाणाचे, सोलंकी हे जम्मू-काश्मीरचे प्रभारी होते. यापैकी कुणीही 'मास लीडर' नव्हते. दरबारी राजकारण करण्यात त्यांची हयात गेली. आता खांदेपालट करताना ज्यांना स्थान दिले, त्यातही भूपेश बघेल वगळता अन्य कोणीही 'मासबेस' असलेला नेता नाही. निष्ठा हा त्यांच्या निवडीचा एकमात्र निकष दिसतो. बघेल यांच्याकडे पंजाब आणि हुसेन यांच्याकडे जम्मू-काश्मीरचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. पंजाबमध्ये विधानसभेच्या निवडणुका आणि 'आप'ला लागलेली घरघर लक्षात घेऊन बघेल यांच्यावर महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली आहे तर लडाखमधील संभाव्य निवडणूक लक्षात घेऊन हुसेन यांच्याकडे ती जबाबदारी देण्यात आली आहे. या बदलानंतर अखिल भारतीय काँग्रेसच्या एकूण सरचिटणीसांची संख्या १२ वरून १३ झाली आहे.

हरियाणा, जम्मू-काश्मीर, महाराष्ट्र आणि दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीमधील निराशाजनक कामगिरीनंतर काँग्रेस पक्षाने संघटनेत हा बदल केला आहे. आता या राज्यांचे प्रभारी हटवून नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हरियाणामध्ये काँग्रेसचा विजय निश्चित असल्याचे सांगण्यात येत होते. तिथे आश्चर्यकारक पराभवाला सामोरे जावे लागले. यानंतर महाराष्ट्रातही सत्ता गेली. दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही. या पार्श्वभूमीवर करण्यात आलेले फ ेरबदल किती उपयोगी ठरतात, हे येणारा काळच ठरवेल. काँग्रेस आता सामाजिक न्यायाच्या खेळपट्टीवर फलंदाजीचा प्रयत्न करत आहे. राहुल गांधी यांच्या सामाजिक न्यायाच्या घोषणेचे ते मोठे संकेत आहेत. राहुल यांनी देशभर काढलेल्या दोन यात्रांमध्ये सर्वत्र सामाजिक न्यायाच्या तत्त्वाची चर्चा केली. शोषित समाजाचे केवळ प्रतिनिधित्व न करता देशातील संस्था आणि संसाधनांमध्ये त्यांचा सहभाग असावा, असा मुद्दा राहुल यांनी जोरदारपणे मांडला. या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीमध्ये (एआयसीसी) अनेक बदल केले. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीमध्ये फेरबदलाचा एक भाग म्हणून दोन राज्यांसाठी सरचिटणीस आणि नऊ राज्यांमध्ये नवीन प्रभारींच्या नियुक्त्या करण्यात आल्या. प्रस्तावित संघटनात्मक सुधारणांमुळे काँग्रेस नेतृत्वाच्या पदांवर शोषित आणि मागासवर्गीयांचा 'समान सहभाग' सुनिश्चित होईल.

नवीन पदाधिकाऱ्यांमध्ये पाच ओबीसी, एक दलित, एक मुस्लिम, एक आदिवासी आणि तीन उच्चजातीय समुदायातील आहेत. छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल हे ओबीसी नेते असून त्यांची पंजाबचे सरचिटणीस प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तर राज्यसभा खासदार सय्यद नसीर हुसैन यांची जम्मू-काश्मीर आणि लडाखचे सरचिटणीस प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नऊ राज्यांच्या प्रभारींमध्ये सप्तगिरी शंकर उलाका (मणिपूर, त्रिपुरा, सिक्कीम आणि नागालँडचे प्रभारी) हे ओडिशातील आदिवासी नेते आहेत. अजय कुमार लल्लू यांना ओडिशाचे प्रभारी बनवण्यात आले आहे. ते ओबीसी आहेत. श्री. चोडणकर हे गोव्यातील ओबीसी भंडारी जातीचे आहेत, तर हरीश हे राजस्थानमधील बारमेर येथील ओबीसी नेते आहेत. माजी नोकरशहा के. राजू (झारखंडचे प्रभारी) हे दलित नेते आहेत, तर कृष्णा अल्लावरू (बिहार प्रभारी) हा उच्चवर्णीय चेहरा आहे. राज्यसभा सदस्य रजनी पाटील या मराठा समाजातील असून काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांच्या जवळच्या आहेत. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सहा पदाधिकाऱ्यांपैकी प्रत्येकी तीन सवर्ण आणि तीन ओबीसींचे आहेत. राजू, अल्लावरू आणि नटराजन हे राहुल यांच्या कोअर टीमचा भाग आहेत.

अशा प्रकारे विविध जाती, धर्म, गटतट आणि ज्येष्ठ नेत्यांच्या मर्जीतल्यांना फेरबदलांमध्ये स्थान देत काँग्रेसने नव्याने नशीब आजमवायचा प्रयत्न केला आहे. त्याला कितपत यश येते ते पहायचे.

✦✦✦

# भटकती आत्म्याच्या बाजूला पीएमओने कसे बसू दिले?



■ **मुंबई :** शरद पवार हे मोदींपेक्षाही सिनियर आहेत. सत्तेच्या पदावर कोणी बसला म्हणजे तो ज्येष्ठ आणि श्रेष्ठ होत नाही. साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष हे शरद पवार आहेत. वास्तविक मोदी शरद पवार यांच्या बाजूला बसणार नाहीत असे मला वाटले होते. कारण भटकती आत्म्याच्या बाजूला पीएमओने त्यांना कसे बसू दिले? असा प्रश्न खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला. मोदींनी शरद पवार यांना दिलेला मान-सन्मान हा केवळ ढोंगीपणा आहे. त्यांचे केवळ 'देखिल्या देवाला दंडवत' असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.

दिल्लीतील अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार एकमेकांच्या बाजूला बसले होते. त्यांच्यात बराच वेळ चर्चा देखील रंगली होती. तर नरेंद्र मोदी शरद पवारांची काळजी घेताना देखील दिसून आले. या सर्वांची चर्चा सुरु असताना संजय राऊत यांनी मोदींवर निशाणा साधला आहे. नरेंद्र मोदी शरद पवार यांना भटकती आत्मा म्हणाले होते. त्यावरुन त्यांच्या बाजूला मोदी कसे बसले? नरेंद्र मोदी यांना शरद पवार यांना दिलेला आदर आणि मान-सन्मान हा व्यापार आणि ढोंग आहे, हे केवळ तेवढ्यापुरते मर्यादित होते असा आरोपही त्यांनी केला.

## कोरेगाव भीमा प्रकरणात तीन अँगल



■ **मुंबई :** मागच्या तारखेला लेखी स्वरूपात सगळ देण्यात आलं होतं. त्यावेळी एक मुद्दा आम्ही मांडला होता की पोलिस आयुक्त पुणे शहर आणि ग्रामीण पोलिस अधिक्षकांचे वर्जन वेगळे आहेत. ग्रामीण पोलीस भिडे आणि एकबोटे यांच्यावर इशारा करत होते तर पुणे पोलिस नक्षलवादी यांच्याकडे बोट करत आहेत. तिसरा अँगल शरद पवार यांनी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना या बाबतीत एक पत्र लिहिलं होतं. त्या पत्रात पवारांनी राईट विंग वरती आरोप केले होते, असं प्रकाश आंबेडकर कोरेगाव भीमा सुनावणीबाबत म्हणाले.

कमिशन समोर त्याबाबतही कुठलीच कागदपत्रे न्हवती. त्या संदभार्तील सगळी कागदपत्रे मी सादर केले आहेत. हे पत्र पवारांनी ठाकरेंना लिहिलं होतं. आयोगाने पत्र स्वीकारले आहे. पुन्हा सुनावणी आयोगासमोर होणार आहे. पुढील सुनावणीत पवारांची साक्ष घेणे गरजचे आहे का, हे तपासणार आहेत. गरज पडली तर पवारांना बोलणार असे आयोगाने सांगितलं आहे. तीन अँगल आहेत ते तिन्ही तपासणार आहेत. पत्रात अनेक उजव्या संघटनेची नावे आहेतद्ध असं प्रकाश आंबेडकर कोरेगाव भीमा सुनावणीबाबत बोलताना म्हणाले.

जरांगे यांना कंट्रोल करण्यासाठी धस यांना पुढे करण्यात आलं आणि आता भाजपने धस यांनाच संपवलं. आरोप सिद्ध झाले तर मुंडेंनी राजीनामा दिला तर योग्य, दमानिया यांनी कोर्टात पुरावे सादर करावे, असेही प्रकाश आंबेडकर या प्रकरणात बोलताना म्हणाले.

## आरोपींना कारागृहात व्हिआयपी ट्रिटमेंट



■ **बीड :** संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा तपास अंतिम टप्प्यात आहे. यातील फरार आरोपी कृष्णा आंधळेला अटक होणे गरजेचे असून त्यांना फरार करणाऱ्यावरही कारवाई झाली पाहिजे. ग्रामस्थांच्या आठ मागण्या मान्य झाल्या तर त्यांना आंदोलन करण्याची वेळ येणार नाही, असे भाजप आमदार सुरेश धस यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, पंकज कुमावत यांना बीडचे अॅडिशनल एसपी म्हणून नियुक्त केले पाहिजे. तर पोलिसांचे हेड बदलले तर पोलिसही बदलावे अशी मागणी त्यांनी केली.

सुरेश धस म्हणाले की, आरोपींना जेलमध्ये व्हीआयपी ट्रिटमेंट मिळेत आहे, याचे सर्व पुरावे आहेत, असा आरोपही त्यांनी यावेळी बोलताना केला आहे. हे प्रकरण १०० टक्के जलदगती न्यायालयात चालणार असेही त्यांनी म्हटले आहे. एसआयटीमध्ये दोन सायबर तज्ञ असायला हवे अशी मागणी मी केली आहे. महाजन आणि राजेश पाटील यांच्यावर सहआरोपी म्हणून कारवाई करण्यात यावी. कृष्णा आंधळे याला अटक झाली पाहिजे. कारण त्यांचे बगलबच्चे जर ३०७ सारखा गुन्हा करत आहे. आरोपी जेव्हा कोर्टात तारखेसाठी येत आहे तेव्हा त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी केस वाढलेले चित्र-विचित्र लोकं येत आहे. यासह वाशी पोलिस स्टेशनेचे गिते, फड, यांचे सीडीआर तपासून त्यांना सहआरोपी करावे अशी मागणी ग्रामस्थांची आहे.

### उदय सामंत सकाळीच राज ठाकरेंच्या भेटीला

# शिवसेना-मनसे युतीचे संकेत?

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ :**

महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाच्या घडामोडी घडत आहेत. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे नेते आणि राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आज सकाळीच राज ठाकरे यांच्या भेटीसाठी शिवतीर्थवर पोहोचले. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या.



या भेटीमागे अनेक राजकीय समीकरणं आहेत. उदय सामंत हे राज ठाकरे यांच्या भेटीसाठी आले. ही सदिच्छा आणि राजकीय भेट असल्याची माहिती मिळत आहे. मनसे नेते संदीप देशपांडे, अभिजित पानसे या भेटीच्यावेळी तिथे उपस्थित असल्याची माहिती आहे. राजकीय चर्चा देखील या भेटीत अपेक्षित आहे. पुढच्या काही महिन्यात महापालिका आणि विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लागू शकतात. त्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.

सध्या एकनाथ शिंदे यांनी पक्ष विस्तार आणि संघटना बळकट करण्याकडे लक्ष दिलं आहे. राज्यभरातून ठाकरे गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने शिवसेनेत सहभागी होत आहेत. ठाकरे गटाला कमकुवत करण्याची शिंदे यांची रणनिती आहे. त्यात मुंबई महापालिकेची निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे.

मुंबई महापालिका जिंकण्यासाठी भाजप, शिवसेना, ठाकरे गट आणि मनसे हे चारही पक्ष सर्वात ताकद पणाला लावतील. मागची अनेक वर्ष मुंबई महापालिका ठाकरे गटाचा मुख्य आधार राहिली आहे. हाच आधार हिसकावून घेण्याचा शिवसेना-भाजपचा प्रयत्न आहे.

विधानसभा, लोकसभा निवडणुकीत भाजप मनसेसोबत युती करण्यासाठी तयार होती. पण एकनाथ शिंदे यांच्या विरोधामुळे मनसेचा महायुतीत सहभाग होऊ शकला नाही, असं राज ठाकरे यांचं मत आहे. यावरुन मनसे आणि शिंदे शिवसेनेत असलेली कटुता दूर करणं हा सुद्धा उदय सामंत यांच्या भेटीमागे एक उद्देश असू शकतो.

उदय सामंत हे एकनाथ शिंदे यांचे दूत म्हणून भेटायला आले आहेत. महापालिका निवडणुकीत भाजप मनसे युती व्हावी यासाठी प्रयत्न सुरु आहेत. शिवसेना आणि मनसेत कटुता राहू नये यासाठी एकनाथ शिंदे यांनी उदय सामंत यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरु केलेत.

विधानसभा निवडणुकीत मनसे उमेदवारांमुळे आठ ठिकाणी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे उमेदवार पराभूत झाले होते. अशी परिस्थिती पुन्हा उदभवू नये, यासाठी खबरदारी म्हणून मनसेशी जुळवून घेण्याचे प्रयत्न सुरु झालेत. भाजप मनसे सोबत युती करण्याचे संकेत देत आहे. आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने सुद्धा मनसेसोबत डायलॉग सुरु केला आहे.

# आदेशाची प्रत मिळाली की माणिकराव कोकाटेंवर कारवाई

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ :**



राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना कोर्टाने २ वर्षांची शिक्षा ठोठावली. हा आदेश होऊन २ दिवस लोटलेत. पण विधानसभा अध्यक्षांकडून अद्याप त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यात आली.

याविषयी विरोधकांनी टीकेची झोड उठवल्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी न्यायालयाच्या आदेशाची प्रत मिळताच या प्रकरणी कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. दरम्यान, काँग्रेस नेत्यांवर अशा प्रकरणात यापूर्वी अवघ्या २४ तासांत कारवाई करण्यात आली होती हे विशेष.

राज्याचे कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांना नाशिक स्थित न्यायालयाने १९९५ च्या एका प्रकरणात २ वर्षांची कैद व ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावली आहे. या प्रकरणी कोकाटे बंधूंवर एक नव्हे तर चार सदनिका लाटल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी त्यांना जामीन मंजूर झाला आहे. पण लोकप्रतिनिधित्व कायद्यातील तरतुदींनुसार कोकाटे विधानसभा सदस्यत्वासाठी अपात्र ठरतात. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर त्यांच्यावर केव्हा कारवाई करणार? असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला आहे.

याविषयी पत्रकारांनी राहुल नार्वेकर यांना छेडले असता त्यांनी न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षेची प्रत विधिमंडळ सचिवालयाला प्राप्त होताच अपात्रतेच्या संदर्भात कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट केले. यामुळे माणिकराव कोकाटे यांची आमदारकी व मंत्रिपद संकटात सापडल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, माणिकराव कोकाटे यांना शिक्षा होऊन दोन दिवस लोटले तरी विधानसभा सचिवालयाला न्यायालयीन आदेशाची प्रत कशी काय मिळाली नाही? असा सवालही उपस्थित केला जात आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे काँग्रेसने माणिकराव कोकाटेंवर अपात्रतेची कारवाई करण्यात हेतुपुरस्सर दिरंगाई होत असल्याचा आरोप केला आहे. काँग्रेसचे तत्कालीन आमदार सुनील केदार यांना बँक घोटाळ्याप्रकरणी दोषी ठरवल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यात आली होती.

विधिमंडळ सचिवालयाने तशी अधिसूचनाही काढली होती. तत्पूर्वी राहुल गांधी यांचे लोकसभेचे सदस्यत्वही अशाच पद्धतीने २४ तासांत रद्दबातल करण्यात आले होते. पण माणिकराव कोकाटेंच्या बाबतीत अद्याप अशी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, असा आरोप काँग्रेसने केला आहे.

लोकप्रतिनिधित्व कायद्यातील तरतुदींनुसार, एखाद्या लोकप्रतिनिधीला दोन वर्षे किंवा त्याहून अधिकची शिक्षा झाल्यास तो सदस्य त्या तारखेपासून अपात्र ठरतो. त्यामुळे माणिकराव कोकाटे यांच्या विधानसभा सदस्यत्वावर अपात्रतेटी टांगती तलवार उभी टाकली आहे.

# नावाच्या पाट्या इंग्रजीत : मराठी साहित्य संमेलनात मराठीचा अपमान?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उदघाटन दिल्लीत झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीतून सुरुवात केली. मात्र, आयोजक हे मराठी साहित्य संमेलन आहेत हे विसरले की काय? अशी शंका आली.

देशाच्या राजधानीत मराठीवर प्रेम करणारी मंडळी मराठी भाषेसाठी, मराठीवरील त्यांच्या प्रेमासाठी एकत्र आली असताना व्यासपीठावरील पाहुण्यांच्या नावाच्या पाट्या मात्र चक्क इंग्रजीत होत्या. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजकांनी एबीएमएसएस असे नामकरण देखील करून टाकले.

इंग्रजीचा पगडा अजूनही आपल्यावर कायम असल्याचे या संमेलनात दिसून आले. एक तर उदघाटन बंद सभागृहात करण्यात आले, जे आजवरच्या साहित्य संमेलनात कदाचित पहिल्यांदाच झाले असावे. संमेलन मराठी भाषेतील साहित्याचे आणि




व्यासपीठावरील आमंत्रितांच्या नावाच्या पाट्या चक्क इंग्रजीत लिहिलेल्या होत्या. त्यातही कहर म्हणजे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे संक्षिप्त स्वरूप चक्क एबीएमएसएस असे करण्यात आले. त्यामुळे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाताच माय मराठीची आयोजकांनी केलेली ही अवस्था पाहून माय मराठीवरील त्यांच्या प्रेमावर शंका उपस्थित करणारे होते.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाताच इंग्रजी भाषेत सन्माननीय आमंत्रितांच्या नावाच्या पाट्या मराठीतून नाही तर इंग्रजीतून लिहून माय मराठीचा सन्मान नाही तर अवमान करण्यात आल्याची चर्चा आहे.

## जामिनावरील आसारामचे इंदूरमध्ये प्रवचन

■ **वृत्तसंस्था, इंदूर, दि. २२ :**

अल्पवयीन आणि महिलेवरील बलात्कार प्रकरणात शिक्षा भोगत असलेला आसाराम जामीन मिळाल्यानंतर इंदूरला पोहोचला आहे. येथे तो न्यायालयाने दिलेल्या जामीन अटींचे उल्लंघन करून उपदेश करत आहे. तो समर्थकांना भेटत आहे आणि मोकळेपणाने बोलत आहे.

आसारामचे प्रवचन ऐकण्यासाठी त्याच्या आश्रमात हजाराहून अधिक लोक जमले आहेत. याआधी पालनपूर (गुजरात) आश्रमाचा एक व्हिडिओही समोर आला होता, ज्यामध्ये तो एकत्रितपणे भक्तांना भेटताना दिसत होता. आसारामला प्रवचन न देण्याच्या अटीवर जामीन मिळाला आहे.

शुक्रवारी दुपारी खंडवा रोडवरील आसारामच्या आश्रमात पाहणी केली असता आश्रमात फारसे कार्यक्रम नव्हते. आश्रमाबाहेर तैनात असलेले रक्षक कोणालाही थांबू देत नव्हते. दुपारी २ नंतर आश्रमात येणाऱ्या लोकांची संख्या वाढू लागली. आश्रमाच्या सुमारे ३०० मीटर आधी रक्षकांनी लोकांचे मोबाईल फोन बंद केले आणि प्रवेश करण्यापूर्वी मोबाईल आणि स्मार्ट घड्याळे जमा करण्यात आली.

सायंकाळच्या सुमारास आश्रमात एक हजाराहून अधिक लोक बसून आसारामचे प्रवचन ऐकत होते. प्रवचनाच्या वेळी कडक सुरक्षा व्यवस्था होती. आसारामच्या डाव्या बाजूला एक पोलिस कर्मचारी तैनात होता आणि उजव्या बाजूला सीआरपीएफ गणवेशातील एक कर्मचारी तैनात होता. प्रवचन दोन कॅमेऱ्यांनी रेकॉर्ड केले जात होते.

## मातोश्रीवर चाटुगिरी करणाऱ्यांची फौज

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**

उद्धव ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीच्या काळात हिंदुत्वाची लाईन घेण्यापासून रोखले होते. आदित्य ठाकरे आणि वरुण सरदेसाई यांच्या विजयासाठी मुस्लिम मतांची आवश्यकता होती. त्यामुळे आम्हाला विधानसभा निवडणुकीच्या काळात हिंदुत्वाची लाईन घेण्यापासून उद्धव ठाकरे यांनी रोखले असल्याचा गंभीर आरोप पक्षातून हकालपट्टी झाल्यानंतर किशोर तिवारी यांनी केला आहे.

संजय राऊत यांच्यामुळे पक्षाचे विश्वसनीयता खालावली असून उद्धव ठाकरे यांनी चाटुगिरी करणाऱ्यांची फौज गोळा केली असल्याचा आरोप देखील तिवारी यांनी केला आहे.

एक वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमांमध्ये उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या बाबतीत केलेल्या वक्तव्यामुळे नागपूर येथील पक्षाचे प्रवक्ते किशोर तिवारी यांची हकालपट्टी करण्यात आली होती. वृत्त वाहिनीवरील कार्यक्रम संपल्यानंतर अवघ्या पंधरा मिनिटातच मला पदावरून काढण्यात आले, असा गौप्यस्फोट देखील तिवारी यांनी केला आहे.

तिवारी म्हणाले, उद्धव ठाकरे यांना भेटण्यासाठी स्वतःचे पैसे खर्च करून किमान दहा वेळा मी मुंबईला गेलो होतो. मात्र उद्धव ठाकरे यांची कधीच भेट झाली नाही. उलट मला हाकलून देण्यात आले. ठाकरे यांनी कधीच संवाद साधला नाही. ते मला फक्त एकदा भेटले आणि तुमच्याशी शांतपणे भेटायचे आहे, असे सांगितले. मात्र ती वेळ आजपर्यंत आलीच नसल्याची खंत तिवारी यांनी बोलून दाखवली.

### आदित्य पांचोलीला

# शिक्षा माफ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**



वीस वर्षांपूर्वी गाडी उभी करण्याच्या वादातून एकाला मारहाण केल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या अभिनेता आदित्य पांचोली याला सत्र न्यायालयाने दिलासा दिला आहे. या प्रकरणी त्याला दोषी ठरवण्याचा आणि एक वर्षाची शिक्षा सुनावण्याचा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय न्यायालयाने योग्य ठरवला, मात्र चांगल्या वर्तनामुळे न्यायालयाने त्याची शिक्षा माफ केली. त्याचवेळी, तक्रारदाराला दीड लाख रुपये भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने पांचोली याला दिले.

साधारणतः २० वर्षांपूर्वी ही घटना घडली असून आरोपी ७१ वर्षांचा आहे, शिवाय तो एक प्रसिद्ध अभिनेता आहे. त्याची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही आणि गाडी उभी करण्यावरून झालेल्या वादातून अचानक त्याच्या हातून हे कृत्य घडले. कनिष्ठ न्यायालयाने प्रकरणाचा निकाल देताना या पैलूंचा पुरेसा विचार केलेला नाही. आरोपीने क्रूर पद्धतीने कृत्य केलेले नाही. शिक्षेत बदल करावा, असे सांगत न्यायालयाने पांचोली याला शिक्षेत माफी दिली.

### आरे- बीकेसी मेट्रो ३ प्रवासी संख्या वाढविण्याचे

# एमएमआरसीसमोर आव्हान



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**

कुलाबा ते वांद्रे ते सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेवरील आरे - बीकेसी मार्गिकेवरून प्रतिदिन चार लाख प्रवासी प्रवास करतील अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात या मार्गिकेवर प्रतितिन केवळ २० हजार प्रवासी प्रवास करीत आहेत.

७ ऑक्टोबर २०२४ ते २० फेब्रुवारी २०२५ या चार महिन्यांमध्ये केवळ २६ लाख ६३ हजार ३७९ प्रवाशांनी मेट्रो ३मधून प्रवास केला. ही प्रवासी संख्या अत्यंत कमी असून प्रवासी संख्या वाढविण्याचे आव्हान मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन समोर (एमएमआरसी) आहे.

कुलाबा - वांद्रे - सीप्झ भुयारी मेट्रो ३ मार्गिकेचे काम एमएमआरसी करीत आहे. या मार्गिकेवरील आरे - बीकेसी दरम्यानचा १२.६९ किमी लांबीचा टप्पा ऑक्टोबर २०२४ मध्ये वाहतूक सेवेत दाखल झाला. त्यामुळे मुंबईकरांचे भुयारी मेट्रोतून प्रवास करण्याचे स्वप्न पूर्ण झाले. मुंबईतील ही पहिली भुयारी मेट्रो असून प्रवास अतिजलद होण्याच्या शक्यतेमुळे या मार्गिकेला मुंबईकरांकडून प्रचंड प्रतिसाद मिळेल, असा अंदाज होता. आरे - बीकेसी मार्गिकेवरून प्रतिदिन चार लाख प्रवासी प्रवास करतील, असा अंदाज एका अभ्यासानुसार व्यक्त करण्यात आला आहे. पण आरे - बीकेसी मार्गिका सुरू होऊन चार महिने उलटले तरी दैनंदिन प्रवासी संख्या जेमतेम २० हजारावर पोहोचली आहे.

एमएमआरसीने दिलेल्या माहितीनुसार ७ ऑक्टोबर २०२४ ते २० फेब्रुवारी २०२५ दरम्यान आरे झ बीकेसी मार्गिकेवरून एकूण २६ लाख ६३ हजार ३७९ प्रवाशांनी प्रवास केला. चार महिन्यांतील एकूण प्रवासी संख्या लक्षात घेता प्रतिदिन प्रवासी संख्या सरासरी २० हजार इतकी होत आहे. चार महिने झाले तरी प्रवासी संख्या वाढू शकलेली नाही. त्यामुळे आता प्रवासी संख्या वाढविण्याचे आव्हान एमएमआरसीसमोर आहे.

## मध्य, पश्चिम रेल्वेवर रविवारी मेगाब्लॉक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**

मध्य, पश्चिम रेल्वेवरील विविध अभियांत्रिकी आणि देखभालीची कामे करण्यासाठी रविवारी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. मुख्य मार्गावर ठाणे ते कल्याण स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावर सकाळी १०.४० ते दुपारी ३.४० पर्यंत मेगाब्लॉक असेल. ब्लॉक कालावधीत ठाणे - कल्याण स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावरील लोकल सेवा, धीम्या मार्गावर वळवण्यात येणार आहेत.



ट्रान्सहार्बर मार्गावर ठाणे - वाशी / नेरुळ स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन मार्गावर सकाळी ११.१० ते दुपारी ४.१० पर्यंत मेगाब्लॉक असेल. ब्लॉक कालावधीत ठाणे - वाशी/नेरुळ/पनवेल स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन मार्गावरील लोकल सेवा रद्द करण्यात आली आहे.

पश्चिम रेल्वे मार्गावर सांताक्रूझ - गोरेगाव स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावर सकाळी १० ते दुपारी ३ पर्यंत मेगाब्लॉक असेल. ब्लॉक कालावधीत सांताक्रूझ - गोरेगाव स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावरील लोकल सेवा, धीम्या मार्गावर चालवण्यात येणार आहे. त्यामुळे काही लोकल रद्द करण्यात येणार आहेत.

# मुंबई-पुणे टॅक्सी स्टँडला वडाळा येथील रहिवाशांचा विरोध

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ :**

माटुंगा (पूर्व) येथील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीच्या (आयसीटी) मागील रस्त्यावर तिसरा मुंबई-पुणे टॅक्सी स्टँड बांधण्यात येणार आहे.

मात्र, या प्रस्तावाला वडाळा (पश्चिम) येथील रहिवाशांचा विरोध असून जागेच्या पुनर्विचाराच्या मागणीसाठी त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायालयानेही रहिवाशांच्या याचिकेची दखल घेऊन राज्य परिवहन अधिकाऱ्यांना त्यावर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.




वडाळा (पश्चिम) सिटीझन्स फोरमने याचिकेद्वारे ८ ऑगस्टचा संयुक्त सर्वेक्षण अहवाल आणि मुंबई-पुणे टॅक्सी मालक संघटनेला जागा देण्याचा प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा (आरटीओ) २ सप्टेंबरचा आदेश रद्द करण्याची मागणीही केली आहे. मुंबई - पुणे टॅक्सी स्टॅण्डसाठी जागा उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी सर्वेक्षण करण्यात आले नाही किंवा रहिवाशांचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला नाही. प्रस्तावित जागेचा परिसर हा निवासी आणि शैक्षणिक क्षेत्र आहे. या परिसरात मुलींचे वसतिगृहदेखील आहे. त्यामुळे या परिसरात टॅक्सी स्टॅण्ड बांधण्यात आल्यास त्याचा तेथील रहिवाशांच्या दैनंदिन जीवनावर, पर्यावरणावर आणि महिलांच्या सुरक्षिततेवर मोठ्या प्रमाणात परिणाम होईल, असा दावाही याचिकेत करण्यात आला आहे.

हे टॅक्सी स्टॅण्ड २४ तास सुरू राहून त्यामुळे परिसरात वाहतूक कोंडींची समस्या वाढेल, परिसरातील शांतता, वनस्पती आणि प्राण्यांवरही परिणाम होईल. तसेच, रहिवाशांना सार्वजनिक जागा वापरण्यापासून वंचित ठेवले जाईल. महिलांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होईल, असे याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे. या स्टॅण्डसाठी जवळच्या बेस्ट बस आगारासारख्या पर्यायी ठिकाणांचा शोध घेण्यात आणि त्यांचा विचार करण्यास प्रतिवादी अपयशी ठरले आहेत.

कोणत्याही सारासार विचाराशिवाय शांतता क्षेत्रात अशा स्टँडला परवानगी देण्याच्या प्रतिकूल परिणामांबाबत आयसीटी आणि परिसरातील इतर सर्व संस्थांनी नाराजी व्यक्त केल्याचा दावाही याचिकाकर्त्यांनी याचिकेत केला आहे.

न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठापुढे रहिवाशांच्या याचिकेवर नुकतीच सुनावणी झाली. त्यावेळी, न्यायालयाने राज्य सरकारसह मुंबई झ पुणे टॅक्सी मालक संघटनेला याचिकेवर उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले.

# महाकुंभ : स्थानिकांची मोठी गोची

प्रयागराज महाकुंभादरम्यान ५९ कोटींहून अधिक लोकांनी संगमात स्नान केले आहे. यामुळे शहरी लोकांना अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. लोक एका प्रकारे त्यांच्याच घरात 'कोंडलेले' आहेत. शहरातील एका चौकातून दुसऱ्या चौकात जाण्यासाठी लोकांना ४ ते ५ तास लागत आहेत. याशिवाय, दूध आणि ब्रेडसारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तू मिळण्यात खूप अडचण येते. उत्तर प्रदेश बोर्डाने 24 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षा रद्द केल्या आहेत. त्या दिवसाची परीक्षा नंतर घेतली जाईल.

-----------------

शहरातील रस्त्यांवर बॅरिकेडिंग करण्यात आले आहे. त्यामुळे जवळपास राहणाऱ्या लोकांना अडचणी येत आहेत. प्रयागराज येथील ५० वर्षीय विद्यासागर मिश्रा म्हणतात, माझ्या आयुष्यात आजपर्यंत घराबाहेर रस्त्यावर कधीही वाहतूक कोंडी झालेली नाही. मी जवळजवळ ५० वर्षांपासून या शहरात राहत आहे. पण आता परिस्थिती अशी आहे की आपण घराबाहेर पायीही जाऊ शकत नाही. आता महाकुंभाची प्रसिद्धी थांबवली पाहिजे आणि लोकांना येथे येण्यापासून रोखले पाहिजे. हे सर्वांच्या हिताचे आहे. येथे वर्षानुवर्षे राहणारे लोकही त्याबद्दल उघडपणे बोलत आहेत.

विविध ठिकाणी बॅरिकेडिंगमुळे लोकांना त्यांचे दैनंदिन काम करता येत नाही. अमृत स्नान संपल्यानंतर शहरात गर्दी कमी होईल असे मानले जात होते, परंतु तसे होताना दिसत नाही. दररोज एक कोटींहून अधिक भाविक येत आहेत. प्रयागराज शहरातील लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

शहरातील जवळजवळ सर्व शाळा बंद आहेत. दोन महिन्यांपासून हीच परिस्थिती आहे. ऑनलाइन वर्ग सुरू आहेत. प्रशासनानेही जाहीर केले आहे की जर परीक्षा चुकली तर ती दुसऱ्या तारखेला घेतली जाईल. विद्यार्थी आणि शिक्षक वेळेवर महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे अभ्यासावर परिणाम होत आहे. योग्य वर्ग घेतल्याशिवाय अभ्यास कसा करायचा? हा प्रश्न विद्यार्थ्यांना भेडसावतो आहे.

स्थानिक लोकांसमोर आणखी एक मोठी समस्या आहे. गरज असताना त्यांना ऑटो आणि ई-रिक्षाही मिळत नाहीत. यामुळे त्यांना कुठेही जाता येत नाही. विद्यार्थिनी झैनब म्हणते, अनेक स्पर्धा परीक्षा घेतल्या जात आहेत, ज्यांचे केंद्र १० किमीच्या आत दिले जातात. त्या केंद्रांवर पोहोचण्यासाठी लोकांना वाहतुकीचे अनेक मार्ग बदलावे लागतात. त्यानंतरही काही लोक वेळेवर पोहोचू शकत नाहीत. तसेच, प्रचंड गर्दी आणि वाहतूक कोंडीमुळे, डिलिव्हरी ॲप्स देखील शहरात वस्तू पोहोचवत नाहीत.

एखाद्याची तब्येत बिघडल्यावर रुग्णालयात पोहोचणे हे एका आव्हानापेक्षा कमी नाही. उपचार घेण्यापूर्वीही लोकांना दहा वेळा विचार करावा लागतो. अतुल न्याय म्हणतात, स्थानिक लोकांसाठी सर्वात मोठी समस्या म्हणजे ते बाहेर जाऊ शकत नाहीत. आपण कोणत्याही कामासाठी बाहेर जाऊ शकत नाही किंवा फिरायलाही जाऊ शकत नाही. जरी आपण बाहेर पडू शकलो तरी एका चौकातून दुसऱ्या चौकात पोहोचण्यासाठी ४-५ तास लागतात. हा खूप मोठा प्रश्न आहे.

शहरात गाडी बाहेर काढणे खूप कठीण झाले आहे. अनेक ठिकाणी तर सायकल चालवणेही कठीण झाले आहे. याशिवाय, येथील स्थानिक लोक बाहेरून येणाऱ्या लोकांचे स्वागत करण्यात कोणतीही कसर सोडत नाहीत. प्रत्येकजण शक्य तितकी मदत करत आहे.

दुकानदारांनाही अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. बऱ्याच वेळा वस्तूंच्या कमतरतेमुळे आपल्याला आपली दुकाने बंद करावी लागतात. गर्दी अचानक वाढल्यामुळे दुकानांमधील



**1** शाळा बंद आहेत. बोर्डाच्या परीक्षा आहेत.
ऑनलाइन अभ्यास सुरू आहेत. मुले तयार होत नाहीत.

**2** ऑटो, ई-रिक्षा उपलब्ध नाहीत. तुम्हाला मिळत असेल तर ते भरले आहे.
लोकांना तुकड्या तुकड्यांमध्ये प्रवास करावा लागतो.

**3** कामावर जाण्यासाठी दोन तास आधी घर सोडावे लागेल.
पोहोचायलाही दोन ते तीन तास लागतात.

**4** दुकानांचा माल संपला आहे. बॅरिकेड्स आणि जाममुळे ग्राहक येत नाहीत.

**बंद** शहरातील गजबजलेल्या भागात डिलिव्हरी ॲप्सने काम करणे बंद केले आहे. ऑर्डर घेत नाही. याची दोन कारणे आहेत. प्रथम - जाम, दुसरा - वेअरहाऊसमध्ये उत्पादन संपत आहे.

साहित्य संपण्याच्या मार्गावर आहे. दैनंदिन वापराच्या वस्तू दुकानांपर्यंत पोहोचू शकत नाहीत. या कारणास्तव बहुतेक दुकानदारांना त्यांची दुकाने बंद करावी लागत आहेत.

दुकानदार धर्मेंद्र त्रिपाठी म्हणतात, 'इतक्या गर्दीमुळे व्यवसायात खूप समस्या येत आहेत. हे गैरवर्तन स्टेशनकडे जात असल्याने सर्व रस्ते सील करण्यात आले आहेत. त्यामुळे ये-जा करण्यात खूप अडचण येते. आपल्याला येणारा लांब मार्ग स्वीकारावा लागेल. शिवाय, वस्तू पोहोचवण्यात खूप अडचण येते.

जे काही छोटे सामान आणता येते ते पायीच आणले जाते, वाहतुकीचे दुसरे कोणतेही साधन नाही. रस्त्यांच्या सुरुवातीला बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत, त्यामुळे ग्राहक येऊ शकत नाहीत. सध्या फक्त १०% व्यवसाय सुरू आहे.

दुकानदार अनुज जयस्वाल म्हणतात, वाहतूक कोंडीची समस्या गंभीर आहे. दुकानात महिनाभरापासून कोणताही माल नाही. संपूर्ण दुकान रिकामे झाले आहे. असे झाल्यास, लोकांना अन्न मिळण्यातही अडचणी येऊ शकतात. या कारणामुळे वस्तूंचा काळाबाजारही होत आहे. दुकानदारांना जास्त किमतीत वस्तू मिळत आहेत, त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान होत आहे. जवळजवळ सर्वत्र दुकाने रिकामी आहेत, फक्त दूध आणि ब्रेड उपलब्ध आहेत.

व्यापारी राजेश चौरसिया म्हणाले, प्रयागराजची वाहतूक व्यवस्था पूर्णपणे अराजक झाली आहे. आता इतक्या मोठ्या संख्येकडे पाहता असे दिसते की हा संपूर्ण महिना असाच जाईल. २९ जानेवारी रोजी मौनी अमावस्येला जत्रेत जी गर्दी होती, तीच गर्दी आजही दिसून येते.

जनता सहमत नाही. ते म्हणाले, आम्ही जनतेला हात जोडून विनंती करत आहोत की त्यांनी त्यांच्या भेटी कमी कराव्यात. गंगा आई कुठेही जात नाही. तुम्ही सर्वजण नंतर या आणि संगमात स्नान करा. यावेळी सर्वत्र मोठी गर्दी असते. वाहतुकीची साधने उपलब्ध नाहीत.

ऑफिसला जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोन तास आधी निघावे लागते. परत येण्यासाठी आणखी दोन ते तीन तास लागतात. अशा परिस्थितीत, सामान्य माणसाची सामान्य कामाची पाळी १३-१४ तासांची झाली आहे. वैद्यकीय कर्मचारी पूजा म्हणते, महाकुंभामुळे मला दररोज किमान ७-८ किलोमीटर किंवा त्याहून अधिक चालावे लागते. यामुळे आपण वेळेवर रुग्णालयात किंवा घरी पोहोचू शकत नाही. त्यामुळे रुग्णांनाही अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आम्ही कधीच कल्पना केली नव्हती की इतकी गर्दी होईल.

२६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री स्नानाने महाकुंभ मेळाव्याची सांगता होईल. आजपासून महाकुंभमेळ्याला फक्त ३ दिवस उरले आहेत, आतापर्यंत ५९ कोटींहून अधिक भाविकांनी महाकुंभात स्नान केले आहे. मौनी अमावस्येला झालेल्या चेंगराचेंगरीनंतर प्रशासनाच्या कडक कारवाईमुळे बहुतेक भाविकांनी यात्रा पुढे ढकलली होती.

अशा परिस्थितीत, आता संगममध्ये स्नान करण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक प्रयागराजला पोहोचत आहेत. आठवड्याच्या शेवटी आणि मुख्य स्नान उत्सवाच्या दिवशी सर्वाधिक गर्दी जमते. सामान्य दिवसांमध्ये, दररोज सरासरी १ कोटीहून अधिक भाविक महाकुंभात पोहोचत असतात. ३ फेब्रुवारी रोजी महाकुंभात वसंत पंचमीच्या अमृत स्नानानंतर, संन्याशांचे सर्व सात आखाडे महाशिवरात्रीसाठी बनारसला रवाना झाले. १२ फेब्रुवारी रोजी माघी पौर्णिमेला स्नान करून इतर संत आणि ऋषी देखील त्यांच्या मूळ गावी निघाले. आता महाकुंभमेळ्याला गेलात तर आखाड्यांची जागा रिकामी आढळेल. याशिवाय, विविध आश्रमांचे मंडपही तोडण्यास सुरुवात झाली आहे. सध्या, जुना आखाड्यातील सुमारे १० नागा साधू सेक्टर २० मध्ये दिसतील. हे नागा साधू २६ फेब्रुवारी नंतर जातील.



गर्दी असल्याने सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी आहे. शहराबाहेरून येणारी वाहने १०-१२ किलोमीटर अंतरावर असलेल्या पार्किंगमध्ये थांबवली जात आहेत. संगमपर्यंत जत्रेच्या परिसरात चालत जावे लागते किंवा स्थानिक वाहनांच्या मदतीने पोहोचावे लागते. कुंभमेळ्यातील प्रत्येक यात्रेकरू सरासरी १२ किलोमीटर चालत असतो. मेळ्यात फक्त पास घेऊनच वाहनांना प्रवेश दिला जातो. याशिवाय, व्हीआयपी गाड्यांसाठी वेगळे प्रोटोकॉल आहेत. महाकुंभमेळ्यातील तंबू भरले आहेत. त्यापैकी बहुतेकांसाठी प्री-बुकिंग २६ फेब्रुवारीपर्यंत आहे. हॉटेल्सही जवळजवळ भरली आहेत.

### न्यायालयीन सुनावणीत अडचणी

जिल्हा न्यायालय आणि उच्च न्यायालयात पोहोचण्यासाठी वकिलांना खूप अडचणी येत आहेत. यामुळे खटल्यांच्या सुनावणीतही अडचणी येत आहेत. अधिकाऱ्यांविरुद्ध दररोज गंभीर वॉरंट जारी केले जात आहेत आणि त्यांची सुनावणी करण्यात अडचणी येत आहेत. वकिलांचे म्हणणे आहे की सरकार प्रयागराजमधील वाहतूक कोंडी सोडवत नाही आणि इथे येणाऱ्या लोकांना योग्य मार्ग दाखवू शकत नाही.

एकूणच काय तर, श्रद्धेच्या नावावर स्थानिकांची मोठी गोची केली जात आहे.

●●●●●●●●●

# ....तरच मातृभाषा संपन्न होईल!

नुकताच जागतिक मातृभाषा दिन संपन्न झाला. आजमितीला जागतिक पातळीवर सात हजाराहून अधिक मातृभाषा आहेत तर केवळ भारतात २२ प्रमुख भाषांसह सुमारे १३०० मातृभाषा आहेत. झपाट्याने होणारे जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अन्य भाषांनी मातृभाषेवर केलेली कुरघोडी यांमुळे अनेक मातृभाषा लोप पावत चालल्या आहेत.

मातृभाषेचे संवर्धन व्हावे आणि त्या भाषेची संस्कृती टिकून राहावी यासाठी १९९९ पासून २१ फेब्रुवारी हा दिवस जागतिक मातृभाषा दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला आहे. एकाच मातृभाषेतील लोकांनी एकत्र येऊन मातृभाषेतील शिक्षण, साहित्य आणि संस्कृती यांबाबत चर्चा करून तिच्या संवर्धनासाठी ठोस कार्यक्रम आखावेत हा यामागील प्रमुख उद्देश आहे.

सर्वाधिक भाषा बोलले जाणारे भारत हे जगातील एकमेव राष्ट्र असून भारतातही काही मातृभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, तर काहींचा व्यवहारात होत असलेला वापर कमी होत चालला आहे. २१ फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी समस्त मराठी भाषिक मंडळींकडून व्हाट्सअप वर मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जाता, मराठी भाषेचे गोडवे गाणाऱ्या कविता, गाणी आणि सुविचार सामाजिक माध्यमांच्या स्टेटस आणि स्टोऱ्यांवर ठेवले जातात. काही मंडळी या दिवशी एकमेकांशी आवर्जून मराठीत संवाद साधतात. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय पक्ष विविध उपक्रम राबवतात आणि त्यानिमित्ताने मराठी भाषेचे महत्व सांगणारी व्याख्याने दिली जातात. २७ फेब्रुवारीला शाळांतूनही मराठी राजभाषा दिवस उत्साहाने साजरा केला जातो मात्र दिवस सरला की दुसऱ्या दिवशी पुन्हा येरे माझ्या मागल्या.

इंग्रजी भाषेने मातृभाषांवर केलेली घुसखोरी ही आज एक जटील समस्या बनली आहे. व्यवहारात पुढे जायचे असेल, तर इंग्रजीला पर्याय नाही हा मोठा गैसमज भारतीय जनतेत निर्माण झाल्यामुळे आज इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. महाराष्ट्रात प्रमुख शहरांमध्ये हे प्रमाण वाढू लागले आहे.

पाल्यांना इंग्रजी भाषा शिकण्यासाठी आणि त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व निर्माण होण्यासाठी पालकांकडून अतिरिक्त शिकवण्या लावल्या जातात. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती केली जाते. परिणामी मातृभाषा मराठी असूनही अशा मुलांना मराठी भाषा परकीय वाटू लागते. मराठी भाषेचे सौंदर्य आणि त्यातील पैलू यांना कधी उमगतच नाहीत.

लहानपणापासूनच परकीय भाषेचे कित्ते गिरवल्याने मातृभाषेतील परवलीचे शब्द वगळता अन्य शब्दांचे ज्ञान या पिढीकडे मुळातच नसते. मातृषेतील शब्दभांडार, त्यातील सौंदर्य आणि त्यातील लेखन संपदा यांपासून ही पिढी दुरावू लागली आहे. हे असेच चालू राहिले, तर येणाऱ्या काही वर्षांत मराठी मातृभाषा औषधालाही शिल्लक राहील का, हा प्रश्नच आहे.

मातृभाषेच्या संवर्धनासाठी व्यवहारिक पातळीवर इंग्रजीचे वाढलेले अवास्तव महत्व कमी करण्याची आवश्यकता असून राज्य पातळीवर मातृभाषेचाच अधिकाधिक वापर केला जायला हवा आणि त्यासाठी मातृभाषेविषयी पालकांमध्ये जागृती होणे अत्यंत महत्वाचे आहे.

मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृध्द आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही एका वाक्यात दोन ते तिन परकीय शब्द आपण सहजपणे उच्चारत असतो.

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यानंतर, मराठी भाषाशुद्धीचे प्रयत्न युद्धपातळीवर केले. परकीय शब्दांना हद्दपार केले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही मराठी भाषेला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी आपल्या कार्यकाळात अथक प्रयत्न केले.

बोलीभाषेतील परकीय शब्द शोधून त्यांना पर्यायी मराठी शब्द शोधून काढले. त्यानंतरही अनेकांनी भाषाशुद्धीसाठी प्रयत्न केले आहेत. या सर्वांचे योगदान लक्षात घेऊन आपणही आपल्या मायमराठीला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, जेणेकरून येणारी पिढी आपला वारसा पुढे चालवेल.



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

आपल्या मालकीच्या वस्तूंविषयी आपली आसक्ती असते मग आपल्या मातृभाषेविषयी आपल्या मनात आकस का? मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वप्रथम तिच्याविषयी आपल्या मनात प्रेम निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि प्रेम तेव्हाच निर्माण होईल जेव्हा दैनंदिन व्यवहारात आपण तिचा अधिकाधिक वापर करू. वापर करणे म्हणजे केवळ मराठी बोलणे नव्हे, तर दैनंदिन व्यवहारात परकीय शब्द टाळून शुद्ध मराठी बोलणे.

काही वस्तूंची निर्मितीच गेल्या काही वर्षांत झाली असल्याने त्यांना पयार्यी मराठी शब्द सध्यातरी नाहीत, असे शब्द वगळता ज्या ज्या शब्दांना पयार्यी मराठी शब्द आहेत, त्यांचा वापर तर आवर्जून केला पाहिजे. यासाठी घरी वाहिन्यांवर सासू सुनांच्या मालिका पाहण्याऐवजी मराठीतील पौराणिक आणि ऐतिहासिक मालिका पाहाव्यात. प्राचीन ग्रंथांचे आणि पुस्तकांचे वाचन करावे. इतरांशी बोलताना आपल्या बोलण्याची सुरुवात मराठीतच व्हायला हवी. आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत.

पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम मम्मी-डॅडी' ऐवजी आई-बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर बोलताना 'हॅल्लो' ऐवजी 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या.

'गुड मॉर्निंग-गुड नाईट' ऐवजी सुप्रभात-शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपारिक पद्धतीने साजरे करून मित्र मंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, मुलांना इंग्रजीतील काल्पनिक पात्रे आणि कार्टून दाखवण्याऐवजी मातृभूमीत होऊन गेलेले पराक्रमी राजे-महाराजे, अवतार, क्रांतिकारक, संत यांच्या गोष्टी सांगा.

आपली स्वाक्षरी मराठीतून करा. दारावरील पाटी मराठीतून लावा. व्यक्तीचे नाव लिहिताना नावाआधी श्री., सौ., श्रीमती. कु. ही आरंभाक्षरे लिहिण्याची सवय लावा. आपल्या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते फेडायचे असतील तर तिचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे काळाची गरज आहे.

■ ■ ■

# नवीन इन्कमटॅक्स कायदा २०२५ कसा आहे?

आपण गेल्या काही आठवड्यापासून जुन्या इन्कमटॅक्स कायद्याची चर्चा मुद्दाम थांबवली होती कारण आता नवीन कायदा 2025 म्हणजे नुकताच पास झाला आहे. 1961 नंतर पहिल्यांदाच 2025 मध्ये पूर्ण कायदाच बदलण्याचा प्रस्तावआलेला आहे. 63 वर्षा नंतर पूर्ण कायदाच बदलण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. आपण आज पासून नेहमीप्रमाणे सोप्या प्रश्नोतर रुपात नवीन कायदा बघणार आहोत. जे सर्व वाचकांना उपयोगी ठरावा.

**प्रश्न : इन्कमटॅक्स चा जुना कायदा बदलून नवीन कायदा का आणला गेला?**

■ 13 जुलै 2024 च्या अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण यांनी याचे उत्तर असे दिले की नवीन कायदा सुटसुटीत व स्पष्ट तथा संक्षिप्त करण्यात आलेला आहे. हे बिल 13 फ्रेब्रुवारी 2025 ला पार्लमेंट मध्ये मांडण्यात आला.

**प्रश्न : जुन्या व नवीन इन्कमटॅक्स कायद्यात महत्त्वाचा दर्शनीय फरक काय आहे?**

■ 1) नवीन कायद्यात जवळपास 2 लाख 56 हजार शब्द आहे जे की जुन्या कायद्यात हेच शब्द डबल होते. आता शब्द अर्धे झाले असेल तरी सार मात्र पूर्ण आहे. जुन्या कायद्यात 911 सेक्शन आणि 11 शेड्युल होते. जे आता 536 शेक्शन ( क्लॉजेस) तथा 16 सेड्युल आहेत. म्हणजेच 300 पेक्षा जास्तीचे विनाकारंणची भरती असलेले शेक्शन हटवण्यात आलेले आहेत.

**प्रश्न : जुन्या कायद्यात प्रीवियस ईयर आणि असेसमेंट ईयर असे होते त्यात आता काय बदल केला आहे?**

■ नवीन कायद्यात प्रीवियस ईयर आणि टॅक्स ईयर शब्द काढून टाकण्यात आले असून या जागी टॅक्स ईयर आणि सबसीक्वेन्ट टू टॅक्स ईयर असा बदल करण्यात आला आहे. हा नवीन बदल अर्थाप्रमाणे बरोबर असून ब्रिटीश कालीन शब्द प्रीवियस ईयर आणि असेसमेंट ईयर काढून टाकले गेल्यामुळे जनतेस कायदा समजण्यास सोपा जाईल, असेही अर्थमंत्री बोलले.

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना**




नवीन कायद्यात सोपे व छोटे वाक्य आहे. जे पूर्वी फार लांब असायचे व त्यातून वेगवेगळे कायद्याचे किस म्हणजे अर्थ निघायचे जुन्या कायद्यातील not with standing असे खूप शब्द घेतले ते आता जवळ जवळ काढून टाकण्यात आले आहे पूर्वीच्या कायद्यात 47 चाप्टर होते ते आता फक्त 23 करण्यात आलेले आहे यामुळे कायदा स्पष्ट व सुटसुटीत होईल यात शंका नाही.

काही तज्ञांची मते यावर भिन्न आहेत त्यांची मते खालील प्रमाणे आहेत.

1) त्यांच्या मते नवीन कायद्यात आणि जुन्या कायद्याची पॉलिसी बदल नाही. स्ट्रक्चर बदल ही नाही. फक्त पान कमी करण्यात आले असून हे फक्त old wine in new bottle असा प्रकार आहे.

2) नवीन सेक्शन टाकल्या मुळे प्रत्येकाला नवीन कायद्याची सुरुवाती पासून अभ्यास लागेल. म्हणजे फक्त Reinventing the wheel.

3) Computation मध्ये काहीच महत्त्वाचे बदल नाहीत.

4) नवीन कायद्याचे पूर्ण आकलन होई पर्यंत कमीत कमी दोन डिकेड म्हणजे तब्बल 20 जाणार.

5) ह२ बिल सुद्धा लांबच आहे ज्याला अजून छोटा करता आले असते.

6) कम्प्लीट कायदा पुन्हा नवीन रीतीने समजण्यास सगळ्यांनाच वेळ लागेल.

7) शेड्युल खूप टाकण्यात आले आहे जे समजण्यास अवघड जाणार आहे.

सारांशमध्ये 2025 चा नवीन कायदा हा नक्कीच पूर्वीपेक्षा चांगला राहील. पुढच्या आठवड्या पासून आपण एक-एक विषय घेऊन नवीन कायदा काय म्हणतो जुना कायदा या विषयावर काय सांगत होता, तथा दोन्हीत काय बदल आहे, तथा नवीन बदल कसा चांगला आहे किंवा नाही याचे सविस्तर उदाहरण करणार आहोत, जे करदात्यांना तथा वाचकांना खूप उपयोगी राहील. ■ ■

## पालकचे पाणी, भलतेच गुणकारी..

### आरोग्याला अनेक फायदे



निरोगी आरोग्यासाठी तुमच्या आहारात पोषक तत्वंचा समावेश करणे गरजेचे असते. पालकचे सेवन आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असते. पालकमध्ये भरपूर प्रमाणात लोह, मॅग्नेशियम आणि इतर पोषक घटक असतात. पालक धुतलेल्या पाण्याचा वापर केल्यास कुंडीतील फुले आणि भाज्यांची योग्य वाढ होते.

पालकचे पाणी झाडांसाठी वापरल्यामुळे ते हिरवेगार आणि टवटवीत दिसू लागतात. पालकमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते ज्यामुळे वजन नियंत्रित राहाते आणि त्याध्ये पालकमध्ये काही टक्के पाणी असते ज्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता भासत नाही आणि शरीर हायड्रेटेड राहाते. पालक ज्या पाण्यामध्ये उकळली जाते त्या पाण्यामध्ये अनेक पोषक तत्वं असतात. ज्यामुळे तुमच्या आरोग्याला अनेक फायदे होतात.

पालकच्या पाण्याचे सेवन केल्यामुळे वजन नियंत्रित राहाते आणि शरीरातील कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते. स्वयंपाकघरातील पालक स्वच्छ धुवा आणि पाण्यामध्ये उकळून घ्या. त्यानंतर ते पाणी एका ग्लासमध्ये ठेवा, त्यामध्ये काळे मीठ किंवा सैंधव मीठ मिसळा. या पाण्याची चव वाढवण्यासाठी थोडी काळी मिरी पावडर मिसळा. या पेयाचे सेवन केल्यामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी वितळू लागते आणि वजन कमी होण्यास मदत होते.

पालकाचे पाणी पांढऱ्या केसांना काळे करण्यास मदत करते. या पाण्यात लोहाचे प्रमाण चांगले असते जे रक्ताभिसरण सुधारण्यास आणि कोलेजन वाढवण्यास मदत करते. याशिवाय, त्यातील प्रथिने केसांच्या वाढीसह रंग राखतात ज्यामुळे केस राखाडी होत नाहीत आणि बराच काळ काळे राहतात.

पालकाच्या पाण्यात नैसर्गिकरित्या आढळणारे नायट्रेट्स असतात, ज्यामुळे तुमच्या रक्तवाहिन्यांचे आरोग्य सुधाते. अशाप्रकारे, उकडलेले पालक पाणी पिल्याने शरीराचे डिटॉक्सिफिकेशन होण्यास मदत होते. पालकचे पाणी पिल्याने शरीरातील साचलेली अशुद्धता बाहेर पडते आणि चरबीचे प्रमाण कमी होते. यामुळे त्वचेचे छिद्र आतून स्वच्छ होतात आणि रक्तही शुद्ध होते.

पालकचे पाणी प्यायल्यामुळे त्वचेचं आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते. पिंपल्स, काळे डाग आणि मुरूम सारख्या समस्या असतील तर पालकच्या पाण्याचे सेवन करू शकता. तुम्हाला बद्धकोष्ठता किंवा पोटाच्या समस्या असतील तर आठवड्यातून 2-3 वेळा पालकच्या पाण्याचे सेवन करणे फायदेशीर ठरेल. पालकाचे पाणी प्याल्याने वजन वाढत नाही आणि शरीरामध्ये जास्त प्रमाणात कॅलरीज वाढत नाही. ■ ■ ■

## वाचक लिहितात

### आता बळी कोणाचा देणार?

पूर्वी पुतळ्याचे शहर म्हणून ओळखले जाणारे नागपूर शहर आता उड्डाणपुलाचे शहर म्हणून नावारूपास येते की काय? अशी शंका येवू लागली आहे. शहरात सर्वत्र उड्डाणपुलांचे काम धडाक्यात सुरू आहे. परंतु, घाईगर्दीत ही कामे करताना त्यांचा दर्जा उत्कृष्ट राखला जातो काय? याकडे प्रामाणिकपणे लक्ष पुरविले जात असल्याचे वाटत नाही.

केंद्रियमंत्री नितीन गडकरी यांच्या विभागाने बांधलेल्या आणि दोन दिवसांपूर्वी उद्घाटन झालेल्या पारडी उड्डाणपुलाचे प्लास्टर खचल्याचे वाचण्यात आले. दीर्घकाळ लांबलेल्या आणि निकृष्ट दर्जाच्या कामासाठी कंत्राटदार आणि संबंधित अधिकारी यांचेवर कारवाई करा, असे मंत्री महोदय अनेकदा सांगतात. आता त्यांच्याच खात्यात हे असे प्रकार होत असतील तर दोष कुणाला देणार? नागपूरला विकसीत आणि सुंदर शहर बनविण्याच्या नादात लोकांच्या जिवीताशी खेळण्याचा प्रकार होवू नये, एवढी रास्त अपेक्षा.

● विनोद कुंभलकर, नागपूर.

### पुरस्कारप्राप्त आयुक्त करतात तरी काय?

नागपूर शहराचे पोलीस आयुक्त सिंगल साहेबांना उत्कृष्ट सेवेबद्दल नुकताच राष्ट्रपती पुरस्कार प्रदान करण्यात आला. मात्र, ते कार्यरत असलेल्या नागपूर शहराचे क्राईम कॅपिटल म्हणून रूपांतर झाल्याचे दिसत आहे. नागपुरात एकामागे खूनाच्या घटना घडत असून, गुन्हेगारीने कळस गाठला आहे. चोऱ्या, मारामाऱ्या, देहविक्री व्यवसाय अशा सामान्य गुन्ह्यांमध्ये दुर्लक्ष केले तरी, हत्येच्या घटना नित्याच्या झाल्याचे दिसते. याचाच अर्थ, आयुक्तांच्या अखत्यारीतील पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी त्यांची भूमिका योग्यरित्या निभावत नाही.

जानेवारी, फेब्रुवारी या दोन महिन्यात ३० पेक्षा अधिक खून झालेत. काही प्रकरणातील आरोपी फरार आहेत. हेच नागपूर गृहमंत्र्यांचेही शहर आहे. नागपूर शहरातील गुन्हेगारी मोडून काढण्याकडे आयुक्तांनी लक्ष पुरवायला हवे.

● मिनाक्षी खंडाईत, नागपूर.

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### यशस्वी भव !!

प्रारंभ झाला परीक्षोत्सवाला
आनंदाने जावे स्वागताला
कर्मयोगीचे व्हा पुरस्कर्ते
यश हमखास पदरी पडते ..

' यशस्वी भव ' ही असे
शुभेच्छेची परंपरा
पण आधी कष्ट मग फळ
हाच सापडे बोध खरा ..

वेळेचे काम वेळेवर करी
त्याला टेन्शन नसे शिरी
यश हमखास येते पदरी
भविष्यकाराची काय जरुरी ?

# सॅमसंग आरअँडडी इन्स्टिट्यूट इंडिया, बेंगळुरूकडून कर्नाटकमधील पहिल्या विमेन-ओन्ली इंजीनिअरिंग कॉलेजमध्ये सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसचे उद्घाटन



**बेंगळुरू, २२ फेब्रुवारी :** सॅमसंग आरअँडडी इन्स्टिट्यूट इंडिया, बेंगळुरू (एसआरआय-बी)ने कर्नाटकमधील पहिले ऑल-विमेन्स इंजीनिअरिंग कॉलेज गीता शिशू शिक्षण संघ (जीएसएसएस) इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअरिंग अँड टेक्नालॉजी फॉर विमेन, म्हैसूर येथे सॅमसंगचा प्रमुख जागतिक नागरिकत्व उपक्रम सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस (एसआयसी)चे उद्घाटन केले. या उपक्रमामधून एसटीईएममध्ये लैंगिक समानतेला चालना देण्याप्रती आणि तंत्रज्ञानामध्ये महिला प्रमुखांच्या नवीन पिढीला चालना देण्याप्रती सॅमसंगची अविरत कटिबद्धता दिसून येते.

सॅमसंगमध्ये आमचा विश्वास आहे की, संधी सर्वसमावेशक असल्यास इनोव्हेशन प्रगत होऊ शकते. कर्नाटकमधील पहिल्या विमेन्स इंजीनिअरिंग कॉलेजमध्ये सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस (एसआयसी)चे उद्घाटन करताना आम्हाला अत्यंत अभिमान वाटत आहे, जेथे तरूण विचारवंत एक्स्प्लोअर, प्रयोग करतील आणि तंत्रज्ञानाच्या मर्यादांना दूर करतील. सरकारच्या #DigitalIndia व #MakeinIndia मोहिमांशी संलग्न राहत हा कॅम्पस विद्यार्थ्यांना देशामधून तंत्रज्ञान प्रगतीला गती देण्यास सक्षम करतो. आम्ही महिला प्रमुखांना निपुण करण्यास उत्सुक आहोत, जेथे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून निर्मिती, नाविन्यता आणि जगामध्ये परिवर्तन घडवून आणतील,'' असे एसआरआय-बीचे कॉर्पोरेट उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मोहन राव गोली म्हणाले.

एसआरआय-बी सोबतचा आमचा सहयोग अधिक प्रभावाची खात्री देतो, तसेच कॅपस्टोन प्रकल्पांच्या माध्यमातून उद्योग-संबंधित कोर्सेस व सर्वोत्तम कौशल्ये, प्रबळ टेक्निकल प्राया आणि व्यावहारिक एक्स्पोजर देतो. हा उपक्रम डिजिटल कौशल्यांमधील तफावत दूर करत आणि महिलांना भावी कर्मचारीवर्गासाठी सुसज्ज करत #DigitalIndia ला पाठिंबा देण्याप्रती आमची कटिबद्धता दृढ करतो. संरचित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समस्या-निवारण आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानांमधील प्रत्यक्ष अनुभव मिळेल, ज्यामुळे रोजगारक्षमता आणि नाविन्यतेमध्ये वाढ होईल. आम्ही या बहुमूल्य सहयोगासाठी एसआरआय-बीचे कौतुक करतो, जी तरूण महिला टेक्नॉलॉजिस्ट्सना तंत्रज्ञान प्रगतीला चालना देण्यास सक्षम करते,'' असे जीएसएसएस (आर), म्हैसूरच्या सचिव अनुपमा बी. पंडित म्हणाल्या.

एसआरआय-बीने कर्नाटकमधील सात इतर इन्स्टिट्यूटससह बीएनएम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, केम्ब्रिज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (मेन अँड नॉर्थ कॅम्पसेस), डॉन बॉस्को इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, केएलई इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, आरएनएस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आरएनएसआयटी) बेंगळुरू येथे एसआयसी स्थापित केल्या आहेत, तसेच आयआयआयटी-कुर्नूलमध्ये एक एसआयसी स्थापित केले आहे, जे तंत्रज्ञान क्षेत्रातील संबंधित संधींचा फायदा घेण्यासाठी ८०० हून अधिक विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देते.

# अदानी फाउंडेशनच्या नेत्र शिबिरात २२६ लोकांची तपासणी




**नागपूर, २२ फेब्रुवारी :** मानवी जीवनात डोळ्यांचे फार मोठे महत्त्व आहे. हेच डोळे निरोगी राहावेत या हेतूने वडधामना गावात नेत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अदानी फाऊंडेशन, प्रेरणा विकास सोसायटी आणि वडधामना ग्रामपंचायतच्या वतीने पार पडलेल्या शिबिरात २२६ लोकांनी आपल्या डोळ्यांची तपासणी करून घेतली.

यावेळी डॉ. अंकित पोटे, डॉ. कृणाल कपाटे, सरपंच धीरज आंबटकर, उपसरपंच श्याम राव, प्रेरणा विकास सोसायटीचे पद्माकर बुरनुरे, हिमांशु तागडे, अभिषेक वाघ, मयूर अतकरी उपस्थित होते. शालिनीताई मेघे हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी शिबिरात सहभागी लोकांच्या डोळ्यांची तपासणी केली. शिवाय इतरही तपासण्या करून त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना सहजतेने वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी म्हणून या शिबिराचे आयोजन केल्याची माहिती अदानी फाऊंडेशनने दिली.

दरम्यान, ज्यांच्या डोळ्यांना नंबरचे चष्मे लागतील, त्यांना पुढील शिबिरात विनामुल्य त्याचे वाटप केले जाणार आहे. बहुतांश लोकांना जवळचे दिसत नसल्याचेही डॉक्टरांच्या तपासणीअंती समोर आले. त्यांच्यावर योग्य तो उपचार केला जाणार आहे. याशिवाय रक्तदाब, मधुमेह आणि इतरही चाचण्या शिबिरात करण्यात आल्या.

अदानी फाउंडेशन ग्रामीण विकास आणि आरोग्यसेवेला प्रोत्साहन देण्यासाठी सतत कार्यरत राहतात. अशा सामाजिक मोहिमांद्वारे गावांमध्ये आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे आणि लोकांना त्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याबद्दल जागरूक करणे हे फाउंडेशनचे उद्दिष्ट आहे. हे नेत्र तपासणी शिबिर देखील अदानी फाउंडेशनच्या या संकल्पाचा एक भाग होता.

# जेएसडब्ल्यू ग्रुपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल यांना AIMA मॅनेजिंग इंडिया अॅवॉर्ड्समध्ये दशकातील सर्वोत्कृष्ट व्यवसाय अग्रणी पुरस्कार प्रदान

**नवी दिल्ली, २२ फेब्रुवारी :** जेएसडब्ल्यू ग्रुपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल यांना १५ व्या AIMA मॅनेजिंग इंडिया अवॉर्ड्समध्ये प्रतिष्ठेच्या दशकातील सर्वोत्कृष्ट व्यवसाय अग्रणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार म्हणजे समूहाला जागतिक स्तरावरील मोठ्या उद्योग समूहामध्ये विस्तारण्याच्या त्यांच्या परिवर्तनात्मक नेतृत्वाला मिळालेली मान्यता आहे.

आज झालेल्या समारंभात जिंदाल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी मुख्य अतिथी म्हणून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि सन्माननीय अतिथी म्हणून वाणिज्य आणि उद्योग; इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी विभागाचे राज्यमंत्री जितिन प्रसाद उपस्थित होते. पुरस्काराच्या सन्मानपत्राचे वाचन केपीएमजी इंडिया चे मुख्य कार्यकारी अधिकारी यझदी नागपोरेवाला यांनी केले.

जिंदाल यांच्या नेतृत्वाखाली जेएसडब्ल्यू समूहाने उल्लेखनीय वाढ साध्य केली असून कंपनीचे उत्पन्न दुपटीहून अधिक वाढून २४ अब्ज अमेरिकन डॉलरवर पोहोचले आहे. त्यांच्या धोरणात्मक दृष्टिकोनामुळे जेएसडब्ल्यू ने वार्षिक स्टील उत्पादन क्षमता जवळपास तिप्पट करून ३९ दशलक्ष टनांपर्यंत वाढवली आहे. तसेच, जेएसडब्ल्यू ने अक्षय ऊर्जा आणि सिमेंट उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान निर्माण केले आहे.



या पुरस्कारातून जेएसडब्ल्यू समूहाला भारताच्या पायाभूत सुविधा आधुनिकीकरण उपक्रमांशी जोडण्यात असलेली जिंदाल यांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित होते. त्यांच्या नेतृत्वाखाली, जेएसडब्ल्यू भारतातील खाजगी क्षेत्रातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी पोर्ट ऑपरेटर कंपनी म्हणून उदयास आली आहे. तसेच, कंपनीने आंतरराष्ट्रीय भागीदारीद्वारे इलेक्ट्रिक वाहन आणि लष्करी ड्रोन यांसारख्या भविष्यातील क्षेत्रांमध्ये प्रवेश केला आहे.

ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशन (AIMA) मॅनेजिंग इंडिया अवॉर्ड्स भारताच्या व्यावसायिक क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाचा सन्मान करतात. या पुरस्कार सोहळ्याच्या १५ व्या सत्रासाठी विविध नामांकित पुरस्कार विजेते, उद्योग क्षेत्रातील दिग्गज आणि AIMA चे पदाधिकारी एकत्र आले होते.

# सृती झा आणि राजश्री ठाकूर एका रोमांचक चित्रीकरणासाठी एकत्र!

**मुंबई, २२ फेब्रुवारी :** झी टीव्हीवरील 'कैसे मुझे तुम मिल गये' आणि 'बस इतना सा ख्वाब' या मालिकांनी त्यांच्या आकर्षक कथाकथन आणि नाट्यमय आकर्षणासह प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. एका खास महासंगम एपिसोडसह ते एकत्र येत असून दोन्ही मालिकांमधील कलाकार एका अविस्मरणीय मनोरंजनात्मक कार्यक्रमासाठी उत्साहित आहेत.

आगामी एपिसोड्समध्ये अमृता (सृती झा) आणि अबीर (पुलकित बांगिया) यांच्या लग्नामुळे नाट्यमय वातावरण निर्माण होईल कारण रणवीर (अर्जित तनेजा उर्फ विराट) याचा जळफळाट झाला आहे. अमृताचा अबीरशी लग्न करण्याचा निर्णय हा त्याच्या हरवलेल्या स्मरणशक्तीला परत मिळवून देण्यासाठी आहे हे रणवीरला माहिती नसते. समारंभादरम्यान अमृताला तिची जवळची मैत्रीण अवनी (राजश्री ठाकूर) साथ देते. ती तिला तयार होण्यास आणि तिचा मेकअप करण्यास मदत करते. या सर्व नाट्यामध्ये भर घालत अमृताचे सासरे शिखर (योगेंद्र विक्रम सिंग) आणि तमन्ना (छवी पांडे) यांना या समारंभासाठी निमंत्रित करतात. मात्र, तमन्ना शिखरचे मन जिंकण्याचा आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये त्यांचे भविष्य सुरक्षित करण्याचा दृढनिश्चय करण्याच्या हेतूनेच येते. दरम्यान, मानवी (आकांक्षा चमोला) रणवीर आणि अमृता यांना वेगळे ठेवण्यासाठी कट आखते.

सृती झा म्हणाली, या महासंगम भागाबद्दल मी खूप उत्सुक आहे. आता मालिकेमध्ये काही प्रमुख घटना घडण्याच्या दिशेने वाटचाल सुरू असून बस इतना सा ख्वाबची टीम आमच्यात सामील झाल्याने ही वाटचाल आणखी खास बनली आहे. राजश्री ही अशी व्यक्ती आहे जी माझ्यासाठी आदर्श आहे आणि अमृताच्या आयुष्यातील या महत्त्वाच्या क्षणाचा ती अवनी म्हणून हिस्सा बनू शकते याचा मला खूप आनंद झाला. ती एक प्रतिभावान कलाकार आहे आणि तिच्यासोबत काम करताना मजा येते. ही दृश्ये अतिशय गंभीर असली तरीही आम्ही खूप मजा केली आणि उत्साह कायम ठेवला. मला आशा आहे की प्रेक्षकांना हा भाग आणि आता उलगडणाऱ्या नाट्याची मजा येईल.

राजश्री ठाकूर म्हणाली, महासंगम एपिसोड्स खरोखरच रोमांचक आहेत आणि अमृताच्या लग्नादरम्यान तिच्यासोबत असणे हा एक अद्भुत अनुभव होता. दृश्ये नाट्यमयतेने भरलेली असली तरी सेटवर कधीही कंटाळवाणा क्षण आला नाही. माझ्यासाठी ते खूप खास होते कारण मी अमृताला तिच्या मेकअपमध्ये मदत केली आणि तिला या महत्त्वाच्या क्षणासाठी तयार केले. सृती आणि अर्जितसोबत शूटिंग करणे खूप मजेदार होते - आमच्यात इंडस्ट्रीबद्दल खूप गप्पा झाल्या आणि एकत्र शूटिंगचे हे तीन दिवस खरोखरच छान होते. मला आशा आहे की जितका आनंद आम्हाला शूटिंग करण्यात आला तितकाच आनंद प्रेक्षकांना हे एपिसोड्स पाहताना होईल!

मानवी आणि तमन्नाची योजना यशस्वी होईल का? अवनीला शिखर आणि तमन्नाबद्दल कळेल का? रणवीर (विराट) त्याची स्मृती परत मिळवेल का? येणाऱ्या भागांमध्ये हे नाट्य पाहणे प्रेक्षकांसाठी रोमांचक असेल.

# तेनाली रामामध्ये तेनाली रामापुढे भयंकर आव्हान ; लछमाचे जीवन अधांतरी

**मुंबई, २२ फेब्रुवारी :** सोनी सबवरील तेनाली रामा ही मालिका तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज) या एका दरबारी कवी आणि अत्यंत चतुर व्यक्तिरेखेच्या सुरस कथांनी प्रेक्षकांचे खूप मनोरंजन करत आहे. अलीकडच्या भागांमध्ये, लहान मुलांच्या टोळीतील लछमा (आरिया सकरिया) ला विषारी रसायनाने माखलेला हत्ती दिसतो. या रसायनाचा पाण्याशी संपर्क आल्यावर भयंकर प्रतिक्रिया होत असल्याचे रामाला समजते.

आगामी भागांमध्ये या रहस्यमयी हत्तीच्या रूपाने कोणते संकट येऊ घातले आहे, हे सगळ्यांना समजावण्याचा प्रयत्न करतो. पुढे कृष्णदेवराय राजाला (आदित्य रेडिज) हे समजते की हे शत्रूने वापरलेले एक साधन आहे. ते सगळे मिळून त्या हत्तीला एका खड्ड्यात ढकलतात. रामाचे कौतुक होते आणि लोक त्याची क्षमा मागतात. पण शोकांतिका त्यानंतर चालू राहते. लछमा नकळत त्या हत्तीच्या शरीरावरील विषारी वायू आपल्या श्वासात ओढते आणि आजारी पडते. तेनालीला ती सांगते की याच रसायनामुळे तिच्या आईचा दुर्दैवी मृत्यू झालेला असतो. आता तिचे स्वतःचे जीवन अधांतरी असताना तेनाली तिचा जीव वाचवण्यासाठी रक्तपुष्प फुलाच्या शोधात निघतो. दरम्यान, गिरगिट राज (सुमित कौल) राजा कृष्णदेवरायाला युद्धासाठी डिवचतो आणि तीव्र संघर्षाची परिस्थिती निर्माण करतो.

तेनाली रामा मालिकेत तेनालीची भूमिका करणारा कृष्ण भारद्वाज म्हणतो, तेनाली रामापुढे एक मोठे संकट उभे आहे. शहरात सोडलेला हत्ती म्हणजे शत्रूचे शस्त्र होते, हे समजल्यावर हत्तीचा निकाल केल्यामुळे संकट टळले असे त्याला वाटते. पण जेव्हा लछमाची प्रकृती ढासळते तेव्हा आणि याच विषाने तिच्या आईचा देखील जीव घेतला होता, हे सत्य त्याला समजते तेव्हा रामा हेलावून जातो. आता त्याला लछमाला तर वाचवायचेच आहे, पण तिला संजीवन देणाऱ्या एका दुर्मिळ फुलाचा शोध देखील घ्यायचा आहे. संकट मोठे आहे. आगामी भागात दिसेल की, विजयनगरची शांती भंग करण्याच्या प्रयत्नात असलेल्या गिरगिट राजचा सामना करण्यासाठी रामाला कशी तयारी करावी लागणार आहे.

# काली मा चे रूप घेताना मला निडरता, आंतरिक शक्ती आणि संकटांवर मात करण्याची क्षमता हे मातेचे गुण अंगिकारण्यास देखील मदत होते : बरखा बिष्ट

**मुंबई, २२ फेब्रुवारी :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेतील तेनाली (कृष्ण भारद्वाज)च्या वेधक गोष्टींनी प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन होत आहे. तेनाली हा दरबारी कवी होता, जो आपल्या बुद्धीचातुर्याबद्दल ओळखला जात असे. तेनालीला विजयनगर साम्राज्यातील त्याचे स्थान पुन्हा प्राप्त करून देण्यात साक्षात काली मातेची (बरखा बिष्ट) दिव्य शक्ती त्याच्या पाठीशी होती. दिव्य स्वरूपी काली माता तेनालीला शहाणीव आणि संकटांवर मात करण्याची शक्ती देते. बरखासाठी देवीचे रूप साकारणे ही केवळ एक अभिनयाची संधी नसून काली मातेचे संरक्षणात्मक गुण अंगिकारण्याची संधी आहे.

काली मातेची भूमिका करण्याबद्दल आणि तो खास पोशाख धारण करण्यासाठी किती प्रयत्न करावे लागतात, याबाबद्दल बरखा म्हणते, मातेचा लुक धारण केला की तिच्यातील निडरता, आंतरिक शक्ती आणि संकटांवर मात करण्याची तिची ताकद हे गुण अंगिकारण्यास देखील मला मदत होते. देवीचे हे दिव्य रूप पडद्यावर साकार करण्यात पोशाख, आभूषणे आणि नाट्यमय मेकअप यांचा मोठा वाटा आहे. तयार होण्याची प्रक्रिया खूप किचकट आणि प्रदीर्घ आहे. या मेकअपसाठी आणि बोजड मुकुट आणि आभूषणे परिधान करण्यासाठी तासन्‌तास जातात. काली मातेचे व्यक्तिमत्व अस्सल बनवण्यासाठी या सगळ्याचा उपयोग केला जातो. प्रखर प्रकाशात तासन्‌ तास काम करताना त्वचेची काळजी घेणे महत्त्वाचे होऊन जाते. बरखा स्किनकेअर रूटीनचे काटेकोर पालन करते. ती म्हणते, स्किनकेअर प्रक्रियेतला सगळ्यात महत्त्वाचा भाग म्हणजे मेकअप व्यवस्थित उतरवणे. जर मेकअप नीट निघाला नाही, तर तो त्वचेला नुकसान करतो. विशेषतः आम्ही मेकअप करून दिवसभर उन्हात काम करत असल्याने तो पूर्णपणे काढणे गरजेचे आहे. मेकअप काढल्यानंतर व्यवस्थित क्लीन्सिंग आणि मॉईश्चराईझिंगची गरज असते. त्वचा नेहमीच हायड्रेटेड ठेवणे अत्यावश्यक आहे, आणि मेकअप काढताना या दोन्ही गोष्टींचे मी काटेकोर पालन करते.

# वागले की दुनिया मालिकेत सोसायटी सदस्यांना वाचवण्यासाठी राजेश वेळेवर पावले उचलणार का?

**मुंबई, २२ फेब्रुवारी :** सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत आपल्याला आपलेसे आणि आकर्षक वाटणारे कौटुंबिक क्षण बघायला मिळतात. सामान्य माणसाच्या जीवनातील दैनंदिन संघर्ष यात दाखवला जातो. प्रेक्षकांनी पाहिले की, साई दर्शन सोसायटीमध्ये एक निनावी पाकीट येते, ज्याच्यावर प्राप्तकर्त्याचे नाव देखील लिहिलेले नसते. सोसायटीच्या सर्व सदस्यांना ते पाकीट आपल्याचसाठी असावे असे वाटते. त्याबद्दल कुतूहल आणि मग गोंधळ वाढतो. जेव्हा रजेवर गेलेला सोसायटीचा वॉचमन परत येतो तेव्हा हे रहस्य उलगडते. तो सांगतो की, त्याच्या गावातील कुणी तरी हे स्मृतिपत्र पाठवले आहे. वॉचमन रजेवर असल्याचे माहीत नसल्यामुळे ते पत्र पाठवल्यावर गोंधळ माजतो. आगामी भागात, हा छोटासा गोंधळ मिटल्यानंतर एक मोठे मोठे वादळ घोंघावत येते. साई दर्शन सोसायटीतील महिला एका आकर्षक आभूषणाच्या योजनेकडे आकर्षित होतात. या योजनेत सोप्या मासिक हप्त्यांमध्ये महागडी आभूषणे देण्याची हमी असते. तसेच दोन वर्षांनी संपूर्ण रक्कम देखील परत मिळणार असते. राजेश (सुमित राघवन) नव्या नोकरीच्या संधी शोधत असतो, तेव्हा त्याला एक धक्कादायक गोष्ट समजते. तो ज्या कंपनीत दाखल होण्याचा विचार करत असतो, ती कंपनी एका महाभयंकर आर्थिक घोटाळ्याच्या केंद्रात असते आणि लोकांकडून पैसे लुबाडून त्यांची फसवणूक करण्याच्या तयारीत असते. साई दर्शन सोसायटीच्या काही लोकांनी तर या योजनेला बळी पडून आधीच आपल्या बचतीचे पैसे त्यात गुंतवून आपली पूंजी धोक्यात टाकलेली असते.

# टोयोटा किर्लोस्कर मोटरने लँड क्रूझर ३०० साठी बुकिंग सुरू केली



**बंगळुरू, २२ फेब्रुवारी :** टोयोटा किर्लोस्कर मोटरने आज त्यांच्या प्रतिष्ठेचे प्रतीक, सामर्थ्य आणि मजबूत क्षमतेचा वारसा असलेल्या लँड क्रूझर ३०० साठी अधिकृत बुकिंग सुरू करण्याची घोषणा केली. ७० वर्षांहून अधिक काळाच्या त्यांच्या प्रतिष्ठेला डोळ्यासमोर ठेवत बनविण्यात आलेल्या या एसयूव्हीमध्ये टोयोटाच्या अभियांत्रिकी कौशल्याचा सर्वोच्च संगम आहे. ही कार आरामदायी व्यवस्था आणि सर्वच प्रकारच्या रस्त्यांवर वाहन चालविण्याचा आनंद घेण्याची ईच्छा असणाऱ्या वाहनप्रेमींची अपेक्षा पूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

अतुलनीय विश्वासार्हता, दिसण्यात दमदार आणि उत्कृष्ट कामगिरी यांसाठी प्रसिद्ध असलेली लँड क्रूझर ३०० ही टोयोटाच्या जागतिक एसयूव्ही श्रेणीमधील फ्लॅगशिप आहे. या नवीन मॉडेलमध्ये परिवर्तनकारी प्लॅटफॉर्म, प्रगत पॉवरट्रेन, अत्याधुनिक सुरक्षा वैशिष्ट्ये आणि आलिशान इंटेरियर यांचा समावेश आहे, जे लक्झरी, ताकद आणि सर्वच प्रकारच्या रस्त्यांवर वाहन चालविण्याचा आनंद द्विगुणित करतात.

टोयोटा किर्लोस्कर मोटरचे विक्री, सेवा आणि वापरलेले वाहन व्यवसाय विभागाचे उपाध्यक्ष श्री. वरिंदर वाधवा यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, लँड क्रूझर ३०० ही सामर्थ्य, व्यवस्थापन आणि उत्कृष्ट ऑफ-रोड क्षमता यांचे अंतिम प्रतीक आहे. टोयोटाच्या टीएनजीए-एफ प्रणालीवर तयार केलेले हे मॉडेल शक्तिशाली ट्विन-टर्बो व्ही ६ इंजिन, अत्याधुनिक सुरक्षा वैशिष्ट्ये आणि मजबूत तरीही आलिशान डिझाइन प्रदान करते. अति कठीण प्रदेश असो किंवा शहरातील रस्ते पार करायचे असोत, ही एसयूव्ही आराम, उत्कृष्ट कामगिरी आणि उत्कंठा वाढविणारा प्रवास याचा अतुलनीय मिलाफ देते. उत्कृष्टतेची मागणी करणाऱ्यांसाठी ही एसयूव्ही परिपूर्ण साथीदार आहे.

लँड क्रूझर ३०० च्या उल्लेखनीय प्रवासाने आमच्या प्रतिष्ठित ग्राहकांमध्ये एक अनोखे स्थान मिळविले आहे. आम्हाला विश्वास आहे की लँड क्रूझर ३०० ग्राहकांच्या अपेक्षांपेक्षा अधिक सक्षम ठरेल, कारण ही एसयूव्ही तिच्या पूर्वइतिहासाचा, नाविन्याचा सर्वोत्तम मिलाफ साधत आहे. यामुळेच ते प्रिमियम एसयूव्ही श्रेणीमधील हिरो ठरणार आहे.

# सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत बंधक नाट्याच्या गदारोळात पुष्पाचा जीव धोक्यात

**मुंबई, २२ फेब्रुवारी :** पुष्पा या एका धडाडीच्या आणि जिद्दी स्त्री च्या प्रेरणादायक कथानकामुळे पुष्पा इम्पॉसिबल मालिका अत्यंत लोकप्रिय झाली आहे. पुष्पा जीवनातील आव्हानांना नेहमी सकारात्मकतेने आणि दृढतेने तोंड देते. अलीकडच्या भागांमध्ये, टी स्टॉलवर व्हॅलेंटाईन डे चा गोंधळ उलगडल्यानंतरचे हलके-फुलके क्षण प्रेक्षकांनी अनुभवले. जेव्हा जुगल (अंशुल त्रिवेदी) सांगतो की तो आणि दिलीप (जयेश मोरे) हे दोघे स्वतंत्रपणे पुष्पाला सिनेमा दाखवायला नेण्याची योजना आखत होते, तेव्हा पुष्पाला हसू आवरत नाही. पण हे हलके-फुलके क्षण फार काळ टिकत नाहीत. दिलीपला एका अधिकाऱ्याचा फोन येतो आणि त्यात सूचित केले जाते की, संतोष (अमित श्रीकांत सिंह) निसटला आहे आणि तो चाळीच्या दिशेने निघाला आहे.

आगामी भागांमध्ये, संतोष दिलीपवर हल्ला करण्यासाठी गुपचुप चाळीत शिरतो पण पोलीसांना लवकरच त्याचा सुगावा लागतो. या गोंधळात तो आपली बंदूक टाकून पळ काढतो. त्यानंतर, नानावटी स्कूलमधल्या एका रियुनियनमध्ये संतोष एक कुटिल योजना आखून परत येतो. तपासणी अधिकाऱ्याचा वेश घेऊन तो स्वरा (वृही कोडवारा) आणि मुन्नी (हंसिका जांगिड) यांच्या उपस्थितीत पुष्पाला बंधक बनवतो. त्यानंतर मोठी चकमक होऊन पुष्पा, दिलीप, जुगल आणि पोलीस मिळून संतोषला रोखण्याचा आणि कायद्याच्या हवाली करण्याचा प्रयत्न करतात.

अखेरीस संतोष पकडला जाईल का? की त्याच्या सूड भावनेतून कथेला आणखी काही वेगळे वळण मिळेल? तणाव खूप वाढला आहे, नाट्य रंगले आहे, त्यामुळे काय होते हे बघत राहा! पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, येथे लहान मुलांची सुरक्षा या विषयाकडे आम्हाला प्रेक्षकांचे लक्ष वेधून घ्यायचे आहे. ही खूप महत्त्वाची बाब आहे. या भागाचे चित्रीकरण करत असताना मला ९० च्या दशकातील चित्रपट आठवत होते, ज्यामध्ये बंधक बनवून हवे ते मिळवण्याचे प्रसंग बऱ्याचदा बघायला मिळत असत. हे चित्रपट खूप वेधक होते. आमच्या मालिकेतल्या या दृश्यात तीच ऊर्जा निर्माण करताना मजा आली. मला या भागात ज्या पद्धतीने भावनांचे संतुलन साधले आहे, ते फार आवडले. हे दृश्य तुम्हाला हृदयस्पर्शी क्षणांनी मोहित करते आणि मग अचानक एक धक्का देते. या संतुलनामुळेच पुष्पा इम्पॉसिबल मालिका उठून दिसते.

## राशीभविष्य

**मेष :** आज हाती माती घेतली तरी सोन्यात बदलेल. म्हणजेच तुम्ही जे काही काम हाती घ्याल त्यात तुम्हाला यश मिळेल. आणि आर्थिक फायदा होईल. एखाद्या प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला पैसे आणि भेटवस्तू मिळतील.

**वृषभ :** व्यवसायातील समस्या सुटल्याने अडकलेले पैसे वसूल होतील. नोकरीत अधीनस्थ लाभदायक ठरतील. जमीन, वास्तू, वाहने इत्यादींच्या विक्रीत गुंतलेल्या लोकांना मेहनतीनंतर पैसे मिळतील.

**मिथुन :** आज आरोग्याशी संबंधित विशेष समस्या उद्भवण्याची शक्यता कमी असेल. आपले आरोग्य चांगले ठेवण्यासाठी सतर्क आणि काळजी घ्या. आरोग्यासंबंधी किरकोळ समस्या निर्माण होतील.

**कर्क :** व्यवसायात तुमच्या शहाणपणामुळे तोटा नफ्यात बदलेल. राजकारणात लाभदायक पद मिळेल. तुम्हाला कामाच्या ठिकाणी सहकार्य मिळेल. वाहन चालविताना काळजी घेणे आवश्यक आहे.

**सिंह :** आज नको असतानाही प्रवासाला जावे लागेल. महत्त्वाच्या कामात विलंब होण्याची शक्यता आहे. विशिष्ठ व्यक्तीपासून विनाकारण अंतर वाढेल. रोजगाराच्या शोधात इकडून तिकडे भटकावे लागेल.

**कन्या :** घरात पाहुण्यांच्या आगमनामुळे खर्चात वाढ होईल. आज तुम्हाला शत्रू किंवा विरोधी पक्षाच्या चुकीचा किंवा चुकीचा फायदा आर्थिक लाभाच्या रूपाने होईल. जोडीदाराकडून पैसे आणि भेटवस्तू मिळतील.

**तुळ :** तुमचं वर्तन नम्र ठेवा. राग टाळा. उदरनिवार्हाच्या क्षेत्रात लोकांना नोकरीच्या वाढत्या संघषार्चा सामना करावा लागू शकतो. नोकरीत बदली होण्याची शक्यता आहे. शरीरात सर्दी वगैरेच्या तक्रारी असू शकतात.

**वृश्चिक :** आज एखादा मित्र राजकारणात खास सहयोगी सिद्ध होईल. ज्यामुळे तुम्ही खूप भावूक होऊ शकता. प्रेमसंबंधात जोडीदारासोबत प्रेमविवाहाबाबत चर्चा होऊ शकते.


**धनु :** राजकारणात तुम्हाला अडचणी येण्याचे संकेत दिसतात. आज पालकांबद्दल थोडी चिंता वाटेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाईल. ते अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील.

**मकर :** सरकारशी संबंधित लोकांना विशेष यश आणि सन्मान मिळेल. आज एकमेकांशी गोड बोलण्यात आनंददायी वेळ जाईल. कुटुंबात काही शुभ कार्ये पूर्ण होतील.

**कुंभ :** वैवाहिक जीवनात काही राजकीय व्यक्तींमुळे पती-पत्नीमध्ये मतभेद होऊ शकतात. आज तुम्ही धैर्य दाखवू शकता आणि तुमची प्रेमविवाह योजना तुमच्या कुटुंबातील सदस्यांसमोर मांडू शकता.

**मीन :** विवाहासाठी पात्र लोकांना त्यांच्या वैवाहिक जीवनाशी संबंधित चांगली बातमी मिळेल. प्रेमसंबंधांमध्ये एकमेकांच्या भावनांचा आदर करा. अन्यथा संबंध बिघडतील.

## शब्दकोडे क्रमांक २०४१



**आडवे शब्द :-**

१) नुकसानीचा व्यवहार
७) त्वरित
११) पाठीला आलेली वक्रता
१२) बरोबर आलेल्या लोकांचा घोळका
१४) दारूचा एक प्रकार
१५) विळखा
१६) भात उकळताना होणारा आवाज
१८) संपणे
२०) थोडक्यात साष्टांग नमस्कार विनंती विशेष
२२) शस्त्र
२४) शिडीच्या पाय-यांची लाकडे
२५) अफवा
२६) दरवळ
२८) पहाटेची गाढ निद्रा
३१) राजाची मुख्य पत्नी
३२) छोटी वस्ती
३३) दुर्दशा
३५) कावळ्याचे ओरडणे
३६) फासळीचे हाड
३८) कोना
४०) गाडीचे छत
४२) तारका
४३) सुटकेचा मार्ग
४५) सुस्ती
४६) कलावंत
४९) लोक
५१) कट्टर
५२) दालचीनीचे झाड
५३) अभिप्राय
५४) राबता, जाणेयेणे
५६) च्या सह
५८) शिव्यांचा भडीमार
६०) टरफल
६१) ** ** दंड भेद
६३) सावली
६४) ज्वर
६५) सप्तस्वरातील पहिला स्वर
६६) हत्याराची पिशवी
६७) मणका
६८) दारावरील खुणेचा आवाज
७०) स्तब्धता, शांतता
७२) नारायणाचा सतत जप करणारा मुनी
७३) मावळतीची दिशा
७४) श्रीमंत

**उभे शब्द :-**

२) तपस्याची राहण्याची जागा
३) बगळा
४) चहाटळ
५) बदल
६) रंगविलेले हळकुंड
७) फिकीर
८) लक्ष्मीचे एक नाव
९) भय
१०) कमळाची बी
१३) दिवाळे काढलेल्या माणसाकडूनपरत मिळालेली अतिशय अल्प रक्कम (वा प्र)
१५) जेमतेम
१६) सूर्याचे एक नाव
१७) मलईची घट्ट बासुंदी
१९) उंच-सखल नसलेले
२१) पायजमा
२३) सुंदर तरुणी
२५) थरथर कापणे
२७) माणूसकी
२९) वार्ता
३०) पर्णकुटी
३१) बुद्धी
३२) छोटे वादळ
३४) सिंह
३६) भरभराट
३७) ठिबकणारा, गळणारा
३८) राग
३९) पोपट
४१) उथळ आकार
४४) एकाग्र नजर
४५) निवासस्थान
४७) लाजा आणणारा
४८) रमल विद्या जाणणारा
५०) आश्चर्य
५५) घोडागाडी
५७) कारस्थानी
५९) नुकसान, दागिन्यातील झीज
६०) भेग, चीर
६२) अगदी मध्यभागी
६३) बैलाच्या गळ्याचे पोळे
६४) शक्ती
६८) चेष्टा
६९) बशीचा जोडीदार
७०) थोडक्यात सामोपचार
७१) मासा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# मागासांचे सामाजिक स्थान आणि उत्थान



डॉ. अमोल अन्नदाते

स्वातंत्र्यानंतर समानतेचे तत्त्व अंगिकारण्यामागे समाजातील मागास घटकांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळावी, त्यांना सर्वार्थाने सामाजिक न्याय मिळावा, हा उद्देश होता.

आज जमिनीवरील वास्तव डोळसपणे पाहिले, तर हा उद्देश पूर्णपणे साध्य झाला आहे का, असा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही. याचे पहिले कारण म्हणजे, स्वातंत्र्यापासून समाजकारण आणि राजकारणातील मागास समाजाच्या सहभागाचे एक प्रारूप निर्माण झाले होते.

मागास घटकांचे नेते त्यांच्या मतांची जबबदारी घेतील आणि सत्तेची काही पदे या नेत्यांना देऊन त्यांना ताब्यात ठेवता येते, हे राजकीय पक्षांच्या लक्षात आले. यातून मागास, वंचित, पीडित समाजाचे कल्याण न होता त्यांच्या काही मोजक्या नेत्यांचेच भले झाले. पुढे हे प्रारूप इतक्या टोकाला गेले की, कुठलाही पक्ष सत्तेत असला, तरी त्याच्या बाजूने जाऊन आपले स्थान टिकवून ठेवणे, एवढेच काय ते मागासांच्या नेतृत्वाचे एकमेव ध्येय उरले.

मागास समाजाच्या व्यक्तीला मोठ्या पदावर बसवून सगळ्या समाजाचे कल्याण होईल, हे कोठे ठरले आहे? आणि तसे सांगून आम्हाला मते मागू नयेत, हे या बांधवांनी सर्व प्रमुख पक्षांना ठणकावून सांगायला हवे. द्रौपदी मुर्मू या आपल्या राष्ट्रपती बनल्या, याचा साऱ्या देशाला आनंद आणि अभिमानही आहे. पण, राष्ट्रपतिपदी विराजमान झाल्यावरही, त्या आदिवासी असल्याचा उल्लेख सतत का केला जातो?

आदिवासी समाजातील व्यक्ती राष्ट्रपती झाली, याचे कौतुक पुन्हा पुन्हा करणे, हाही त्या पदाचा एका अर्थाने अवमान नव्हे का? खरे तर आदिवासी, मागास बांधवांना उच्चपदाची संधी मिळण्यात गैर काय आहे? या गोष्टी तर स्वाभाविकपणे व्हायलाच हव्यात ना! संविधान आणि सामाजिक न्यायाचे तत्त्व स्वीकारुन पंचाहत्तर वर्षे उलटल्यावरही हे होणार नसेल आणि त्याचे कौतुकच साजरे करण्यात आम्ही धन्यता मानत असू, तर आपली लोकशाही प्रगल्भ झाली, असे म्हणता येईल का?

मुळातच आदिवासी किंवा इतर कुठल्याही मागास व्यक्ती देशाच्या सर्वोच्चपदी विराजमान झाली म्हणून त्या समाजाचे सगळे प्रश्न चुटकीसरशी सुटत नाहीत, हे समजून घ्यायला हवे. लोकशाहीतील न्यायाचा हक्क शाबूत ठेवण्यासाठी मागास समाजांनी सर्वप्रथम आपल्या मतांची एकगठ्ठा मालकी मागास नेतृत्वाला देणे पूर्णपणे बंद करावे, म्हणजे तिचा राजकीय सौदेबाजीसाठी उपयोग होणार नाही.

सामाजिक न्यायासोबत इतर सर्व धोरणे तपासूनच आदिवासी, मागास, वंचित समाजाने मतदान करावे. सर्वाधिक भ्रष्टाचार मागास समाजासाठीच्या योजना आणि संबंधित विभागांमध्ये होतो. उदाहरणच द्यायचे तर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळातील भ्रष्टाचाराचे देता येईल. या मोठ्या प्रकरणाचा निकाल अजूनही लागलेला नाही. मागास समाजासाठी असलेल्या योजनांचे नेमके काय होते? हजारो कोटींचा निधी जाहीर आणि मंजूर होतो, तरीही मागास समाजातील असंख्य लोकांचे उत्थान का होत नाही?

या योजनांतील भ्रष्टाचार रोखून त्या खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्य करणारी एक तटस्थ संस्था आवश्यक आहे. एक काळ होता जेव्हा साहित्य, गाणी, स्फूर्तिगीते, जलसे यांनी मागास समाजाला जागृत करण्याचे काम केले. पण, आता तेवढ्यात अडकून चालणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संदेशातील शिका आणि संघटित व्हा हे दोन टप्पे साध्य झाले आहेत. एका वर्गातील मागास बांधवांचा संघर्षही संपला आहे. पण, संघर्ष न संपलेला एक मोठा वर्ग आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी संघर्ष करा या संदेशाच्या बरोबरीने प्रत्यक्षात जमिनीवर काम करण्याचे ध्येयही ठेवावे लागेल.

आदिवासी, मागास घटकांसाठी याच वर्गातील नेतृत्वाने काम करावे, हा संकेतही मोडीत निघायला हवा. या समाजांच्या भल्याचा विचार करणे ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. अन्य जाती-समुदायातील एखादी व्यक्ती मागास समाजाच्या कल्याणाच्या विचाराने झपाटलेली असेल, तर प्रसंगी तिचे नेतृत्वही मागास बांधवांनी स्वीकारायला हवे. किंबहुना स्त्रीवादी संघटनांनाही जशी समतेचा पुरस्कार करणाऱ्या पुरुषांची साथ मिळते, त्याप्रमाणे सर्व समाजांच्या सहभागाशिवाय मागास समाजाचा विकास होणे शक्य नाही.

ज्यांना आपली वैचारिक भूमिका पटते त्यांच्यापेक्षा ज्यांना ती पटत नाही, अशांना आपल्या बाजूने वळवणे, हे कोणत्याही चळवळीचे मुख्य ध्येय असते.

मागास बांधवांसाठीच्या चळवळींना वर्षानुवर्षे डॉ. बाबासाहेबांविषयीच्या अस्मितेभोवती खेळी करून गुंतवून ठेवले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे इतके थोर होते की, त्यांचा अभिमान भारतात जन्म घेणाऱ्या प्रत्येकाला असायलाच हवा. त्यामुळे अन्य समाजही खांद्याला खांदा लावून सोबत यावेत, या दृष्टीने मागासांच्या चळवळींची पुनर्रचना करावी लागेल.

संविधानाच्या प्रती छापण्यासाठी सरकार दरवर्षी कोट्यवधींचा खर्च करते. पण, त्यातील काही भाग सामाजिक न्याय, समता आणि मागास समाजांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रामाणिकपणे वापरला, तर वेगळ्या चळवळींची कदाचित गरजही पडणार नाही, हेही तितकेच खरे.

●●●●

# त्या परदेशी पाहुण्यांच्या आठवणीत!

मुंबईला 23 फेब्रुवारी रोजी व्हाईस ऑफ मीडिया आणि राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी दरवर्षी मी आशितोष कांबळे या चित्रकाराकडून मोमेंटो तयार करून घेतो. यावर्षीदेखील कार्यक्रमाच्या निमित्ताने मोमेंटो तयार करण्यासाठी मी आशितोषला भेटण्यासाठी वाशीला गेलो.

घराची कडी वाजवल्यावर आशितोषची बहीण दरवाजा उघडते. ती सांगते, दादा खाडीवर गेला आहे. मी विचारले, खाडी किती दूर आहे आणि तिथे तो का गेला आहे? त्यावर तिने उत्तर दिले, खाडीवर परदेशी पाहुणा आला आहे. त्याला पाहण्यासाठी दादा तिथे गेला आहे. मी आश्चर्याने विचारले, परदेशी पाहुणा म्हणजे कोण? ती म्हणाली, एक परदेशी पक्षी आहे, जो आपल्या भारतीय मैत्रिणीला भेटण्यासाठी दरवर्षी वाशीच्या खाडीवर येतो. काही दिवस इथे राहतो आणि मग परत जातो. तोच पाहुणा पाहण्यासाठी दादा गेला आहे.

ज्या दिशेने खाडी आहे, तिकडे मी निघालो. थोडं अंतर चालल्यावर, पक्ष्यांच्या थव्याजवळ काही लोक उभे होते. मी थोडं पुढे गेल्यावर आशितोष मला दिसला. तिथे दोन पक्षी होते–एक, जो मी कधीच पाहिला नव्हता आणि दुसरा, जो सातत्याने खाडीच्या कडेला असतो. आशितोष आणि त्याचे दोन-तीन मित्र त्या दोन्ही पक्ष्यांच्या भोवती ये-जा करत होते.

तो कधीही न पाहिलेला पक्षी थोडासा पुढे जायचा, मग मागे यायचा आणि आपले पंख पसरून त्या दुसऱ्या पक्ष्याला सामावून घ्यायचा. मी आशितोषला विचारलं, घरी ताई ज्या पक्ष्यांच्या प्रेमाविषयी बोलत होती, ते हेच दोन पक्षी आहेत का? आशितोष माझ्यावर ओरडला आणि म्हणाला, चूप बस, बाबा! माझ्या जवळ येत त्याने हळू आवाजात सांगितलं, अरे संदीप, हळू बोल! इथल्या लोकांना याबद्दल फार काही माहिती नाही. नाहीतर उद्यापासून हे पक्षी बघायला गर्दी जमेल. मी त्याला विचारलं, नेमका प्रकार काय आहे, ते सांग. काही अडचण नाही.

त्यावर आशितोष म्हणाला, मागच्या सात वर्षांपासून फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हा नर परदेशी पक्षी दुसऱ्या देशातून या मादी पक्ष्याला भेटायला इथे येतो. परवा तो इथून परत जाणार आहे. माझे काही मित्र आले होते, त्यांना हे दाखवण्यासाठी मी आलो होतो. मी विचारलं, हा पक्षी दरवर्षी याच वेळी इथे येतो आणि किमान दहा दिवस थांबतो हे तुम्हाला कसं समजलं?

आशितोष म्हणाला, सतीश राजन नावाचे माझे एक पक्षी निरीक्षक मित्र आहेत. त्यांनी मला पक्ष्यांच्या हालचाली, त्यांचे वर्तन, आणि पक्ष्यांमधील प्रामाणिक नात्यांविषयी महत्त्वाची माहिती दिली होती. त्यामुळे मीही पक्ष्यांचे निरीक्षण करायला सुरुवात केली. एकदा मी आणि सतीश खाडीच्या कडेला बसलो होतो, तेव्हा आम्हाला हे दोन पक्षी वेगळेच वाटले. आशितोष पुढे म्हणाला, खाडीमधल्या बाकीच्या पक्ष्यांमध्ये असलेला एक पक्षी एका वेगळ्या परदेशी पक्ष्याबरोबर काय करतोय, हे आम्हाला आश्चर्य वाटलं. सतीशने अनुमान काढलं आणि मला सांगितलं की, हा नर परदेशी पक्षी दरवर्षी याच मादीला भेटायला इथे येतो. पुढच्या वर्षीही लक्ष ठेवून राहा, तो नक्कीच परत येईल. मी त्याला विचारलं, हेच ते दोन पक्षी आहेत, हे आपण नेमकं ओळखायचं कसं?

त्यावर सतीश म्हणाला, यासाठी आपल्याला दोन-तीन दिवस त्यांचं निरीक्षण करावं लागेल. त्यांच्या हालचाली, एकमेकांशी असलेलं प्रेम, आणि त्यांचे वेगळेपण ओळखलं की आपल्याला खात्री पटते. सतीशने ज्या पद्धतीने मला सांगितलं, त्या पद्धतीने आम्ही दोघांनीही त्या दोन्ही पक्ष्यांची ओळख पटवण्यासाठी एक युक्ती लढवली. आम्ही दिवसभर त्या पक्ष्यांना दोन-तीन वेळा अन्न देत असू. दोन-तीन दिवस हे सलग सुरू राहिल्यावर त्या पक्ष्यांना आमच्यावर विश्वास वाटायला लागला. ते पक्षी हळूहळू आमच्याकडे येऊ लागले आणि आम्हाला स्पर्शही करू लागले.



ते दोघं एकमेकांच्या समवेत राहायचे, एकमेकांकडे सतत पाहायचे आणि एकमेकांना सातत्याने स्पर्श करत राहायचे. नित्यनेमाने बागडणं, उड्या मारणं, आणि एकमेकांच्या अंगावरून फिरणं हे सारं त्या दोघांमध्ये होत होतं. आम्ही अनेक वेळा त्यांना हातात घेऊन पुन्हा खाली सोडायचो.

त्या दोन्ही पक्ष्यांची ओळख पक्की करण्यासाठी आम्ही त्यांच्या शरीरावर, पंखाच्या वरच्या आणि खालच्या भागात गडद रंग लावला. चौथ्या दिवशी आम्ही खाडीवर गेलो, तेव्हा त्या दोघांपैकी एकच पक्षी तिथे बसलेला होता. तो परदेशी पक्षी त्या दिवशी आलाच नव्हता. दुसऱ्या दिवशीही तो दिसला नाही.

सतीशने यावर अनुमान काढलं की, दरवर्षी फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात हा परदेशी पक्षी त्याच्या प्रिय पक्षी मादीला भेटण्यासाठी येतो. मला तेव्हा यावर फारसा विश्वास बसला नाही. पण दुसऱ्या वर्षीही, अगदी याच वेळेत आम्ही त्या परदेशी पक्ष्याला त्याच्या प्रेयसीला भेटण्यासाठी आलेलं पाहिलं. आम्हाला खरंच आश्चर्य वाटलं.

त्या पक्ष्यांचा पाहुणचार करण्यासाठी आम्ही त्यांना रोज धान्य खायला घालत असू. ठरलेल्या वेळेत तो परदेशी पक्षी पुन्हा उडून जात असे. अनेक वर्षांपासून आम्ही त्या दोघांमधलं प्रेम पाहात आलो आहोत. मी एकदा सतीशला विचारलं, जर तो पक्षी तिला इतकं प्रचंड प्रेम करतो, तर तिला सोबत घेऊन परदेशी का जात नाही?

यावर सतीश म्हणाला, प्रत्येक पक्ष्याची उड्डाण क्षमता वेगळी असते. काही पक्ष्यांना त्यांच्या मर्यादा माहीत असतात. माणसांप्रमाणे अति विश्वासाने त्यांचं आयुष्य चालत नाही. पक्ष्यांची जगण्याची पद्धत वेगळी असते. सतीशने त्या एकट्या मादी पक्ष्याला देशी मैना असं नाव दिलं होतं.

आता आज ना उद्या, यावर्षीसुद्धा तो प्रियकर परदेशी पक्षी आपल्या मायदेशी, त्याच्या प्रेयसीला इथेच सोडून जाणार होता. आशितोष त्या दोन्ही पक्ष्यांना दाणे भरवत होता. त्याचे पाय आणि हात चिखलाने माखले होते. एका परदेशी पाहुण्याचा आपण पाहुणचार करतोय, याचा आनंद त्याच्या मनामध्ये होता.

उद्या खाडीवर पाहिलं तर, तो परदेशी पाहुणा उद्याही इथे राहील का नाही, याची खात्री नव्हती. मात्र, तो परदेशी प्रियकर कधी जाणार आहे, याची माहिती मात्र देशी मैनाला नक्की असावी. त्या दिवशी आम्ही घरी परतलो.

कामाविषयी चर्चा सुरू होती, पण माझं लक्ष मात्र त्या परदेशी पक्षी आणि देशी मैनाकडेच होतं.

घरी जेवायला बसल्यावर मी आशितोषला विचारलं, वहिनी कुठे आहेत? दिसत नाहीत. पण आशितोष काहीच बोलला नाही. मला काहीतरी खटकलं. मी पुन्हा वहिनीचा विषय काढला. यावर त्याची बहीण म्हणाली, काय सांगावं दादा, सध्या सगळं नवलाईचं आहे. कॉलेजमध्ये असताना दादाच्या मैत्रिणीने दादाला दिलेलं एक ग्रीटिंग पाहिलं. त्यावरून वहिनी रागारागाने माहेरी निघून गेली.

तिच्या जाण्याला आता एक वर्ष झालं. कसं असतं बघा माणसाचं प्रेम–थोडासा गैरसमज झाला की सगळं संपतं. बोलता बोलता आशितोषने त्यांच्या बहिणीविषयीही सांगितलं. ताईचा नवरा, जो उच्च शिक्षण घेतलेला होता, नोकरीनिमित्त परदेशात गेला आणि तिथेच त्याने ऑफिसमधील एका प्रचंड श्रीमंत सहकाऱ्याशी दुसरं लग्न केलं. याला आता दहा वर्षे झाली. मला त्या दोघांना काय बोलावं हेच सुचत नव्हतं.

माझ्या डोक्यात तीन वेगवेगळ्या कथा एकाच वेळी सुरू होत्या–दोन्ही पक्ष्यांची प्रेमकहाणी, आशितोष आणि त्याची बहीण यांची कथा. त्या दिवशी मी घरी निघालो. दुसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळी पुन्हा आशितोषकडे गेलो. घरी गेल्यावर समजलं की आशितोष वाशीच्या खाडीवर गेला आहे.

मी खाडीवर गेलो तर माझ्या लक्षात आलं की आशितोष त्या एकट्या देशी मैनेला जवळ घेऊन तिचे अश्रू पुसत होता. मला पाहताच आशितोषला डोळ्यांतले अश्रू आवरले नाहीत. तो म्हणाला, परदेशी पाहुणा बिचारीला सोडून गेला रे, संदीप. आता वर्षभर ती वाट पाहणार. पुन्हा तो वर्षभरानेच येईल.

आशितोषने मुठीत असलेले उर्वरित दाणे देशी मैनाच्या समोर टाकले आणि आम्ही जड पावलांनी घरी निघालो. काम करताना आशितोषचा मूड अजिबात नव्हता. तो जे चित्र काढत होता, त्यात नाराजीचे भाव स्पष्ट दिसत होते.

मी आल्या पावलानेच परत घरी निघालो. वाटेने जाताना माझ्या मनात प्रश्न उभा राहिला–खरं प्रेम कोणतं? घर सोडून जाणारी पत्नी, पैशासाठी दुसरं लग्न करणारा ताईचा नवरा, की दरवर्षी न चुकता त्याच वेळेला आपल्या प्रेयसीला भेटायला परदेशातून येणारा प्रियकर पक्षी? हल्ली माणसांना पक्ष्यांसारखं वागा असं म्हणायची वेळ आली आहे.... ते पक्षी पहा कसं निःस्वार्थीपणे एकमेकांवर प्रेम करतात, असे म्हणायची वेळ आली आहे. बरोबर ना?

■ ■ ■

भ्रमंती लाईव्ह स्टोरी

संदीप काळे
sandip98868@gmail.com
9890098868

# प. पू. गाडगेबाबा: एक थोर समाज सुधारक!

संतशिरोमणी गाडगे महाराज हे ईश्वर कशात आहे, ही नेमकी जाणीव असलेले संत आणि गोरगरीब, दीनदलित यांचा ऐहिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनीं असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत.

----------------

गाडगे महाराजांचा जन्म दि.२३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील ता.दर्यापूर, शेंडगाव येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. ते त्यांच्या आईच्या माहेरी- मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे त्यांच्या मामाकडेच त्यांचे बालपण गेले. त्यांच्या मामाची बरीच मोठी शेतजमीन होती.

लहानपणापासूनच त्यांना शेतीत रस होता, विशेषतः गुरांची निगराणी करायला त्यांना फार आवडे. त्यांचे वडील झिंगराजी हे परीट होते. आई सखूबाईने त्यांचे नाव डेबूजी असे ठेवले होते. डेबूजी लहान असतांनाच त्यांचे वडील दारूच्या व्यसनापायी मृत्युमुखी पडले. त्यामुळे घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने लहानपणापासूनच गुरे राखणे, नांगर चालविणे, शेतीवाडी करणे अशी कामे ते करत असत.


त्यांना कामाची खूप आवड होती. स्वच्छता हा त्यांचा विशेष गुण होता. डेबूजींचे लग्न लहानपणीच झाले होते. त्यांना चार मुली होत्या. पण ते संसारात फारसे रमले नाहीत. घरदार सोडून अवघ्या समाजाचा संसार सुधारण्यासाठी ते घराबाहेर पडले. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे.

सन १८९२ साली त्यांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारश्याच्या दिवशी त्यांनी रूढीप्रमाणे दारु व मटणाच्या जेवणाऐवजी गोडाधोडाचे जेवण दिले होते. हा त्या काळातील परंपरेला दिलेला छेद होता, दिलेली बगल होती. गावात कोणाचे काही अडले नडले, कोठेही काही काम करावयाचे असले की, गाडगे महाराज स्वतःहून पुढे येत. सार्वजनिक हिताची कामे सर्व जनांनी एकवटून केली पाहिजेत, हा धडा त्यांनी मिटल्या तोंडी गावकऱ्यांना शिकविला.

१ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरादाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन केले, अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडलेला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपल्या वाटेने निघून जायचे हा त्यांचा खाक्या असायचा.

ते सतत एक खराटा जवळ बाळगायचे. अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे आणि हातात एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असे. त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणू लागले. ते ज्या गावात जात तो गाव झाडून स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रुजविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले.

समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे



उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका, असे ते आपल्या कीर्तनातून सांगत.

देव दगडात नसून तो माणसांत आहे; हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही, असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा- प्रामुख्याने वऱ्हाडी बोलीचा उपयोग करत असत.

गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. देवभोळ्या माणसापासून ते शहरी नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे, असे उद्‌गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते.

संत गाडगेबाबांचा दशसूत्री संदेश :
भुकेलेल्यांना = अन्न, तहानलेल्यांना = पाणी, उघड्यानागड्यांना = वस्त्र, गोरगरीब मुलामुलींना = शिक्षण, शिक्षणासाठी मदत, बेघरांना = आसरा, अंध, पंगू, रोगी यांना = औषधोपचार, बेकार-बेरोजगारांना = रोजगार, पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना = अभय, गरीब तरुण-तरुणींचे = लग्न, दुःखी व निराशांना = हिंमत हा मानवधर्म पाया आहे.


त्यांनी नाशिक, देहू, आळंदी व पंढरपूर या धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या, गोरगरीब जनतेसाठी छोटी-मोठी रुग्णालये बांधली, अनेक नद्यांकाठी घाट बांधले, अतिशय गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांची सेवा केली.

महाराष्ट्रातील संत परंपरेबाबत ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस असे म्हटले जाते. संत गाडगेबाबांच्या कार्यामुळे या भागवत धर्माच्या कळसावर गाडगेबाबांनी २० व्या शतकात कर्मयोगाची ध्वजा चढवली असे म्हटले जाते.

महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ, असे यथार्थ उद्गार आचार्य अत्रे यांनी संत गाडगेबाबांबद्दल काढले आहेत. लोकसेवेच्या या धकाधकीच्या प्रवासातच त्यांचे अमरावतीजवळ वलगाव येथे पेढी नदीच्या पुलाजवळ २० डिसेंबर १९५६ रोजी देहावसान झाले.

गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला... या भजनाचा प्रसार करणाऱ्या, कर्मयोगावर दृढ श्रद्धा असणाऱ्या या सत्पुरुषाची आणि कर्त्या समाजसुधारकाची समाधी अमरावती येथे आहे. अमरावती विद्यापीठाला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ असे नाव दिले आहे. गाडगेबांच्या शिकवणीप्रमाणे आजचा खरा रोकडा धर्म आहे! हीच खरी भक्ती व देवपूजा आहे !! थोर समाजसुधारक संतश्रेष्ठ गाडगे महाराज यांना जयंती सप्ताह निमित्त कोटी कोटी विनम्र अभिवादन !!

■ ■ ■


संकलन व शब्दांकन
बापू- श्रीकृष्णदास निरंकारी.
रा. रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
९४२३७१४८८३.

# वाळूचा किल्ला..!

*बालपण जणू 'शिदोरी '*
*अनमोल भेट जीवनाची*
*अनोखा ठेवा आठवणीचा*
*अतूट सोबत आयुष्याची*

सौ. चैताली संगोपाल वरघट
मूर्तिजापूर, जि. अकोला
9834583685

आपले बालपण, आपल्या बालपणाच्या आठवणी कायमच्या मनात चिरकाल टिकून राहणाऱ्या असतात. त्या कधीतरी नकळत आठवतात. आणि मग पुन्हा त्या आठवणीमध्ये मन रमायला लागते.

'वाळू' हा नैसर्गिक प्रक्रियेतून तयार होणारा पर्यावरणातील एक महत्त्वाचा घटक आहे. समुद्राच्या किनाऱ्यावर, नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात वाळू साचलेली असते. मात्र याच वाळूला घेऊन कितीतरी आनंद देणाऱ्या बालपणीच्या आठवणी आनंद देत असतात. एक देखण असं वलय तयार होते. कितीही म्हटलं तरी सुद्धा त्या आठवणीमध्ये गुंतून रहावसं वाटते.

बालपणीची एक आठवणं जवळपास सर्वांना आठवत असेलच, कधीतरी कोणाच्या घराचे बांधकाम करण्याकरिता ट्रॅक्टरच्या माध्यमातून आणून टाकलेली वाळू म्हणजेच 'रेती' या रेतीवर खेळण्याची मौज मज्जा करण्याची बालपणीची आठवण आजही स्मरणात तशीच आहे.

बालपणात वाळूपासून तयार केलेला वाळूचा किल्ला किंवा वाळू पासून तयार केलेले घर, कितीतरी किल्ले आपण बालपणात बनवली आहेत. आपण त्या वाळूवर बसून खेळ खेळलेलो आहोत. कोणाच्या घराचे बांधकाम असतांना, त्या ठिकाणी आणून टाकलेली वाळू लहान मुलांना जणू खेळण्यासाठी निमंत्रण देते. सर्व लहान मुले आवडीने त्या वाळूवर खेळायला जातात. मौज मस्ती धमाल करतात.

कोणी वाळूमध्ये हात टाकून त्या हातावर वाळू टाकून दुसऱ्या हाताने झोपडीचा मस्त आकार देऊन मग हात हळूच त्यातून काढून सुंदर देखणं असं झोपडी किंवा घर तयार करतात. तर कोणी जस जमेल तस किल्ला, देऊळ बनवण्याचा प्रयत्न करतात.

कितीतरी वेळा वाळूपासुन घर, किल्ला बनवतांना कोसळतो ही पण पुन्हा पुन्हा तयार करण्याचा प्रयत्न मात्र सुरूच रहातो. वाळूपासुन काही बनवण्याचा खेळ आनंद देऊन जातो.

वाळूच्या कणांपासून मिळणारा आनंद मनाच्या कप्प्यात आठवणीत चिरकाल रहातो. बरेच बालपणीचे सोबती, मित्र मैत्रिणी वाळू मधले शंख, शिंपले गोळा करायचे, तर कोणी लहान मोठे गोल काळे दगड गोळा करायचे.

आज इतक्या वर्षांनी जेव्हा ही कला प्रत्यक्ष बघायला मिळाली तेव्हा तो आनंद काही वेगळाच.

आजही समुद्राच्या किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात वाळूवर चित्रकाम,नक्षीकाम केले जाते. जयंती, पुण्यतिथी असो किंवा व्हॅलेंटाईन डे किंवा खास अशा दिवसाच्या निमित्याने वाळूवर चित्रकला, त्यावर रेखाटन करणारे कलाकार, कलाप्रेमी मोठ्या प्रमाणात दिसून येतात. वाळूची कला म्हणजे वाळूचे कलात्मक स्वरूप होय.

वाळूच्या सपाट भागावर रेखाचित्र तयार केले जातात. प्रामुख्याने सौंदर्याच्या कारणासाठी महत्त्वाचे आहे. वाळूवर किल्ले तयार केली जातात. वाळूपासुन सुंदर देखणा देखावा तयार केला जातो.

वाळूवर तयार होणारे किल्ले चित्रकाम बघणाऱ्या प्रेक्षकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. वाळू चित्रकला ही कला आहे. बऱ्याच गोष्टी वाळूवर सुंदर कार्य करणाऱ्या कलाप्रेमी कडून शिकायला मिळते. त्यांचा उत्साह आनंद देऊन जातो. पुन्हा बालपणीच्या आठवणीत घेऊन येतो.

*कोणी द्यावे परतुनी*
*मज बालपणीचे क्षण*
*तो वाळूचा किल्ला*
*त्या कणात गुंतलेलं मन*

■ ■ ■

# 'छावा'ची दमदार झेप



सध्या सर्वत्र 'छावा' चित्रपटाची चर्चा आहे. तो बघण्यासाठी चित्रपतगृहांमध्ये आबालवृद्धांची गर्दी होत आहे. सकाळी सहाचे शो हाऊसफूल होण्याची किमया या चित्रपटाने साधली आहे. कमाईच्या बाबतीत, विकी कौशल आणि रश्मिका मंदान्ना यांच्या या चित्रपटाने देशात तसेच परदेशात जबरदस्त कामगिरी दाखवली आहे. सुरुवातीच्या वीकेंडनंतरही छावाने कमाईच्या बाबतीत आपली छाप सोडली असून चौथ्या दिवशी जगभरात बंपर बिझनेस करून सर्वांना आश्चर्यचकित केले आहे.१४ फेब्रुवारी रोजी व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झालेला या चित्रपट महान योद्धा संभाजी महाराजांच्या शौर्याची वीरगाथा दर्शवितो. विकी कौशलने राजांची भूमिका खूप छान साकारली असून ती चाहत्यांना आवडली आहे.

चित्रपटाने आत्तापर्यंत ३० कोटींपेक्षा जास्त व्यवसाय केला असून जगभरात चित्रपटाची एकूण कमाई आता २०० कोटी रुपयांच्या जवळपास पोहोचली आहे. रिलीजच्या तिसऱ्या दिवसापर्यंत या चित्रपटाची जागतिक कमाई १७६ कोटी रुपयांपेक्षा जास्त होती. एकंदरीत 'छावा' ची धमाकेदार कमाई सर्वांना आश्चर्यचकित करणारी ठरत आहे. खेरीज विकी कौशलच्या कारकिर्दीतील हा पहिलाच चित्रपट आहे, ज्याने रिलीजच्या चौथ्या दिवशीच जगभरात इतके मोठे कलेक्शन केले आहे. त्यामुळेही 'छावा' हा चित्रपट विकीच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार यात शंका नाही.

भारताव्यतिरिक्त विकी कौशलच्या 'छावा'ला परदेशातील प्रेक्षकांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. त्याच्या आधारे चित्रपटाने कमाईच्या बाबतीत आपला मजबूत दावा सादर केला आहे. तिसऱ्या दिवसापर्यंतच चित्रपटाने परदेशात ३२ कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली होती. आता ती ३५ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडून मोठी धाव घेत आहे.

# यशाची ताजी चव




'सनम तेरी कसम' या रोमँटिक चित्रपटाचे पुनर्प्रदर्शन बॉक्स ऑफिसवर आपली मजबूत पकड कायम ठेवत आहे. विकी कौशल अभिनीत 'छावा' चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरही हर्षवर्धन राणे यांच्या 'सनम तेरी कसम'ने हार मानलेली नाही. कलेक्शनच्या बाबतीत तो चमकदार कामगिरी दाखवत आहे. पुन्हा प्रदर्शित झाल्यानंतर या चित्रपटाने यशाची नवी उंची गाठली आहे. नऊ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला बऱ्याच काळानंतर यश मिळाले असल्यामुळे सध्या तो सर्वत्र चर्चेत आहे. देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाचे निव्वळ कलेक्शन आता सुमारे ३६.७६ कोटी रुपये झाले आहे. 'सनम तेरी कसम'ने याच वेगाने कमाई केली तर लवकरच तो ४० कोटींचा टप्पाही ओलांडू शकतो. अर्थातच, हे एक मोठे आव्हान आहे.

# 'क्रिश ४'च्या प्रतीक्षेत

'क्रिश'चा चौथा भाग बऱ्याच काळापासून चर्चेत आहे. 'क्रिश ४' च्या रिलीजची सर्वांनाच उत्सुकता आहे. हृतिक रोशन स्टारर या चित्रपटाबद्दल दररोज ताज्या अपडेट्स येत राहतात. पण आता यातील अभिनेत्रीबद्दल मोठी बातमी समोर येत आहे.

अलिकडेच, 'द रोशन्स डॉक्युमेंटरी' मालिका ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाली. त्यामध्ये रोशन कुटुंबाच्या संघर्षाची आणि यशाची कहाणी दाखवण्यात आली. विशेष म्हणजे त्याला प्रेक्षक आणि समीक्षकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. राकेश रोशन यांनी या डॉक्युमेंटरी-सिरीजसाठी एक सक्सेस पार्टी अलिकडेच आयोजित केली होती. या पार्टीत राकेश रोशनसोबत ज्येष्ठअभिनेत्री रेखा देखील दिसल्या होत्या आणि यादरम्यान पापाराझींनी राकेशला 'क्रिश ४' मधील रेखाच्या भूमिकेबद्दल प्रश्न विचारला. याला रोशन यांनी हसून उत्तर दिले आणि तुम्हाला लवकरच सर्व काही पहायला मिळेल... असे म्हटले. राकेश रोशनच्या या विधानावरून हे स्पष्ट होते की आपल्याला हृतिक रोशन स्टारर 'क्रिश ४' मध्ये रेखाची झलक पाहायला मिळेल.

अभिनेत्री रेखा 'कोई मिल गया है' मधील या सु प र हि रो चित्रपटाचा एक भाग आहे हे आपण जाण- तो. हृतिकने 'क्रिश' आणि 'क्रिश ३' मध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. आशा आहे की 'क्रिश ४' मध्ये तो पुन्हा एकदा अद्भुत अभिनयाने चाहत्यांची मने जिंकेल. तथापि, 'क्रिश ४' च्या प्रदर्शन तारखेबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. खरंतर, अभिनेत्री प्रियांका चोप्रा गेल्या दोन 'क्रिश'मध्ये हृतिक रोशनसोबत दिसली होती. या चित्रपटातील तिच्या उपस्थितीचा चांगला परिणाम बघायला मिळाला होता. पण आता प्रियांकाने बॉलिवूडपासून स्वतःला दूर केले आहे. त्यामुळे ती 'क्रिश ४' साठी परत येईल की राकेश रोशन तिच्या जागी दुसरी अभिनेत्री घेतील हा प्रश्न आहे. प्रियांकाच्या 'क्रिश ४' मध्ये पुन्हा प्रवेश करण्याबाबत अजूनही शंकांचे ढग आहेत.




# 'पंचायत' ला स्पर्धा 'दुपाहिया'ची



ओटीटी प्रेमीमध्य नेहमीच कोणत्या ना कोणत्या मालिकांबद्दल चर्चा सुरू असते. यामध्ये 'पंचायत'चे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. या मालिकेचे तीन सीझन प्रदर्शित झाले आहेत आणि लोक आगामी भागाची आतुरतेने वाट पाहत आहेत. जितेंद्र कुमार, नीना गुप्ता आणि फैसल मलिक यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या 'पंचायत' मध्ये एका गावाची कथा दाखवण्यात आली असून ज्याने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. मात्र आता ग्रामीण वातावरणाचे चित्रण करणारी अशीच आणखी एक मालिका प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे. अमेझॉन प्राइम व्हिडिओने नुकतीच 'दुपाहिया' नामक वेब सिरीजची घोषणा केली आहे. या मालिकेअंतर्गत एका छोट्या गावातील एक अनोखी कहाणी दाखवली जाईल. या मालिकेत अभिनेते गजराज राव आणि रेणुका शहाणे यांच्यासारखे कलाकार प्रेक्षकांना हसवतील. थोडक्यात ही मालिका 'पंचायत'ला स्पर्धा देताना दिसेल. 'पंचायत'ची कथा फुलेरा गावावर आधारित आहे त्याचप्रमाणे 'दुपाहिया' मध्ये धडकपूर या काल्पनिक गावाची कथा दाखवली जाईल.

# संगीत नाटकातील हिरा हरपला



अलिकडेच प्रख्यात गायक पं. प्रभाकरबुवा कारेकर यांचे निधन झाले. त्यांच्या रुपाने शास्त्रीय संगीत तसेच संगीत नाटकांमधील एक जाणते नाव काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली. अभिषेकीबुवांचे शिष्य असणाऱ्या कारेकरबुवांचे प्रिये पहा... ही गीत रसिकमान्य होते. खरे तर आधीच छोट्या गंधर्वांनी हे गाणे एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले होते. मात्र कारेकरबुवांनी ते वेगळ्या प्रकारे गायले आणि रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. त्यांनी गाण्याला वेगळे वळण देताना घेतलेली लांबलचक तान प्रेक्षकांना, संगीतप्रेमींना इतकी भावली की हे गाणे ऐकण्यासाठी लोक वेडावून जात असत. त्यामुळेच हे गाणे कारेकरबुवांची खासियत वा मुख्य ओळख बनले.

प्रभाकरबुवांचा रियाज वाखाणण्याजोगा होता. त्यांना आपले विश्व नाट्यसंगीतापुरते सीमित ठेवायचे नव्हते. ते शास्त्रीय संगीताचाही भरपूर रियाज करायचे. त्यामुळेच ते शास्त्रीय संगीतही फार छान गायचे. राग मांडताना, चीज-बंदिश समजून घेताना त्यांची एकाग्रता पाहण्यासारखी असायची. शास्त्रीय संगीताचा गाढा अभ्यास आणि प्रचंड मेहनत याने त्यांना गायनक्षेत्रात विशेष ओळख मिळवून दिली होती.

कारेकरबुवांनी संगीतालाच आपले संपूर्ण आयुष्य वाहिले होते. ते दिवसभर याच विश्वात रममाण असायचे. स्वाभाविकच त्यांची बैठक पक्की होती. दिवसभर रियाज केल्यामुळे आवाजाला कमालीची फिरत होती. एक राग घ्यायचा, त्याची बढत करायची, चीज आणि बंदिशीवर विचार करायचा असे करत त्यांचे काम तासन तास सुरू असायचे. या अभ्यासाचा अतिशय चांगला परिणाम त्यांच्या मैफिलींमध्ये दिसायचा, कारण बसताक्षणी मंचावर एक ऑरा, वलय तयार व्हायचे. म्हणजेच मैफिलीमध्ये स्थानापन्न होताक्षणीच त्यांनी अर्धी मैफिल जिंकलेली असायची. चेहऱ्यावरील सौम्य हास्य, प्रेक्षकांकडे बघणे, सूर लावणे या सगळ्याद्वारा ते रसिकांच्या मनाचा ताबा घ्यायचे आणि नंतर आपल्या दमदार स्वरांच्या अभिषेकात त्यांना चिंब भिजवायचे. शतजन्म शोधिताना... हे त्यांचे गाणेही रसिकप्रिय होते. दे हाता शरणागता... कोण विसरु शकेल? हे गाणेही ते आपल्या खास शैलीत गायचे. अशा या थोर गायकाच्या आठवणी कायमच मनात ताज्या राहतील.

# प्राजक्ताचा अनोखा अंदाज



अभिनय, नृत्य आणि निर्मिती या क्षेत्रात वावरणारी अभिनेत्री प्राजक्ता माळीने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. चित्रपटाची निर्मिती केली आहे. ती नेहमीच काहीतरी नाविन्यपूर्ण करण्याच्या प्रयत्नात असते. आगामी 'चिकी चिकी बुबूम बम' या आगामी चित्रपटातही तिचा असाच अनोखा अंदाज प्रेक्षकांना पहायला मिळणार आहे. यात ती रावी या मुलीच्या भूमिकेत दिसणार असून हे पात्र खूप खेळकर आणि उत्साही आहे. पण त्याचवेळी ते खूप गोंधळलेलेही आहे. तेव्हा प्राजक्ता विनोदी ढंगाने येणारी ही आव्हानात्म क भूमिका कशी साकारते ते लवकरच समजेल. 'चिकी चिकी बुबूम बम' हा चित्रपटपुनर्मिलन समारंभासाठी जमलेल्या पण काही मजेदार गोष्टी करताना दिसलेल्या मित्रांची मजेशीर गोष्ट दाखवणारा आहे. मजा, धमाल आणि विनोदाने भरलेला हा चित्रपट २८ फेब्रुवारीचा प्रेक्षकांसमोर येणार आहे.

या चित्रपटाविषयी बोलताना प्राजक्ता म्हणते, 'नावाजलेल्या विनोदी कलाकारांसोबत काम करण्याची संधी माझ्यासाठी खूप खास आहे. मला खात्री आहे की आमच्या भूमिकेला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे आणि 'चिकी चिकी बुबूम बुम'चे प्रेक्षक स्वागत करतील. या चित्रपटात प्राजक्ता माळीसोबत स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहरे, प्रसाद महादेव खांडेकर, रोहित माने, प्रथमेश शिवलकर, नम्रता सांभेराव, वनिता खरात, सचिन गोस्वामी, ओंकार राऊत, प्रियदर्शिनी इंदलकर, अभिजीत चव्हाण, निखिल रत्नपारखी, प्रभाकर मोरे, चेतना भट, निखिल बने, श्याम राजपूत, ऐश्वर्या बडदे, श्लोक खांडेकर, प्रमोद बनसोडे अशी कलाकारांची मोठे फौज आहे.

# चर्चा 'अ सायलेंट एस्केप'ची...



सध्या लघुपट मोठा प्रभाव पाडण्यात यशस्वी होत आहेत. या पार्श्वभूमीवर चित्रपट निर्माते योगी देवगण यांचा 'अ सायलेंट एस्केप' हा लघुपटदेखील चर्चेत असून समीक्षकांनी त्याचे खूप कौतुक केले आहे. सत्य घटनांनी प्रेरित असणारा 'अ सायलेंट एस्केप' एका आईच्या अढळ धैर्याची कहाणी सादर करतो. एका दुःखद घटनेनंतर न्यायासाठी लढणाऱ्या आईची कहाणी प्रेक्षकांना एका वेगळ्याच जगात घेऊन जाणारी आहे.

या लघुपटाने बॉलिवूड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (बीआयएफएफ) , १४ वा दादासाहेब फाळके चित्रपट म होत्सव आणि जगभरातील इतर अनेक प्रतिष्ठित प्लॅटफॉर्मवर सर्वोत्कृष्ट दीर्घ लघुपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि सर्वोत्कृष्ट अभिनेता असे अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार जिंकले आहेत. माउंट लॉफ्टी स्टुडिओज आणि योगी देवगण फिल्म्स अंतर्गत निर्मित ही अर्धा तासाची कथा आई आणि मुलाच्या वेदनादायक प्रवासावर आधारित आहे. सरदारनी प्रीत, रुडी देवगन, किरण प्रीत कौर आणि अरविंद कुमार यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या या लघुपटाचे दिग्दर्शक योगी देवगन म्हणाले की, 'लघुपटांमध्ये कमी वेळेत सखोल कथा सांगण्याची ताकद असते. 'अ सायलेंट एस्केप' हा असाच एक विचार करण्यास भाग पाडणारा लघुपट असून तो अन्याय आणि जगण्याच्या अनेक विषयांना स्पर्श करतो. खेरीज तो फक्त एका आईच्या लढाईबद्दल नाही तर आपल्या सर्वांमध्ये असणाऱ्या शक्तीबद्दल आहे.' तेव्हा ही प्रभावी कथा प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करेल यात शंका नाही.

# भक्तिमार्ग

## महिमा शिव उपासनेचा

**भगवान शंकरांनी हजारो भक्तांना, ऋषी-मुनींना तसेच देवांप्रमाणे दानवांनादेखील वर दिले. त्यांना जीवनाची प्रणाली, तत्त्वं शिकवली. अशा भोळ्या शंकराची आराधना करण्याचा उत्सवदिवस म्हणून आपण महाशिवरात्र साजरी करतो. प्रत्येक महिन्याच्या वद्य चतुर्थीला शिवरात्र म्हणतात. परंतु माघ महिन्यातील शिवरात्र विशेष महत्त्वाची मानली जाते. व्रतवैकल्य, उपवास आणि शिवआराधनेद्वारे श्रद्धापूर्वक हा दिवस साजरा होतो.**



प्रासंगिक

आपल्या संस्कृतीत विविध सणवारांचं नेमकं महत्त्व आहे. विशिष्ट ऋतूमानानुसार येणाऱ्या सणवारांच्या निमित्तानं निसर्गाचं पूजन केलं जातं. या भारतभूमीत विविध देवी-देवतांचं वास्तव्य राहिलं आहे. त्यांच्या वास्तव्यानं विविध ठिकाणं पावनं झाली आहेत. अशा पवित्र ठिकाणी त्या त्या दैवतांच्या मंदिरांची उभारणी करण्यात आली. आजही अशा ठिकाणी दर्शनासाठी भाविकांची मोठ्या संख्येनं गर्दी होत असते. आपल्याकडे वर्षभर सणवारांची रेलचेल असते. माघ महिन्यात गणेश जयंतीचा सोहळा मोठ्या भक्तीभावानं साजरा केला जातो. या निमित्तानं विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होतात. यानंतर वेध लागतात ते महाशिवरात्रीचे. महाशिवरात्री म्हणजे भगवान शंकराच्या भक्तांसाठी मोठी पर्वणीच असते. 'हर हर महादेव', 'शंभो शिवशंकर'च्या गजरात महादेवाच्या मंदिरात दर्शनासाठी लाखो भक्तांच्या रांगा लागतात.

शंकर हे अनेकांचं श्रद्धास्थान आहे. खरं तर श्रद्धेशिवाय जगण्याला काहीच अर्थ नाही. आई-वडिलांवर, गुरुजनांवर, देशावर, कामावर आणि धर्मावर श्रद्धा हवी. इथेच आपली पाळमुळं रुजलेली असतात. सण-उत्सव हादेखील त्यातीलच एक भाग आहे. सन-उत्सवांच्या साजरीकरणातून आपल्या अमूल्य अशा संस्कृतीचं जतन केलं पाहिजे. भारतीय संस्कृतीतील सौंदर्य आणि तत्वज्ञानाला तोड नाही. श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितलं पण या मार्गाने सर्वांनाच कर्तव्यप्रवृत्त केलं. त्याचप्रमाणे भगवान शंकरांनी हजारो भक्तांना, ऋषी-मुनींना आणि देवाप्रमाणे दानवांनासुद्धा प्रसन्न होऊन 'वर' दिले. जीवनाची प्रणाली, तत्त्वे त्यांना शिकवली. अशा भोळ्या शंकराची आराधना करण्याचा उत्सवदिवस म्हणून आपण महाशिवरात्रीकडे पाहतो. प्रत्येक महिन्याच्या वद्य चतुर्थीस शिवरात्र म्हणतात; परंतु माघ महिन्यातील शिवरात्र विशेष महत्त्वाची मानली जाते.

या दिवशी शिवलिंगास अभिषेक करुन १०८ किंवा सहस्त्र बिल्वपत्रे वाहून उपवास करतात. शिवमंदिरात रात्रभर जप-स्त्रोत्रे म्हटली जातात. या दिवशी शिवाची प्रदोष पूजा करतात. सोमवार हा शिवाचा वार असल्यामुळे सुवासिनी १६ सोमवारचं व्रत करतात. प्रदोषकाळी भक्तगण भस्म आणि रुद्राक्ष धारण करून शिवाच्या मंदिरात जातात. यावेळी शिवाचं ध्यान केलं जातं. त्यानंतर भगवान श्री शंकराची षोडशोपचार पूजा होते. महाशिवरात्रीच्या दिवशी शिवाला १०८ कमळं किंवा बेलाची पानं अर्पण करण्याची प्रथा आहे. त्याचप्रमाणे पुष्पांजली अर्पण करुन अर्घ्य दिलं जातं. पूजा, स्त्रोत्रपाठ आणि मूलमंत्राचा जप याही बाबी महत्त्वाच्या ठरतात. ही पूजा श्रद्धापूर्वक व्हायला हवी. मनोभावे पूजा केल्यावर हातून कळत-नकळत घडलेल्या दुष्कृत्यांबद्दल क्षमायाचना करावी. या काळात चार प्रहरी चार पूजा कराव्या, असं सांगण्यात आलं आहे. त्यांना 'ग्रामपूजा' म्हणतात. प्रत्येक ग्रामपूजेत देवला अभ्यंगस्नान घालावं. अनुलेपन करावं. धोत्रा, आंबा आणि बेल यांची पत्री वहावी. तांदळाच्या पिठाचे २६ दिवे करुन त्यांनी देवाला ओवाळावं. पूजेच्या शेवटी १०८ दिवे दान करावे. प्रत्येक पूजेतील मंत्र वेगवेगळे असतात. त्यांनी अर्घ्य द्यावं. महाशिवरात्रीच्या रात्री नृत्य, गीत, कथाश्रवण आदींमध्ये भक्तीभावनेने लीन व्हावं असं महाशिवरात्रीच्या व्रताचं महात्म्य सांगितलं जातं.

'नम: शिवाय' हा शिवाचा पंचाक्षरी मंत्र आहे. त्यातील प्रत्येक अक्षराचा अर्थ जाणून घ्यायला हवा.

**न** = समस्त लोकांचा आदीदेव.

**म:** = परमज्ञान देणारा आणि महापातकांचा नाश करणारा.

**शि** = कल्याणकारी, शांत आणि शिवानुग्रहाला कारणीभूत असणारा.

**वा** = वृषभवाहन, वासुकि, वामांगी, शक्ती यांचा सूचक.

**य** = परमानंदरुप आणि शिवाचे शुभ असे वास्तव्यस्थान.

अशा या शिवाला नमस्कार असो अशी या जपामागची भावना आहे.

आपल्याकडे देवपूजेतील प्रत्येक कृतीला अर्थ आहे. पुजेच्या वेळी केला जाणारा प्राणायाम हा फुफ्फुसांची ताकद वाढवतो. रोगाला दूर ठेवतो तर 'ॐ नम: शिवाय' सारख्या जपामुळे दीर्घश्वसन घडतं. तीर्थरूपात मिळणारं पंचामृत प्राशन केल्यामुळे त्यातील दूध, मधासारख्या शरीराला उपकारक ठरणाऱ्या घटकांचा लाभ मिळतो. पूजा-अर्चनेमुळे मन एकाग्र होतं. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात या मानसिक शांततेची खरी आवश्यकता आहे. आरोग्याच्या दृष्टीनेही मन:शांती आवश्यक असते. आपल्याकडे मोठ्यांना नमस्कार करण्याची पद्धत आहे. 'नमस्कारे लीनता घडे, नमस्कारे विकल्प मोडे' अशा तऱ्हेने त्यातून नम्रता तर दिसतेच पण शरीरालाही एक प्रकारचा व्यायाम होतो. वाकल्यामुळे, मेंदूकडे जास्त रक्तपुरवठा होतो. आरोग्याच्या दृष्टीने हे फायदेशीर असतं. आपण दारात तुळस लावतो, तुळस ही अतिशय औषधी वनस्पती आहे. त्यामुळे सर्दी, खोकला झाल्यास त्यावर बहुगुणी असा तुळशीच्या पाल्याचा काढा तयार करता येतो. त्याचप्रमाणे तुळस दारात असल्यास डास, माशाही कमी होतात. शंकराच्या मंदिरात आपण बेल वाहतो. त्यामागेही शास्त्रीय कारण आहे. या सर्वच वनस्पती औषधी आहेत. मानवी आरोग्याच्या दृष्टीने त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते लक्षात घ्यायला हवं.

भारतामध्ये बारा ज्योतीर्लिंगे आहेत. महाराष्ट्रात त्यांचं महत्त्व वेगळंच आहे. देशामधील सोरटी-सोमनाथ, मल्लिकार्जून, महाकालेश्वर, ओंकार-अमलेश्वर, वैद्यनाथ, भीमाशंकर, रामेश्वर, नागेश्वर, काशीविश्वेश्वर, त्र्यंबकेश्वर, केदारेश्वर, घृणेश्वर या सर्व मंदिरात महाशिवरात्रीच्या दिवशी भाविकांची दर्शनासाठी खूपच गर्दी असते. या स्थानांना वेगळं असं पौराणिक महत्त्व आहे. या सर्व स्थळांना भाविक अत्यंत श्रद्धेने भेटी देतात. मन:शांती हा त्यातील अत्यंत महत्वाचा भाग. या सर्व सण-उत्सवांची बैठक वैज्ञानिक दृष्टीकोन लक्षात ठेवून केल्यामुळे त्याचे अप्रत्यक्ष फायदेही खूप होतात. प्रत्येक सण-उत्सवातील पदार्थ हा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण असतो. उपवास हा यामधील श्रद्धेचा भाग मानला जातो. यात आहारशास्त्राचा विचार केला असल्यामुळे आपलं आरोग्य चांगलं राहतं.

कोणत्याही गोष्टीचा संबंध धर्माशी जोडल्यावर त्यातील चांगल्या गोष्टी आत्मसात करणं सोपं जातं, हे ओळखून आपल्या पूर्वजांनी समाजहितकारक अशा अनेक गोष्टींचा धर्माशी समन्वय साधला. उदा. वृक्षपूजा, प्राण्यांना देव मानून पूजा करणं यामुळे आपोआपच निसर्गाचा समतोल राखला जाई. झाडे तोडणं, प्राण्यांना मारणं आदी कृत्ये रोखण्यासाठी पूर्वी कायदे करावे लागले नाहीत. निसर्गपूजेतून समाजाचा डोळस दृष्टीकोनच समोर आला आहे. पूर्वीच्या काळी निसर्गाच्या समतोलाविषयी पुरेशी काळजी घेतली जात असे. सध्या मात्र ही जाणीवच नाहिशी झालेली आहे. त्यामुळे नव्याने निसर्गाशी जवळीक साधण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यासाठी व्रतवैकल्याचा आधार मोलाचा आहे.

महाशिवरात्रीसारख्या अनेकविध सण उत्सवानिमित्त यात्रेच्या रुपाने अनेक लोक एकत्र येतात. त्यातून नवीन ओळखी होतात. दुर्मीळ होत असणारा सुसंवाद प्रस्थापित होण्यास ही एक चांगली संधी असते. यातूनच एकमेकांचं सुख-दु:ख कळतं, प्रेम वाढतं, सहकार्य वाढतं आणि त्याचा समाजाला फायदा होतो. सण-उत्सवानिमित्त आपण घर तर स्वच्छ करतोच पण त्यातून परिसरही स्वच्छ होतो. दाराला लावलेलं तोरण, अंगणातील सुबक रांगोळी असं मंगलमय वातावरण निर्माण झाल्याने हे सण-उत्सव आपल्याला अपार आनंद देऊन जातात. समाजात एकोपा, बंधुभाव वाढीला लागणाच्या दृष्टीने उत्सवांचं महत्त्व मोठं आहे. समाजाच्या विविध घटकातील कटुता नाहीशी होऊन जगाला शांततेचा आणि एकतेचा संदेश देण्यासाठी पुरेसं बळ मिळावं हीच प्रार्थना या महाशिवरात्रीच्या निमित्तानं भगवान शंकराकडं करू या.

## कसा मिटवायचा वाद?

सेल्फ हेल्प

हिंदू धर्मातील धर्मग्रंथांमधून आयुष्याला एक मार्ग मिळतो. आयुष्यातल्या अनेक प्रसंगांवर मात करण्याची शक्ती मिळते. हिंदू धर्मातल्या पौराणिक कथा वेगवेगळ्या युगांमध्ये घडल्या असल्या तरी आजच्या अनेक प्रसंगांमध्येही या कथांचं सार लागू पडतं. वादविवाद टाळून मार्ग कसा काढायचा हे या कथांमधून आपल्याला शिकायला मिळतं. वादविवादांवर कसा मार्ग काढायचा हे आपण रामायणातून शिकू शकतो. राजा दशरथाच्या तीन राण्या होत्या. कौशल्या, सुमित्रा आणि कैकयी. या राण्यांचे चार पुत्र. राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न. श्रीराम सर्वात मोठा. म्हणून अयोध्येचं राज्य रामाला देण्याचा निर्णय दशरथाने घेतला. अयोध्येचा भावी राजा म्हणून तो रामाकडे पाहत होता. पण कैकेयीला हे मंजूर नव्हतं. आपला मुलगा भरत याला अयोध्येचं राज्य मिळावं, अशी इच्छा तिच्या मनात जागी झाली. कैकेयीची दासी मंथरेने तिचे कान भरले आणि रामावर जीवापाड प्रेम करणाऱ्या कैकेयीने त्याला वनवासात पाठवलं. आज्ञाधारक रामाने आपल्या पित्याची आज्ञा मान्य करून वनवासाचा रस्ता धरला. लक्ष्मण आणि सीतेनेही त्याला सोबत करायचं ठरवलं.



रामाच्या चौदा वर्षांच्या वनवासकाळात भरताने त्याच्या पादुकांची मनोभावे पूजा केली. अयोध्येच्या राजसिंहासनावर रामाचा अधिकार आहे हे तो जाणून होता. म्हणूनच सिंहासनावर रामाच्या पादुका ठेऊन १४ वर्षे कार्यभार सांभाळला. चौदा वर्षांनंतर राम अयोध्येला परत आल्यानंतर भरत या जबाबदारीतून मुक्त होतो आणि रामाला राजसिंहासन सोपवतो. अर्थात या काळात सगळे वाद संपुष्टात आलेले असतात. सगळं काही छान होतं. पृथ्वीवर रामराज्य अवतरतं. वादविवादांवर बुद्धीच्या जोरावर योग्य मार्ग काढण्याचं भरताने ठरवलं. त्याला मार्ग मिळाला. भरताने चातुर्य दाखवलं आणि भावंडांमध्ये कोणतंही वितुष्ट येऊ दिलं नाही. धैर्य आणि बुद्धी यांचा वापर करून माणूस प्रत्येक परिस्थितीचा सामना करू शकतो. प्रत्येक परिस्थितीतून मार्ग काढू शकतो. रामायणातून आपण हा धडा घेऊ शकतो.

## खडकातून साकारले मंदिर

तीर्थक्षेत्र

स्थापत्यकलेचा उत्तम नमुना असलेली अनेक मंदिरं भारतात आहेत. खजुराहोची मंदिरं वास्तूकलेला उत्तम नमुना म्हटली पाहिजे. देशातल्या प्रत्येक राज्यात वैशिष्ट्यपूर्ण मंदिरं आहेत. राजस्थानातील राजसमंद आणि पाली जिल्ह्याच्या सीमेवर एक मंदिर वसलंय. भगवान परशुरामाने या मंदिराची निर्मिती केल्याचं बोललं जातं. परशुच्या सहाय्याने खडक कापून परशुरामाने हे मंदिर उभारलंय. 'टांगीनाथ धाम' या नावाने हे मंदिर ओळखलं जातं. पाली जिल्ह्यापासून १०० मीटर अंतरावर हे मंदिर वसलंय. कुंभलगडपासून हे मंदिर अवघ्या १० किलोमीटर अंतरावर आहे. या मंदिरात परशुरामाच्या परशुचं दर्शनही घेता येतं. म्हणूनच या मंदिरात भाविकांची बरीच गर्दी झाल्याचं पहायला मिळतं.




भगवान परशुरामाला विष्णूचा अवतार मानलं जातं. परशुरामाने पृथ्वी नि:क्षत्रिय केली होती. हे मंदिर एका गुहेत आहे. या मंदिरापर्यंत जाण्यासाठी ५०० पायऱ्या चढाव्या लागतात. परशुरामाने त्रेतायुगात कठोर तपश्चर्या केली होती. शिवलिंग समोर ठेऊन तपश्चर्या केली होती. हे शिवलिंग या मंदिरात पहायला मिळतं. राजस्थानात या मंदिराचं मोठं महत्त्व आहे. परशुरामाने स्थापन केलेल्या शिवलिंगाचं दर्शन घ्यायचं असेल तर या मंदिराला भेट द्यायला हवी. पण यासाठी राजस्थानातल्या पालीमध्ये जायला हवं. परशुरामाच्या अस्तित्त्वाने पावन झालेलं हे स्थान बरंच प्रसिद्ध आहे. याठिकाणी गेल्यावर परशुरामाच्या अस्तित्त्वाची जाणीव होत राहते. असं हे अनोखं मंदिर शिवभक्तांसाठी पर्वणीच आहे.

## कायम रहा उत्साही

बोध

आपल्यापैकी प्रत्येकाने उत्साही आणि उल्हासित आयुष्य जगायला हवं. उत्साह आणि उल्हास हे आनंदी जीवनाचं गमक आहे. जीवनात आनंदी आणि उत्साही राहायचं तर आयुष्याचं एक उद्दीष्ट असलं पाहिजे. उद्दीष्टहीन मनुष्याचं आयुष्य पशुसमान मानलं जातं. मनुष्यजन्म मिळायला भाग्य लागतं. ८४ लक्ष योनींमधून फिरल्यानंतर मनुष्य जन्माचा लाभ होतो. म्हणूनच माणूस म्हणून जन्म घेतल्यानंतर आपण चांगली कर्म केली पाहिजेत. आयुष्याचं एक ध्येय निश्चित केलं पाहिजे. ध्येय निश्चित करून ते पूर्ण करण्यासाठी आपण झटलं पाहिजे. या ध्येयपूर्तीत प्रचंड आनंद असतो. संघर्ष असला तरी त्यातही एक मजा असते. या जगात अनेक आंदोलनं झाली. ही सगळी आंदोलनं ध्येय आणि उत्साहामुळे यशस्वी ठरली. मानवी हक्कांसाठीच्या या आंदोलनांमुळे आयुष्याला नवी दिशा मिळाली.



आता माझं वय झालं, या वयात मी काय करू. आयुष्य संपायची वेळ आली असं अनेक जण म्हणतात. पण उत्साह आणि उल्हास यांचा संबंध वयाशी लावता येत नाही. काही ज्येष्ठ नागरिक अशक्य असलेल्या गोष्टी करून दाखवतात. कुणी धावतो तर कुणी एव्हरेस्ट सर करून दाखवतो. आयुष्यात असलेल्या उत्साहामुळेच हे शक्य होतं. सेवानिवृत्ती पत्करल्यानंतर ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात कोणतंही उद्दीष्ट राहात नाही. त्यामुळे असे लोक पलंगावर पडून राहतात. त्यांचं शरीर रोगांचं, विकारांचं आगार बनतं. आता मी काय करू, असा प्रश्न पडतो आणि आयुष्य अर्थहीन होऊन जातं. म्हणून आयुष्यातला उद्देश कधीही हरवता कामा नये. ८० वर्षांच्या आज्जीने हे करून दाखवलं. नव्वदीचे आजोबा कॉम्प्युटर शिकले, असं आपण वाचतो, ऐकतो. आयुष्यातला उद्देश कधीही हरवू न देण्याच्या विचारामुळे ते असं करू शकतात. क्रियाशील असलेले लोक सतत आनंदी असतात. त्यांचं मन कायमच प्रसन्न असतं.

महर्षी वाल्मिकी म्हणतात की, माणसासाठी काहीही अशक्य नाही. यासाठी गरज असते ती उत्साहाची, उल्हासाची, उर्मीची. उत्साही मनुष्य अशक्य गोष्ट शक्य करून दाखवतो. दु:खामुळे आयुष्यातले यशाचे सगळे मार्ग बंद होतात. तर आनंदी आणि उत्साही राहिल्याने आयुष्याला नवी दिशा मिळते. सकारात्मकतेचा प्रभाव आयुष्यातल्या प्रत्येक निर्णयात दिसून येतो. आपण परिस्थितीला घाबरतो. पण त्याऐवजी स्वत:ला घाबरायला हवं. माझा मार्ग योग्य आहे का, हा प्रश्न स्वत:ला विचारा. मनाने होकार दिला तर पुढे जा. कोणताही विचार करू नका. मनात किंतू आणू नका. महात्मा गांधींनीही हेच सांगितलंय. कर्तव्याचा संघर्ष सुरू असेल तर मनातल्या सूक्ष्म शक्तीला आवाज द्या. तिच्याशी बोला. आपल्या मनाचा निर्णय अंतिम असू द्या.

## लाओत्सेंचा ताओ धर्म

धर्म देशोदेशीचे

चीनमध्ये ताओ धर्माला मान्यता मिळाली आहे. लाओत्से यांनी ताओ धर्माची स्थापना केली. लाओत्से यांना लाओ-सू किंवा लाओ-सी या नावानेही ओळखलं जातं. लाओत्से हे चीनमधले प्रसिद्ध तत्त्वज्ञानी. ताओ ते चिंग या नावानेही त्यांची ओळख आहे. या नावाने त्यांनी लेखन केलं. लोकांना उपदेश केला. लाओत्से यांच्या विचारधारेवर आधारित धर्म म्हणजे ताओ धर्म. लाओत्से यांना परमेश्वरासमान मानलं जातं. इसवीसन पूर्व सहाव्या शतकात झोऊ राजाच्या काळात लाओत्से होऊन गेले, असं चीनी लोकं मानतात. लाओत्से यांचे कान बरेच मोठे होते. मोठ्या कानाचे लोक बुद्धीवान असल्याचं मानलं जातं. त्यामुळे लाओत्से यांच्या चेहऱ्यावर ज्ञानाचं तेज झळकत असे. लाओत्से ९० वर्षं जगले.



लाओत्से यांच्या विचारांवर आधारित असलेला ताओ हा धर्म चीनमधला प्राचीन धर्म आहे. ताओ हा फक्त धर्म नाही तर हिंदू धर्माप्रमाणे ही एक जीवनशैली आहे. जुन्या काळात ताओ धर्माला ताओ दर्शन असं म्हटलं जायचं. गौतम बुद्धाच्या उदयानंतर चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार झाला. इथल्या विचारवंतांनी बौद्ध धर्मातलं तत्त्वज्ञान अंगिकारलं. यामुळे एका विचारावर आधारित असलेलं ताओ दर्शनाचं रूपांतर ताओ धर्मात झालं. अर्थात बौद्ध आणि ताओ या दोन्ही धर्मांमध्ये अहिंसात्मक संघर्ष होत राहिला. हा वैचारिक संघर्ष होता. पण आजच्या काळात या दोन्ही धर्मांचे, विचारधारेचे अनुयायी गुण्यागोविंदाने नांदत आहेत. जुन्या काळातला हा संघर्ष आता संपलाय. चीनमधली ५० ते ८० टक्के लोकसंख्या बौद्ध आहे. ताओ धर्माच्या अनुयायांची संख्या खूपच कमी झालीये. 'दाओ दे चिंग' आणि 'जुआंग जी' या ग्रंथांमधून लाओत्से यांनी आपले विचार मांडले. हे ग्रंथ ताओ धर्मांचे आधारस्तंभ मानले जातात. यिन आणि यांग हे ताओ धर्मातले देवी आणि देवता आहेत. या धर्मात कर्मकांड, पशुबळी यांना मान्यता आहे. लाओत्से यांचा ताओ धर्म आजही अस्तित्त्वात आहे.

## भाग्यकारक रोपटी

वास्तू भक्ती

घरातला प्रत्येक कोपरा आपल्या आयुष्यावर प्रभाव टाकत असतो. यासोबतच घराच्या सजावटीसाठी वापरली जाणारी प्रत्येक वस्तूही कळत नकळत जीवनावर प्रभाव टाकत असते. या वस्तूंचा आपल्यावर सकारात्मक आणि नकारात्मक असा प्रभाव पडत असतो. घरात लावलेली झाडंही सौभाग्य आणि दुर्भाग्याला आमंत्रण देत असतात. आवड व हौस म्हणून आपण रोपटी लावतो. पण त्याचे चुकीचे परिणामही होऊ शकतात. म्हणूनच घरात कोणती झाडं लावणं शुभं मानलं जातं याविषयी जाणून घेणं गरजेचं ठरतं.



* अनेकांच्या घरात तुळशी वृंदावन असतं. तुळस दक्षिणेकडे ठेऊ नये. दक्षिणेकडे ठेवलेली तुळस नकारात्मक ऊर्जा निर्माण करते.

* घरात कृत्रिम रोपटी आणि झाडं लावू नये. कृत्रिम झाडं लावणं वास्तूशास्त्राला मान्य नाही. यामुळे घरात नकारात्मक ऊर्जेचा वास राहतो, असं म्हटलं जातं.

* धनलाभाच्या दृष्टीकोनातून घरात मनीप्लांट लावला जातो. मनी प्लांट घराच्या दक्षिण-पूर्व दिशेला लावायला हवा. या रोपट्याला सतत पाणी द्यायला हवं. यामुळे धनलाभ होतो.

* बेडरूममध्ये रोपटी लावू नये. यामुळे पती-पत्नींमधला ताण वाढतो. वाद-विवाद, भांडणं होऊ शकतात.

* घर आणि ऑफिसमध्ये सकारात्मक ऊर्जा रहावी यासाठी फुलदाण्या ठेवा. परंतु फुलदाण्या रिकाम्या ठेऊ नका. त्यातील कोमेजलेली फुलं लगेच काढून टाका. त्या जागी ताजी फुलं ठेवा. कोमेजलेल्या फुलांमुळे नकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

* कोरफड, कॅक्टससारखी रोपटी घरात लावू नये. काटेरी रोपट्यांमुळे घरात नकारात्मक ऊर्जेचा वास राहतो आणि स्वभाव आळशी बनतो. आजारपणांचं प्रमाण वाढतं.

* चंपा, चमेलीसारखी सुगंधी फुलांची झाडं घराच्या बाहेर लावता येतील. अशी झाडं घरात लावणं वास्तुशास्त्राला मान्य नाही.

## या सवयी बदला

शास्त्रांमधून

हिंदू धर्मातील शास्त्रांमध्ये काही गोष्टी अशुभ मानण्यात आल्या आहेत. या संदर्भात आपल्या सवयींमधून विचार आणि संस्कारांचं दर्शन घडत असतं. या सवयी भविष्यातलं यश निश्चित करत असतात. शास्त्रांमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या या सवयी अशुभ फळ देणाऱ्या आहेत. या सवयींविषयी जाणून घेऊन त्या बदलण्यातच खरा शहाणपणा आहे.



* आंघोळीनंतर स्वच्छतागृह घाण ठेवलं तर चंद्राचा कोप होतो. जलतत्त्वावर चंद्राचा प्रभाव असतो. त्यामुळे आंघोळीनंतर बाथरूम स्वच्छ करायला हवं. फरशीवर पसरलेलं पाणी काढून टाकायला हवं. यामुळे शरीराचं तेज वाढतं आणि चंद्राची आपल्यावर कृपा राहते.

* जेवल्यानंतर उष्ट ताट सिंक किंवा बाथरूममध्ये ठेवायला हवं. उष्ट ताट असंच टाकून गेल्याने आयुष्यात यश मिळत नाही. मेहनत केल्यानंतरही त्याचं योग्य फळ मिळत नसेल तर ही सवय बदलून बघा. उष्ट ताट जागेवर ठेवल्याने शनी आणि चंद्राशी संबंधित दोष दूर होऊन लक्ष्मीची कृपा राहते.

* पादत्राणं इतस्तत: ठेऊ नये. घरात पादत्राणं अस्ताव्यस्त पडली असतील तर मान-सन्मान कमी होतो. शत्रूचा त्रास वाढतो.

* पलंगावर सामान पडलं असेल, घाणेरड्या चादरी घातल्या असतील तर नकारात्मक प्रभाव पडतो. ही सवय आरोग्यासाठी हानिकारक मानली जाते.

* मोठ्याने, रागाने बोलणाऱ्या व्यक्तीला शनिदोषाचा सामना करावा लागतो. त्यामुळे आपलं म्हणणं शांतपणे मांडा. घरात शांतता राखा. उगाचच आरडाओरडा करू नका.

* रात्रभर जागरण करणाऱ्या व्यक्तीला चंद्रदोषाचा सामना करावा लागतो. अशा लोकांना बरेच ताण असतात.

* थुंकण्याची सवय असलेल्या लोकांवर महालक्ष्मी रूसून बसते. या सवयीमुळे मान-सन्मान मिळत नाही.

* घरातल्या ज्येष्ठांचा अपमान केल्याने प्रगती खुंटते. घराची भरभराट होत नाही. ज्येष्ठ मंडळी खूश असलेल्या घरावर देवीदेवतांची कृपा राहते.

* पाय स्वच्छ ठेवले पाहिजे. पाय घाण असतील तर तुम्हाला यश मिळत नाही. तसंच इतरांपुढे अपमान होतो.